Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला---सोमवार तारीख ५ माहे फेब्रुवारी सन १९१७ ई० [ अंक ६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा पापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर पापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची भी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ { Lyon Scott एजंट

नो. नं १

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व बारदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. २

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**---उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥', १, १।, १॥, २, २।, ते ५ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**--- किंमत ।॥' १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**--- किंमत ।', ॥', ।॥', १, १।, रु. प. **खडावा जोड**-- शिसवी व शिवणीचे वगैरे सामान वाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट.

डी. आर. आळवणी. स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

## खात्रीचा तयार केलेला.

### ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कूटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गुण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता

रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं. ६
नो० नं० ४

### अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३ ४, ५, वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु ३, ४, ५. शिप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥. २, ३. ४. अंगठी किं. रु. १, १।, सलें अर्धपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं. रु. १॥, २ २॥ कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः---मगनलाल के. आणि कंपनी
गिरगांव मुंबई.

नो० नं० ५


### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप हिवा शीतज्वर येणारास बाटलीस हें औषध प्यावें. किं. १ रुपया


### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार नाहीसे होतात किं रु. १॥८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर.

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने--- मंगळसूत्र माळ, ठुशी जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें साखी व घागऱ्याची वगैरे सर्व जातीचा माल-तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें ग्याहानलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय-कोल्हापूर
नो नं ७

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा धि एशियन कमार्शियल अशूअरन्स कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांतचे फिरते एजंट रा. रा. वि. रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमार्शियल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज. फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

# काश्मीरी केशर.

पवित्र आणि असल १॥८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ॥८ सुर्मो ममीरा ३ तो. अंगुरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ॥९ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ९

### जाहिरात

मौ. वऱ्हाडांतील ४० रेचे व त्यास लागणारे बायलर एंजीन वगैरे सर्व सामानासह एक कारखाना विकत द्यावयाचा आहे. तर ज्यास विकावयाचा असेल त्यानीं मजशीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा. माझा पत्ता--- मौजे खर्डी ता. चोपडे जि. पूर्व खानदेश

सही
नथु राघो पाटील रा. खर्डी
नो० नं० १६

## NOTICE

Notice is here by given that the Municipal Committee at Murtizapur, in the Akola District, in accordance with the resolution passed as required by Section 44 (1) of the Berar Municipal Law, 1886, at a special meeting held on the 9th October 1916, proposes to impose, under Section 41 (1) (A) (b), a tax on persons carrying a trade of ginning cotton or pressing the same into bales by means of steam or Mechanical process within Municipal limit at the rates and on the terms hereinafter stated.

The proposal will be taken into further consideration on the expiry of one month from the date of the first publication of this notice and any objections or suggestions in respect thereof must be forwarded in writing to the Secretary of the Municipal Committee before the expiry of the said period.

RATES

(1) For each boja of 10 mounds ginned..............................6 pies

(2) For each bale of 14 Mounds, pressed..............................9 „

The Tax shall be payable in one instalment on the 1st August each year.

B. M. Pandit.
Secretary Municipal
Committee Murtizapur.

No. N. 63

## NOTICE

Notice is hereby given that the Municipal Committee at Murtizapur, in the Akola District, in accordance with a resolution passed as required by Section 44 (1) of the Berar Municipal Law, 1886, at a special meeting held on the 9th October 1916, proposes to impose, under Section 41 (1) (A) (a) a tax on buildings and lands within Municipal limits at the rates and on the terms hereinafter stated.

The proposal will be taken into further consideration on the expiry of one month from the date of the first publication of this notice and any objections or suggestions in respect thereof must be forwarded in writing to the Secretary of the Municipal Committee before the expiry of the said period.

—×—×—+—×—

(1) The Municipal Committee Murtizapur proposes to impose, with effect from the 1st of April 1917, a tax on all buildings and lands, situated within Municipal limits at Murtizapur not being the actual property of the Municipality at a rate calculated as 6¼ per cent on their annual letting value, provided that the tax shall not be levied on buildings and lands the annual latting value of which does not exceed Rupees 10 th

(2) In calculating the amount of the tax, fractions of a Rupee exceeding eight annas are to be taken as one Rupee.

(3) The tax will be payable in advance on the 1st April of every year by the owners of such buildings and lands.

B. M. Pandit.
Secretary Municipal
Committee Murtizapur

N. N. 64

वऱ्हाडसमाचार

मिति माघ शुद्ध १४ शके १८३८

## पब्लिक सर्व्हिसेस कमिशन.

अखेर हो नाहीं करतां करतां ता. २९ जानेवारी रोजीं पब्लिक सर्व्हिसेस कमिशनचा रिपोर्ट एकदाचा बहेर पडला. कमिशनचें काम संपल्यास सुमारें ४॥ वर्षें झालीं; रिपोर्टावर मेंबरांच्या सह्या होऊन ही १॥ वर्ष झालें; इतक्या अवधी नंतर रिपोर्ट वाचण्याविषयींचा लोकांच्या उत्साहाचा पारा बहुतेक शून्यांशावर जाऊन पोंचला होता, आणि रिपोर्टांत केलेल्या शिफारशी पाहिल्यानंतर तो शून्यांशाच्याही खालीं जाईल असें आह्मांस वाटतें. गेल्या अडीच तीन वर्षांच्या अवधींत युद्धाच्या परिस्थितीमुळें हिंदुस्थानच्या लोकांच्या मनाची व त्याबरोबरच हिंदी संस्थानिकांनीं, सैनिकांनीं व लोकांनीं अत्यंत राजनिष्ठापूर्वक केलेल्या अपूर्व साह्यामुळें खुद्द राज्यकर्त्यांच्या मनाची स्थिति इतकी पालटलेली आहे कीं सदर रिपोर्टांत केलेल्या शिफारशींनीं कोणाच्याच मनाचें समाधान होण्याचा संभव राहिलेला नाहीं. पांच वर्षांच्या वयाच्या मुलांसाठीं बेतलेला कोट जसा शिंप्यानें शिवून त्याच्या मुंजीच्या वेळीं आणून दिला असतां तो उघडून ही न पाहतां घडी घालून तसाच कपाटांत ठेवून देण्याच्याच योग्यतेचा ठरतो, त्याप्रमाणें प्रत्यक्ष स्वराज्याची मागणी राष्ट्रीय सभेनें मान्य केल्यावर व ती मागणी सर्व राष्ट्राला संमत झाल्यानंतर आतां सिव्हिल सर्व्हिस मधल्या थोड्याशा जागा हिंदुस्थानच्या लोकांसाठीं इकडे राखून ठेवाव्या वगैरे कमिशनच्या शिफारसी उपहासास्पद वाटल्या तर त्यांत नवल नाहीं. अशा वेळीं कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध करण्यापेक्षां सरकारनें तो प्रसिद्ध न करण्यांतच ज्यास्त शहाणपणा दिसून आला असता. प. स. कमिशनच्या शिफारशींना आतां खरोखर कांहीं महत्त्व राहिलेलें नाहीं. तथापि त्या काय आहेत येवढें कळण्यासाठींच त्यांचा माथितार्थ येथें देतों. थोडक्यांत त्या शिफारशींचा माथितार्थ असा आहे—

पब्लिक सर्व्हिसेसच्या परीक्षा इंग्लंडांत व हिंदुस्थानांत दोन्ही ठिकाणीं एका वेळीं घेतल्या जाव्या ही लोकांची मागणी कमिशनला मान्य नाहीं. सिव्हिल सर्व्हिस परिक्षेस बसण्याच्या वयाची मर्यादा १९ व्या वर्षापर्यंत वाढवावी अशी कमिशनची सूचना आहे. इंग्लंडांतल्या प्रोबेशनचा काळ वाढवून तो तीन वर्षांचा करावा. डि. व सेशन जज्जांच्या ४० जागा ब्यारिस्टरांच्यासाठीं राखून ठेवाव्या; सिव्हिल स. मधील ४१ जागा प्रांतिक सर्व्हिस मधील अंमलदारांसाठीं राखून ठेवाव्या; सि. स. मधल्या ९ जागा दरसाल हिंदुस्थानांत भराव्या. पैकीं २ निवडणुकीनें व ७ चढाओढीच्या परिक्षेनें, परीक्षेस बसणारे उमेदवार पदवीधर असून ते सरकारानें निवडावे. सध्यां कांहीं बाबतींत वर्णभेदावरून पगारासंबंधाचा प्रश्न विचारांत घेतला जातो. हा कृत्रिम भेद मोडून टाकावा; कांहीं कांहीं खात्यांतून कमींत कमी इतके हिंदी लोक घेतलेच पाहिजेत असा नियम करावा. पण हा नियम सार्वत्रिक असूं नये. हिंदुस्थानांत धंदेशिक्षणाच्या शाळा स्थापन कराव्या व आहेत त्यांचा विस्तार करावा. रिकाम्या झालेल्या जागेसाठीं जाहिराती देऊन उमेदवार बोलवावे व त्यांतून निवड करणाऱ्या कमिटींत हिंदी गृहस्थ ही असावे व प्रत्येक सर्व्हिसमध्यें निरनिराळ्या जातींचीं किती हिंदी माणसें आहेत या विषयींचा तक्ता दर १० वर्षांनीं प्रसिद्ध होत जावा. युरोपियन नोकरांना हुंडणावळ देण्याची पद्धत बंद करावी, पण ज्यांना सध्या ती मिळत आहे त्यांच्या पगारांतच तितकी वाढ करावी. इ. इ. मुख्य मुख्य शिफारशी अशा आहेत. किरकोळ शिफारशी ह्मणजे पेनशन देण्याचें वय, रजेचे नियम वगैरे यांच्या संबंधानें विशेष कांहीं सांगण्यासारखें नाहीं. न्याय व अंमल बजावणी हीं खातीं निराळीं काढण्याच्या प्रश्नासंबंधानें हिंदुस्थानांत आज पंचवीस वर्षें अतिशय चळवळ चालली आहे व विलायतेंतल्या अनेक विचारी व वजनदार पुरुषांना ही मागणी अगदीं रास्त वाटत असल्याबद्दल लेखी पुरावे आहेत. पण या प्रश्नासंबंधानें कमिशन अगदीं स्तब्ध आहे! आणि धंदेशिक्षणासंबंधाचा प्रश्न कमिशनच्या चौकशीच्या मर्यादेंत खरोखर येत नसतां त्या संबंधानें कमिशननें आपला अभिप्राय मोठ्या प्रतिष्ठेनें दिला आहे. कमिशनच्या या रिपोर्टानें ज्याचें समाधान होईल असा विचारी हिंदी गृहस्थ क्वचितच सापडेल. कमिशनमधील एकंदर बारा मेंबरांत कै. नामदार गोखले, ना. चौबळ व न्या. अबदुल रहीम असे तीनच हिंदी गृहस्थ होते. या तिघांपैकीं पहिल्या दोघांना रिपोर्टांतल्या शिफारशी अगदीं असंमत होत्या. कारण न्या. रहीम यांनीं या रिपोर्टावर सही न करतां आपला स्वतंत्र ९६ पृष्ठांचा जो रिपोर्ट लिहिला आहे त्याच्या आरंभींच त्यांनीं ह्मटलें आहे कीं आपल्या रिपोर्टांतल्या बहुतेक गोष्टींची चर्चा आपण कै. ना. गोखले यांच्याशीं केली होती व त्यांचे आपणांशीं सहमत होतें. ना. चौबळ यांना सरकारी अधिकाऱ्यांच्या मताशिवाय निराळे असें स्वतःचें मत आहे ही गोष्ट त्यांच्या आजपर्यंतच्या सार्वजनिक चारित्र्यांत जशी कोठें दिसली नाहीं, तशी या कमिशनच्या रिपोर्टांत ही दिसून येत नाहीं, व त्यांच्या पासून तशी कोणी अपेक्षा ही केली नाहीं. तीन हिंदी गृहस्थांपैकीं दोघांचें मत कमिशनच्या शिफारशींना अगदीं विरुद्ध होतें ही गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. या दोघांच्या मतांचा सारांश ठळक गोष्टी पुरता असा आहे. न्या. रहीम ह्मणतात कीं कांग्रेस आजपर्यंत ह्मणत आली आहे त्या प्रमाणें इं. सि. सर्व्हिसची परीक्षा इंग्लंडांत व हिंदुस्थानांत एका काळीं घेतली जावी. न्याय व अंमलबजावणी खात्यांची पूर्ण फारकत व्हावी. न्यायखात्यांतील एक तृतीयांश जागांवर फक्त आय. सी. एस. मधील गृहस्थांची नेमणूक व्हावी. बाकीच्या दोन तृतीयांश जागा कायदेपंडित अशा ब्यारिस्टरांना द्याव्या. हिंदी ब्यारिस्टरांसाठीं डिस्ट्रिक्ट जज्जांच्या ७२ जागा व युरोपियन ब्यारिस्टरांसाठीं १० राखून ठेवाव्या. उमेदवारांची निवड त्यांच्या अंगच्या गुणांच्या परीक्षेनें व्हावी. तो अधिकार मिश्र कमिटीकडेस असावा. कोणाही एका व्यक्तीचे हातीं नसावा. न्यायाधिशावर कलेक्टराचा ताबा असूं नये, आणि इलाख्याचे राजधानींतील पोलीस कमिशनरला जेवढे म्याजिस्ट्रेटाचे अधिकार असतात, त्यापेक्षां ज्यास्त अधिकार कलक्टरांस असूं नयेत. प्रांतिक सर्विसमध्यें नेमिल्या जाणाऱ्या म्याजिस्ट्रेटांची कायद्याची परीक्षा पास झालेली असावी इ. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे आज इतकीं वर्षें कांग्रेस ज्या मागण्या सयुक्तिक प्रमाणांच्या जोरावर करीत आहेत व ज्यांसंबंधानें स्वतंत्र विचाराच्या इंग्रज गृहस्थांची ही अनुकूलता आहे त्याच मागण्या न्या. अबदुल रहीम यांच्या शिफारशींत ग्रथित केलेल्या आहेत. पण प. स. कमिशनमध्यें बहुसंख्या इकडील गोऱ्या अधिकाऱ्यांची किंवा त्यांच्या विचाराच्या गृहस्थांची असल्यामुळें व ना. चौबळासारखे हिंदी गृहस्थ त्यांच्याच चष्म्यानें हिंदी प्रश्नांकडे पाहणारे असल्यामुळें न्या. अबदुल रहीम यांना एकट्यांना स्वतंत्र रिपोर्ट लिहिण्याची पाळी आली. ना. गोखले रिपोर्टावर सह्या करण्याचे वेळीं विद्यमान असते तर त्यांनीं न्या. रहीम यांच्याच ह्मणण्याला दुजोरा दिला असता व त्यांच्या प्रभावशाली लेखणींनें न्या. रहीम यांच्या रिपोर्टाला केवढें नैतिक पाठबळ मिळालें असतें त्याचा अंदाज करतां येणें कठीण आहे. असो.

बदललेल्या परिस्थितीमुळें आतां या कमिशनच्या रिपोर्टाचे कांहीं महत्त्व राहिलें नाहीं व ते आतां पुस्तकांच्या कपाटाला शोभा आणण्याचेच उपयोगाचे आहेत येवढें म्हटलें म्हणजे पुरे आहे.

## मध्यप्रांतांतली जंगलें.

नुकत्या हातीं आलेल्या 'इंडियन फॉरेस्टर' नांवाच्या सरकारी नियत कालिकाच्या जानेवारीच्या अंकांत मध्यप्रांतांतल्या गुर चराई संबंधानें मि. सी. ए. मालकम (इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस) यांचा एक लेख आला आहे. तो विचार करण्यासारखा आहे. त्यांत ते ह्मणतात—जंगल खात्याकडून वेळोवेळीं जे वर्किंग प्लॅन प्रसिद्ध होतात त्यांत गुरांच्या चराईच्या प्रश्नाला बरेंच महत्त्व वाढत्या प्रमाणावर देण्यांत येत असतें. तेव्हां हा गुरचराईचा प्रश्न आहे तरी काय हें पाहिलें पाहिजे. ४० किंवा ५० वर्षांपूर्वीं जंगल खात्यानें जंगल ताब्यांत घेतलें तेव्हा या जंगलांची दुर्दशा होती. जंगलाच्या रक्षणासाठीं सरकारानें प्रथम लांकडे तोडण्याची व गुरें चारण्याची मनाई केली. इकडे शेतांची लागवड झपाट्यानें वाढत गेली व गुरांना चरण्यासाठीं जमीन कमी झाली तशी जंगलांवर लोकांची धाड आली, व असंरक्षित जंगलांतून लोक लाकडें तोडून नेऊं लागले. पण यामुळें संरक्षित

जंगलांचा एक अप्रत्यक्ष फायदाच झाला. गुरांच्या चराईनें व असंरक्षित जंगलांतलीं झाडें तोडल्यानें जंगलाचें नुकसान होतें ही १५।२० वर्षांपूर्वीची समजूत चुकीची होती. मोल्वान् लाकडांच्या झाडाशेजारी उंच गवत वाढणें श्रेयस्कर नसतें. त्याच्या योगानें त्या झाडांची वाढ खुंटते व उन्हाळ्यांत आग लागण्याची भीती ही ज्यास्त असते. तेव्हां गुरांच्या चराईचा प्रश्न या दृष्टीनें जंगलांच्या फायद्याचा आहे. गुरांना चरूं द्यावयाचें, पण कोणत्या गुरांना हा पुढचा प्रश्न आहे. शेळ्या मेंढ्याना चरूं देणें वाईट आहे. तथापि त्यांना अगदींच मनाई करतां येत नाहीं. ह्मशी व रेडे त्यांच्या भारी वजनानें ल्हान सान झाडांचा सत्यानास करतात, पण त्यांना ही अगदींच बंदी करतां येत नाहीं. राहतां राहिले गाई बैल. अनुभवांतीं असें सिद्ध झालें आहे कीं यांना चरूं देण्यास हरकत नाहीं. दर गुरास ३ एकर जागा यांना बस आहे. शेतीच्या उपयोगाच्या गुरांची सोय प्रथम करावी हें सरकारचें आतांपर्यंतचें धोरण आहे. पण पुष्कळ वेळां गांवचे विशेष वजनदार लोक इतर गुरांना ही चारण्याची परवानगी मिळवितात. याला उपाय ह्मणजे शेतकीच्या गुरांना चारण्याची फी जरा कमी ठेवावी, व इतरांना ज्यास्त ठेवावी, व शेतकऱ्यांना दर नांगरामागें ४ बैल या मानानें ता. १ जुलैपर्यंतच परवाने द्यावे. बैल तयार करून विकणें, किंवा दूधदुभत्यासाठीं गाई बाळगणें वगैरे कामें करणारांकडून ज्यास्त फी घ्यावी, व ही प्रत्येक जिल्ह्याच्या मगदुराप्रमाणें कमज्यास्त असावी. वऱ्हाडांत शेतकऱ्यांना १। रु० पडतो तर मध्यप्रांतांत कांहीं ठिकाणीं दर नांगरामागें ६ रु. २ आणे ही [illegible] गुरांच्या चराईच्या फीचें हें [illegible] आहे. तथापि त्यांत एक गोष्ट करावयास पाहिजे आहे. प्रत्येक जिल्ह्यांत शेतकीचीं गुरें किती घ्यावयाचीं ती संख्या ठरविली पाहिजे. सेटलमेंट रिपोर्ट ह्मणतात कीं १ गुरांना ८ एकर हें प्रमाण उदाहरणाचें आहे पण २० एकरांमागें ३ गुरें धरलीं तर शेतकऱ्यांच्या गरजा पूर्णपणें भागतील असें वाटतें. यांत मात्र लबाड्या होऊं देऊं नयेत; ह्मणजे ज्याच्याजवळ शेतीचीं गुरें नाहींत अशाला दुसऱ्याच्या नांवावर आपलीं व्यापारोपयोगी गुरें चरूं देऊं नयेत. येवढी खबरदारी घेतली ह्मणजे शेतकऱ्यांच्या गुरांना ३ आणे व इतरांना ८ आणे दर ठेविल्यानें काम भागेल. हैद्राबाद संस्थानांत गाईंना मोफत चरूं देतात व बैलांचे मात्र पैसे घेतात पण हें गैर आहे. त्यामुळें पैसे कमावणारांवर कमी ओझें पडतें व गरीब बिचारे शेतकरी ओझ्याखालीं दडपले जातात.

मि. माल्कम यांचे हे विचार जंगल खात्याच्या अधिकाऱ्यांनीं विचार करण्यासारखे आहेत यांत शंका नाहीं.

## सक्तीचें व मोफत शिक्षण.

कोणतीही चांगली गोष्ट हिंदुस्थानांतल्या इंग्रज अधिकाऱ्यांकडून व वर्तमानपत्रकारांकडून मान्य करवून घेण्याला किती प्रयास पडतात व वेळ लागतो याचें एक ठळक उदाहरण मातृभाषेच्या द्वारें शाळांतून शिक्षण देण्याचा प्रश्न हें आहे. या प्रश्नाची चर्चा आज सहा सात वर्षें या देशांत सारखी सुरू आहे. तेव्हां आतां कोठें डॉ० म्याकिकन सारखे त्रिन अधिकारी व लॉर्ड चेम्सफोर्ड साहेब सारखे उच्च अधिकारी इंग्रज या सूचनेला आपली संमति जाहिररीतीनें देऊं लागले आहेत. सक्तीच्या व मोफत शिक्षणाविषयींचा प्रश्न वरील प्रश्नाहून अधिक खर्चाचा असल्यामुळें त्याला अशा प्रकारें संमति मिळण्यास किती दिवस लागतील हें कोणीं सांगावें? पण मूळचेंच जें सोनें आहे तें आपली योग्यता अखेर सर्वांकडून कबूल करवून घेतल्यावांचून राहणार नाहीं. भोपाळच्या बेगम साहेबांनीं आपल्या वाढदिवसाच्या प्रसंगीं आपल्या राज्यांत सक्तीचें व मोफत शिक्षण सुरू करण्याचा संकल्प विदित केला. त्यासंबंधानें आंग्लो इंडियन पत्रांतून प्रशंसापर उद्गार निघूं लागले आहेत यावरून आज नाहीं उद्या पण लवकरच या प्रश्नाची अवश्यकता इंग्रज सरकारास दिसून येईल अशी आमची खात्री आहे. कलकत्त्याचें एक इंग्रजी पत्र ह्मणतें कीं ही सुधारणा प्रथम देशी संस्थानांनीं करून पहावी, ह्मणजे अनुभवानें या प्रश्नावर पुष्कळ प्रकाश पडेल. नुसता प्रकाश पडून काय उपयोग? पाहणारानें डोळे गच्च मिटून घेतल्यावर प्रकाश काय करणार? देशी संस्थानांनीं या बाबतींत अग्रेसर व्हावें हें ह्मणणें ठीक आहे व तीं अग्रेसर होत ही आहेत. पण ब्रिटिश सरकार त्यांचें अनुकरण कधीं करूं लागणार?

## शेतकऱ्यांची सुधारणा.

हिंदुस्थान सरकारचे शेतकी विषयक सल्लागार मंत्री ना. मि. जेम्स म्याकेना यांनीं [illegible] येथें आपल्या एका व्याख्यानांत सांगितलें कीं शास्त्रीय पद्धतीनें शेतकीची सुधारणा करून हिंदुस्थानचे शेतकरी ज्यास्त धान्य पिकवीत नाहींत हा त्यांचा दोष नाहीं. कोणती ही सुधारणा खरोखर फायद्याची आहे अशी त्याची खात्री झाल्यावर तो ती करण्यास कधीं माघार घेत नाहीं. ही खात्री होण्यास त्याला शिक्षण मिळालें पाहिजे. तें होईपर्यंत शेतकीसुधारणा मंदगतीनेंच होणार. यावर मद्रासचे गव्हर्नर साहेब ना. लॉर्ड पेटलांड यांनीं हिंदी शेतकऱ्यांची तारीफ केली व त्यांना त्यांच्या धंद्याचें उत्कृष्ट ज्ञान असतें, आतां फक्त शेतकी खात्यानें त्यांच्या पुढें सुधारणा मांडल्या पाहिजेत ह्मणजे स्कॉटलंडमधल्या शेतकऱ्यांप्रमाणें हिंदी शेतकरी ही शेतीची भरभराट करतील. हें सांगतांना स्कॉटलंडचे शेतकरी सुशिक्षित नसले तरी साक्षर असतात, व त्यांना शास्त्रीय तत्त्वाचें ग्रहण करण्यापुरतें तरी शिक्षण मिळालें असतें ही गोष्ट गव्हर्नर साहेबांच्या लक्षांतून चुकली असें दिसतें. शेतकी खात्यानें आजपर्यंत शेतकी शास्त्रीय पद्धतीवर कशी करावी या विषयींचें ज्ञान हिंदी शेतकऱ्यांना करून देण्याविषयीं पुष्कळ परिश्रम केले आहेत ही गोष्ट आह्मांला मान्य आहे. पण त्यांच्या परिश्रमाच्या व सरकारच्या खर्चाच्या मानानें फळ प्राप्त झालें नाहीं याचें कारण शेतकऱ्यांच्या अंगीं शिक्षणाच्या अभावीं त्या शास्त्रीय माहितीचें ग्रहण करण्याची शक्तिच नाहीं ही गोष्ट नाकबूल करतां यावयाची नाहीं. जेथें शेतकऱ्यांना शिक्षण मिळालें आहे तेथें अधिक फलोत्पत्ति ही दिसत आहे. त्रावणकोर संस्थानांतले शेतकरी अधिक शिकलेले असल्यामुळें तेथें अधिक सुधारणा ही झालेली दिसते. दुसरी गोष्ट सरकारी अधिकाऱ्यांनीं लोकांचे ठायीं विश्वास उत्पन्न केला पाहिजे ही आहे. त्रावणकोरचे शेतकरी प्रयोगासाठीं आपले नारळीचे मोठाले बाग सरकारी अधिकाऱ्यांचे स्वाधीन करतात, आणि ब्रिटिश राज्यांत बहुधा असा प्रकार क्वचित् दिसतो, याचें कारण काय? इकडे शेतकी खात्यांतल्या उच्च जागीं जाणत्या हिंदी लोकांना मनाई केल्यावर लोकांचा सरकारावर भरंवसा कसा बसावा?

## इंदूरचें साहित्यसंमेलन.

आमचा इंदूरचा बातमीदार लिहितो कीं नववें साहित्यसंमेलन इंदुरास भरविण्यासंबंधानें इंदुरच्या महाराष्ट्रीय मंडळीनें चांगलें मनावर घेतलें असून श्रीमंत महाराज साहेब वे दिवाणसाहेब यांची त्या गोष्टीला पूर्ण अनुकूळता मिळाली आहे. तेथील साहित्य सभेच्या सभासदांच्या दोन सभा या प्रश्नाच्या विचारासाठीं होऊन येत्या शिमग्याचे दिवसांत तें इंदुरास भरविण्याचा विचार नक्की झाला असून वर्गणी गोळा करण्याचें काम ही सुरू झालें आहे. शिमग्याचे दिवसांत आफिसांना वगैरे सुटी असल्यामुळें बाहेरच्या विशेषतः दूरदूरच्या प्रांतांतल्या लोकांना जाण्यास थोडीशी अडचण पडेल. पण साहित्याच्या अभिवृद्धीचें महत्व व इंदूरच्या लोकांचा उत्साह [illegible] या गोष्टीकडे लक्ष देऊन मराठी साहित्याविषयीं प्रेम व आस्था बाळगणारे [illegible] अशा अडचणींतून ही मार्ग काढतील व संमेलनाला जाऊन आपलें कर्तव्य बजावतील अशी आह्मी आशा करतों. इंदुरास आगष्ट पासून जानेवारीपर्यंत प्लेग असतो. व उन्हाळ्यांत श्रीमंत महाराज साहेबांच्या स्वारीचा मुकाम थंड हवेच्या जागीं असतो. यांमुळें इंदुरास संमेलन भरवावयाचें तर तें मार्चच्या आरंभींच भरविलें पाहिजे, दुसरा मार्ग नाहीं, अशा अडचणीमुळें इंदुरकरांनीं येत्या होळींत ह्मणजे ता. ९।१०।११ मार्च रोजीं तें भरविण्याचें ठरविलें आहे. इंदूर, ग्वालेर, बडोदे, वगैरे मराठी राज्यांचे जे अवशेष भाग राहिले आहेत त्यांचा महाराष्ट्राशीं पूर्ववत निकट संबंध राहणें अवश्य आहे या ही दृष्टीनें इंदूर सारख्या संस्थानांत व श्री. महाराज साहेबांच्या आश्रयाखालीं तें भरविण्यांत येत आहे ही गोष्ट आह्मी अभिनंदनीय समजतों, आणि नागपूर, वऱ्हाड महाराष्ट्र, कर्नाटक, सागर, काशी, कलकत्ता वगैरे ठिकठिकाणची मंडळी यंदा तेथें जाऊन मातृभाषेच्या आव्हानास मान देतील अशी उमेद बाळगतों. यंदा तेथें ज्या विषयांची चर्चा व्हावयाची आहे त्यांची यादी या आठवड्यांतच प्रसिद्ध होणार आहे असें कळतें.

## हे चोचले कधीं सोडणार?

एखादा मनुष्य तोंडानें मी उपाशी मरत आहे असें सांगूं लागला व त्याबरोबर त्याचे तोंडांतून जिलबी खाल्ल्याचा ढेंकर आला, तर त्याचे बोलण्यावर कोणाचा तरी विश्वास बसणें शक्य आहे काय? हिंदुस्थानांतला बहुजनसमाज अत्यंत दरिद्री आहे यांत शंका नाहीं. पण त्या समाजांतले कांहीं धनिक लोक व राजेरजवाडे त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून आपली चैन कमी न करतां उलट वाढवित चालले आहेत हें पाहून हिंदुस्थानच्या दारिद्र्याविषयीं परकीय साशंक होतें असतात. आणि कां होऊं नये? मोटार गाड्यांचेंच उदाहरण घ्या. व त्यांचा खप गेल्या वर्षांत किती वाढला आहे तो पहा. मोटार सायकली किंवा वॅगन्स सोडून नुसत्या मोटार गाड्या घेतल्या तर १९१५ सालीं त्या ६६॥ लक्ष रुपये किंमतीच्या हिंदुस्थानांत आल्या होत्या. १९१६ सालीं त्याच १ कोटी १६॥ लक्षांच्या आल्या! सर्व प्रकारच्या मोटार गाड्या, मोटारसायकली व त्यांचें सामान वगैरे धरलें तर तें १९१५ सालीं ८८। लक्षांचें आलें होतें. १९१६ सालीं १५९॥ लक्षांचें आलें. मोटार गाड्या नव्हत्या त्यावेळीं आमच्या देशांतल्या राजे महाराजांना व श्रीमंतांना घोड्याच्या गाडींत कांटे बोचत नव्हते, पण आतांच ते कां बोचावे? याचें कारण निवळ श्रीमंतीचे चोचले हें आहे. आपल्या देश बांधवांना खाण्यास मिळत नाहीं, व देशी उद्योग धंद्यांना उत्तेजन नाहीं ह्मणून इंग्रज सरकारानें स्वदेशी वगैरे सामान देशी खरीद करावें ह्मणून एकीकडे [illegible], आणि [illegible] वेळीं आमच्या श्रीमंतांनीं दरसाल [illegible] रुपये असल्या चोचल्यांच्या पायीं देशा बाहेर आपल्या हातानें लोटावयाचे, या [illegible] किंवा देशाभिमानाला काय ह्मणावें ते आह्मांस कळत नाहीं.

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या दहा बारा दिवसांतली युद्धसंबंधीं मोठी गोष्ट ह्मणजे उत्तर समुद्रांत जर्मन व ब्रिटिश यांच्या विनाशक बोटींत उडालेली चकमक ही होय. ही चकमक हॉलंडच्या किनाऱ्यापाशीं झाल्यामुळें डच राष्ट्राकडून आलेली बातमी निष्पक्षपाताची व खरी समजली पाहिजे व तिच्यावरून या चकमकींत जर्मनीनें चांगलाच मार खाल्ला असला पाहिजे ही गोष्ट पूर्णपणें सिद्ध होते. या चकमकींत जर्मनीच्या ३० पासून ४० बोटींची हानि झाली असें डच वर्तमानपत्रें ह्मणत आहेत. पण आपण फक्त ३ बोटी पाठविल्या होत्या असें जर्मन ह्मणत आहेत! जर्मनीचा सत्यवादीपणा सध्याच्या युद्धांत अनेकवेळां उघडकीला आला आहे. तेव्हां त्यांच्या बोलण्यावर किती भरंवसा ठेवावा

हें सांगण्याची आतां अवश्यकता उरली नाहीं.

## पूर्व रणक्षेत्र

यांत विलक्षण थंडी असून बर्फ पडत आहे. त्यामुळें उभयपक्षांना मोठी अडचणच झाली आहे. तथापि शत्रूनें सेरेठवर पश्चिमेच्या बाजूनें हल्ला करण्याचा प्रयत्न केला असतां राशियनांनीं त्यांना मागें हटविलें व एकंदर स्थिति समाधानकारक आहे अशी बातमी आहे. बल्गेरियन लोक डान्यूब नदीचा ताबा मिळविण्यास पहात आहेत, पण तो ही अद्याप त्यांना मिळालेला नाहीं. पूर्वेकडील रणक्षेत्रांत तुर्क लोकांचे बरेच हल्ले राशियानें परतविले व पुष्कळ शत्रु कैद केले. रिगाकडे जर्मनीनें पुढें चाल करण्याचे यत्न केले. अजून ही मिटौवर जर्मन लोक ग्यासचा प्रयोग करून हल्ला करीत आहेत व लढाई चालली आहे व जयापजय होत आहेत, पण एकंदरींत राशियाची सरशी आहे.

## पश्चिम रणक्षेत्र

गेल्या आठवड्यांत जर्मन बादशहाच्या वाढदिवसाचे वेळीं व्हर्डुनवर पुनः तुटून पडून आपली राजनिष्ठा प्रकट करण्याचा जर्मन लोकांचा बेत होता, पण तो फसला. कांहीं थोडेसे फ्रेंच खंदक त्यांनीं घेतले, पण लगेच दुसरे दिवशीं ते त्यांना परत द्यावे लागले. सॉमकडे ब्रिटिशांनीं एक महत्त्वाचें उच्च ठिकाण हस्तगत केलें. याशिवाय ह्मणण्यासारखें कांहीं घडलें नाहीं. स्वित्झर्लंडवर स्वारी करण्याच्या हेतूनें जर्मनी आलसेसमध्यें सैन्य आणून ठेवीत आहे हा लोकांचा तर्क अद्यापही चालू आहे. पण हे तर्कच होत. जर निश्चितपणा असेल तर तो एक गोष्टींत आहे, आणि ती गोष्ट ह्मणजे ही कीं कसलाही प्रसंग आला तरी पश्चिम रणक्षेत्रांत मित्रराष्ट्रांची बाजू इतकी मजबूत आहे कीं त्यांना भिण्याचें कांहीं कारण नाहीं, आणि जनरल हेग यांनीं आपल्या खलित्यांत हेंच स्पष्टपणें दाखविलें आहे कीं सॉमच्या लढाईंत जर्मन सैन्याच्या मजबुतीची खरी परीक्षा होऊन चुकली आहे.

## √ सरकारी अधिकाऱ्यांकडून खुलासा.

दहा पंधरा वर्षांपूर्वींचें लोकांविषयींचें वर्तन आणि आतांचें वर्तन यांची जर कोणी तुलना करून पाहील तर त्याला विलक्षण अंतर दिसून येईल. पूर्वीं सरकारी अधिकाऱ्यांकडून लोकांना अप्रिय असें वर्तन घडलें तरी त्याबद्दल त्यांना कोणी विचारता पुसता नव्हता व वर्तमान पत्रांतल्या टीकेची त्या वेळचे सरकारी अधिकारी पर्वा करीत नसत. आतां असें वर्तन घडतांच कायदे कौंसिलचे लोकनियुक्त प्रतिनिधि त्याबद्दल धिटाईनें प्रश्न विचारतात व वर्तमानपत्रांतल्या टीकेकडे ही अधिकाऱ्यांना दुर्लक्ष करतां येत नाहीं. गेल्या आठवड्यांत या गोष्टीचीं दोन उदाहरणें दिसून आलीं. आमच्या मध्यप्रांताची प्रांतिक परिषद भरण्याच्या वेळीं आमच्या प्रांताचे मुख्य अधिकारी ना० सर रॉबर्टसन यांनीं मिसेस आनी बिझांट बाईंना मध्यप्रांतांत येण्याचे वेळीं बंदी केली होती व त्याबद्दल त्यांनीं पुढें खुलासाही केला. पण हा खुलासा लोकांना समाधानकारक वाटला नाहीं, ह्मणून पुनः या खुलाशावर टीका चालू राहिल्यानें त्या खुलाशाचा पुनः खुलासा करण्याचें त्यांना अगत्य पडलें. प्रांतिक परिषदेतर्फे जें डेप्युटेशन सर साहेबांना भेटण्यास गेले होतें तेव्हां त्यांनीं तो करण्याची संधी साधून असें सांगितलें कीं बाईंना प्रांतिक परिषदेला जाण्यास बंदी करण्याचा उद्देश नव्हता. कारण ती सभा कायदेशीर व राजनिष्ठ पद्धतीनें काम करणारी आहे; पण त्याचवेळीं दुसरी एक राजकारणी सभा होती तिच्याविषयीं सरकार साशंक होतें व ती शंका अनाठायीं नव्हती; कारण बाईकडून आलेले एक गृहस्थ मर्यादातिक्रम करून बोलले. हा सर साहेबांचा खुलासा विचारी माणसास कितपत पटेल तें सांगतां येत नाहीं. कारण, जर सदर गृहस्थांनीं असें भाषण खरोखरी केलें असेल तर त्यांच्या भाषणांतलीं कायद्याचें उल्लंघन करणारीं कोणतीं वाक्यें होतीं तें सर साहेबांनीं दाखवावयास पाहिजे होतें, व अशा निरर्गल बेकायदेशीर भाषणाबद्दल त्या गृहस्थावर खटला करण्याची सत्ता ही सरकारचे हातीं होती. पण ह्या सत्तेचा त्यावेळीं त्यांनी उपयोग कां केला नाहीं व अपात्रीं क्षमा दाखवून आतां मागाहून त्यासंबंधानें खुलाशांत उल्लेख कां केला असे प्रश्न कोणिही साहजिक विचारील. हा आमचा नुसता तर्क नाहीं. तर आक्षेपित गृहस्थांनीं खरोखर हे प्रश्न विचारून अधिकाऱ्यांस तसें आव्हान ही तावडतोब केल्याचें आमचे वाचण्यांत आहे, आणि या आव्हानाला योग्य उत्तर मिळालें नाहीं, तर सरकारचीच बाजू लंगडी होतो हा लोकांचा झालेला ग्रह दूर होणें कठीण आहे. दुसरें उदाहरण संयुक्त प्रांताचे ले. ग. सर जेम्स मेस्टन यांचें आहे. अलीकडे सर्व पत्रांच्या चर्चेस व कडक टीकेस पात्र झालेल्या ‘राऊंड टेबल’ नामक राजकीय मंडळीच्या उपद्व्यापांत सर जेम्स मेस्टन यांचें व मि. मारिस नांवाच्या मुख्य पोलीस अधिकाऱ्यांचें अंग आहे ही गोष्ट त्या मंडळीचे एक प्रमुख नायक मि. कर्टिस यांनीं आपल्या पत्रांत लिहिण्याच्या ओघांत सांगून टाकिल्यापासून सरकारी अधिकाऱ्यांना राजकारणी चळवळींत— आणि तें ही लोकांनीं जिचा अत्यंत कडक शब्दांनीं निषेध केला आहे व जी हिंदुस्थानच्या लोकांना वसाहतीचे गुलाम करून सोडील अशी लोकांना भीती वाटत आहे अशा चळवळींत— कसें अंग ठेवतां येतें हा प्रश्न उपस्थित झाला होता; व त्याबद्दलची लोकांत उत्पन्न झालेली क्षुब्धता ओळखून ह्मणा किंवा व्हाइसराय साहेबांचें लक्ष तिकडे जाऊन त्यांनीं आग्रह केल्यावरून ह्मणा, पण सर जेम्स मेस्टन व मि. मारिस यांनीं त्यासंबंधाचे प्रश्न कायदे कौंसिलांत विचारले जाणार होते त्याच्या आधींच आपापल्या वर्तनाचा खुलासा केला. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं राउंड टेबलची मंडळी ही राजकारणांत दुराग्रही नसून आस्ट्रेलिया, आफ्रिका, कानडा, वगैरे वसाहतींच्या सरकारास तेथील स्थानिक सुराज्यसंघटना करण्याचे कामीं तीची मदत झालेली आहे, व तशीच मदत हिंदुस्थाना संबंधच्या वादग्रस्त प्रश्नांचा निकाल लावण्याचे कामीं होईल अशा बुद्धीनें त्यांनीं मि. कर्टिस यांचा सरकारी बंगल्यावर पाहुणचार केला व सरकारी छापखान्यांतून त्यांचें पत्र छापवून देणें वगैरे मदत केली. पण या पुढें सरकारी अधिकाऱ्यांनीं राजकारणांत पडूं नये हा हिंदुस्थानसरकारनें घालून दिलेला नियम आपण पाळूं. हा ही खुलासा विचारी माणसांस पटण्यासारखा नाहीं, आणि हिंदुस्थानसरकारचा निर्बंध यापुढें पाळण्यांत येईल या शेवटच्या आश्वासनानें तर पूर्वीच्या सगळ्या खुलाशाचा पंगूपणा आपोआपच व्यक्त केला आहे. असो. या संबंधांत ज्यास्त लिहिण्याची अवश्यकता आह्मांस तूर्त दिसत नाहीं. एकंदरींत येवढ्या मोठ्या अधिकाऱ्यांना जाहिररीतीनें आपल्या वर्तनाचा खुलासा करण्याची पाळी आली हाच लोकमताचा आह्मी मोठा विजय समजतों, येवढें सांगितलें ह्मणजे पुरे आहे.

## शिक्षणविषयक सुधारणा.

युद्धामुळें इंग्लंडच्या लोकांचें लक्ष आपल्या शिक्षणपद्धतींतल्या दोषांकडे जाऊन ते ती सुधारण्याचे जे प्रयत्न करीत आहेत ते हिंदुस्थानांतल्या शिक्षणविषयक सुधारकांनीं विचार करण्यासारखे आहेत. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे त्यांनीं सुचविलेल्या सुधारणा येणे प्रमाणें आहेत— १ शिक्षणखात्याच्या प्रधानाची योग्यता इतर प्रधानांपेक्षां ज्यास्त मोठी व जबाबदारीची समजण्यांत यावी; २ शिक्षणाच्या सर्व शाखांतून सातत्य असावें; ३ शिक्षकपदावर नियुक्त होणारे पुरुष किंवा स्त्रिया शिक्षणाविषयीं खरोखर आस्था बाळगणाऱ्या व शिक्षणाचें खरें तत्त्व जाणणाऱ्या असाव्या; ४ शील बनविण्याचे कामीं गृहशिक्षणासारखें उत्कृष्ट साधन नाहीं हें तत्त्व पूर्णपणें मान्य करण्यांत यावें. हिंदुस्थानांत शिक्षणासाठीं स्वतंत्र मेंबर नेमण्याची व्यवस्था अलीकडेसच झालेली आहे. इतके दिवस शिक्षणाचें राज्यकारभारांत विशेषसें महत्त्वच समजलें जात नसे. तेव्हां इंग्लंडासारखी स्थिति या बाबतींत प्राप्त होण्यास हिंदुस्थानाला अद्याप बरीच वाट पाहिली पाहिजे. शिक्षणखात्यासाठीं स्वतंत्र मेंबर नेमल्यानें काम भागतें अशांतला प्रकार नाहीं. प्रधानमंडळांत शिक्षण— मेंबराचा दर्जा कोणता आहे या प्रश्नापेक्षां खरोखर अधिक महत्त्वाचा प्रश्न ह्मणजे समाजांत शिक्षकाचा दर्जा काय आहे हा विशेषतः आहे, आणि या बाबतींत तर हिंदुस्थानची स्थिति अत्यंत निराशाजनक आहे. प्राथमिक शाळेच्या शिक्षकाचे पगार एखाद्या मजुराच्या वेतनाहून ही कमी आहेत. शाळेचा मास्तर व त्याच्याच हाताखालचा शिपाई यांच्या पगारांत विशेषसा फरक आढळत नाहीं. जो इतर कोणत्याही धंद्यांत नालायक ठरेल त्याला लिहितां वाचतां आलें ह्मणजे तो शिक्षकाचें काम करण्यास लायक समजला जातो. ही स्थिति कायम आहे तोंपर्यंत हिंदुस्थानच्या शिक्षणांत सुधारणा घडून येणें ही एक स्वप्न सृष्टींतली घटनाच समजली गेली तर मोठेंसें आश्चर्य नाहीं. ही स्थिति सुधारण्याचे कामीं मोठी अडचण ह्मणजे पैशाची आहे हें अह्मी जाणतों. पण या अडचणीला भिऊन कशी सुधारणा होणार? सार्वभौम सरकाराकडून शिक्षणासाठीं देण्यांत येणाऱ्या देणगीचा उपयोग इन्स्पेक्टरांची संख्या वाढविण्यांत किंवा शाळांच्या भव्य इमारती उभारण्यांत अथवा शाळेंतलें सामान झकपक ठेवण्यांत कसा होतो हें सर्वांस माहितच आहे. हातांत पैसे आले ह्मणजे शाळा मास्तरांचे पगार वाढविण्याची आठवण अधिकाऱ्यांना होत नाहीं व नसले ह्मणजे पैसे नाहींत ही सबब आयतीच अडचण ह्मणून दाखविण्यांत येते. सरकार स्वतः त्यांचे पगार वाढवीत नाहीं, आणि लोकल बोर्डासारख्या संस्था त्यासाठीं नवा कर बसविण्यास तयार झाल्या तर त्यांना तसें करूं ही देत नाहीं. ‘आई जेवूं घालीना, बाप भीक मागूं देईना’ अशा स्थितींत उपाशीं मरणाऱ्या पोराप्रमाणें शिक्षकांना दारिद्र्यांत कुचंबावें लागत आहे. मग सुधारणेची आशा कोठून राहणार? शिक्षकांनीं अर्धपोटीं राहून शिक्षण प्रसाराविषयीं आस्था बाळगावी व शिक्षणाचें खरें मर्म ओळखून उत्साहानें आपलें कर्तव्य बजावीत राहावें अशी अपेक्षा कशी करतां येईल? इंग्लंड इतका संपन्न देश असतां ही तेथील शिक्षकांची स्थिति विशेष स्पृहणीय नाहीं अशी ओरड आहे, मग हिंदुस्थानासारख्या दरिद्री देशांत ती विशेषच निकृष्ट असल्याचें नवल काय? शील बनविण्याचें उत्कृष्ट साधन ह्मणजे गृहशिक्षण होय असें जें विलायतेंतल्या रिफॉर्म कौंसिलनें ह्मटलें आहे तें अगदीं रास्त आहे. इंग्लंडांत पुरुष व स्त्रिया यांचीं शिक्षणांत हिंदुस्थानाच्या मानानें अतिशयच प्रगति झाली असतां ही गृहशिक्षणाची योग्य व्यवस्था त्यांना अजून लावतां आली नाहीं, मग जेथें शें. ८० पुरुष व ९२ स्त्रिया अशिक्षित आहेत अशा हिंदुस्थान देशांत ही अडचण किती मोठ्या प्रमाणावर भासत असेल याची कल्पनाच केली पाहिजे.

## शास्त्रज्ञांची परिषद.

ही आज चार वर्षें हिंदुस्थानांत भिन्न भिन्न स्थळीं भरत असते, पण वर्तमानपत्रांतल्या त्रोटक बातम्या वाचण्यापलीकडे तिच्यासंबंधानें लोकांत—चांगल्या सुशिक्षित लोकांत सुद्धां उत्साह दिसून येत नाहीं. कसा यावा? हिंदुस्थानांत खरें शास्त्रीय शिक्षणच मिळत नाहीं. विलायतेंतल्या एखाद्या मुलाच्या हातांत एखादें घड्याळ पडलें कीं तो तें उघडून त्याची स्प्रिंग, चक्रें, व बारीक बारीक यंत्रें बाइकाईनें पाहतो; तेच हिंदुस्थानांतल्या एखाद्या मुलाचे हातांत दिलें असतां तो तें ऐटीनें खिशांत ठेवून त्याच्या साखळीच्या शोभेनें आपण धन्य झालों असें समाधान मानून स्वस्थ बसतो. दोन मुलांमध्यें असा फरक कां दिसावा?

हा त्यांच्या शिक्षणामुळें आलेला आहे. इंग्लंडमधल्या लहान लहान मुलांना वस्तूचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची शक्ति उपजत नसते. पण ती उत्पन्न होईल अशा तऱ्हेचें शिक्षण त्यांना मिळालेलें असतें. हिंदुस्थानांत मुलांची चौकसबुद्धि वाढविण्यापेक्षां ती दाबून ठेवण्यांतच ज्यास्त दक्षता घेण्यांत येते. जेथें विद्यार्थ्यांना शास्त्रीय शिक्षण देण्यांत येतें तेथें सुद्धां विद्यार्थ्यानें टेस्ट ट्यूबला हात लावतां कामा नये, त्यानें फक्त दुरून प्रयोग पहावा अशी खबरदारी घेण्यांत येते. मग शास्त्रीय विषय हा व्याकरणाचे नियमासारखा घोकंपट्टीचा विषय होऊन बसला तर त्यांत त्या विद्यार्थ्याकडे काय दोष आहे? सामान्य व्यवहारांतल्या गोष्टीविषयीं व नैसर्गिक चमत्काराच्या कारणांविषयीं हिंदुस्थानांतल्या सुशिक्षितांचे ठायीं भयंकर अज्ञान आढळतें, मग शास्त्रीय शोधांची चर्चा कोण करणार? व केलेली कोणाला रुचणार? बंगलोर येथें ता० १० पासून १३ डिसेंबरपर्यंत भरलेल्या शास्त्रज्ञांच्या परिषदेंत पांच चारांच्या पलीकडे हिंदी पंडित नव्हते याचें अर्थात् कोणास आश्चर्य वाटावयास नको. शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग शेतकी व उद्योगधंदे यांचा उत्कर्ष करण्याचे कामीं व्हावयास पाहिजे ही म्हैसूरच्या महाराजांनीं प्रदर्शित केलेली इच्छा आज कोणाच्या हृदयांत नाहीं? पण ती इच्छा सफळ होण्याचीं अवश्यक साधनें कोठें आहेत? टाटानीं वीस बावीस लक्ष रुपयांची आपली इस्टेट देऊन बांधलेल्या रिसर्च इन्स्टिटयूटची आज काय अवस्था आहे? आतांपर्यंत किती विद्यार्थी त्यांत व्यवहारोपयोगी शास्त्रीय शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत? इन्स्टिटयूटसाठीं टोलेजंग इमारती व प्रोफेसरांसाठीं भव्य बंगले-छे: प्रासाद—बांधण्यांत व विलायतेहून आणिलेल्या प्रोफेसरांचे भरीं पगार देण्यांत सारे पैसे उधळणें याला जर शास्त्रीय प्रगति ह्मणावयाचें असेल तर रिसर्च इन्स्टिटयूटनें मोठीच प्रगति केली आहे असें ह्मटलें पाहिजे. परवाच्या शास्त्रज्ञांच्या परिषदेंत अध्यक्ष डा० बोर्न यांच्या भाषणांत तरी सरकारनें लक्षावधि रुपयांच्या रकमा शास्त्रीय शोधांच्या प्रीत्यर्थ खर्च केल्या आहेत अशी सरकारतर्फेची वकीली करण्यापलीकडे खरोखर काय होतें? इतका पैसा खर्च करून ठेविलेल्या सरकारच्या पगारी शास्त्रज्ञांनीं असे कोणते शोध लाविले कीं ज्यांच्या योगानें हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांना यत्किंचित् तरी मदत झाली आहे? डॉ० रॉससारख्या शास्त्रज्ञांनीं हिंदुस्थानच्या खर्चानें मलेरियाच्या कारणासारखा शोध लावावा आणि त्याचा फायदा हिंदुस्थानास न मिळतां इटली किंवा अमेरिका यासारख्या परदेशांना मिळावा असाच प्रकार आतांपर्यंत झाला नाहीं काय? परिषदेचे अध्यक्ष सर फ्रा. बोर्न यांनीं सांगितलें कीं शास्त्रीय प्रयोगशाला वगैरेच्या इमारती प्रीत्यर्थ झालेला खर्च सोडून दिला तरी हिंदुस्थानसरकार दरसाल ७० पासून ८० लक्षापर्यंत शास्त्रीय ज्ञानाप्रीत्यर्थ खर्च करीत असतें. या जंगी खर्चापासून अखेर निष्पन्न काय होतें त्याची कल्पना सरकारला शास्त्रीय ज्ञानासंबंधानें सल्ला देणाऱ्या बोर्डाच्या कामाविषयीं 'नेचर' या विलायतेंतल्या सर्व श्रेष्ठ शास्त्रज्ञांनीं चालविलेल्या पत्रानें काढलेल्या उद्गारावरून कोणाला ही करतां येईल. 'नेचर' ह्मणतें कीं या बोर्डानें सरकारला कांहीं महत्त्वाचा, विशेष परिणामकारक किंवा स्फूर्ति देणारी अशी सल्ला दिलेली त्यांच्या रिपोर्टावरून कांहीं एक दिसत नाहीं. शास्त्रीय शिक्षणासंबंधानें रिपोर्टांत माहितीचा गंध नाहीं, किंवा जें कांहीं दिलें आहे तें ही संगतवार नाहीं. या रिपोर्टांत जें कांहीं आहे तें सरकारी अधिकाऱ्यांच्या नेहमींच्या वहिवाटींतलें आहे. जेथें बोर्डाचे अध्यक्ष मुद्दाम त्यांच्या शास्त्रज्ञानासाठीं निवडलेले नाहींत आणि सेक्रेटरिएट मधलेच एक ढुड्डाचार्य अध्यक्षाचे जागीं आणून बसविले आहेत तेथें सरकारी अधिकाऱ्यांची प्रतिष्ठा मिरविण्यापलीकडे रिपोर्टांत काय पाहण्यास मिळणार आहे? नेचरसारख्या पत्राचें ज्या कार्याविषयीं असें मत आहे त्या कार्याप्रीत्यर्थ सरकारानें अवाढव्य खर्च केला ह्मणजे इतका पैसा व्यर्थ पाण्यांत ओतला असेंच ह्मटलें पाहिजे.

## स्वराज्य संघ.

महाराष्ट्रांतील स्वराज्य संघाची सभा काल च्या मागील रवीवारीं पुण्यास श्री टिळक यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्या वेळीं नागपूर, यवतमाळ, उमरावती, बेळगांव, गुजराथ, सातरा इत्यादि ठिकाणाहून स्वराज्याच्या चळवळींत जिवंत रसओतणारी मंडळी मुद्दाम जमली होती. स्वराज्य संघाची मूठ करतां सर्वमान्य कार्याकरितां सभासदांची संख्या वाढविण्याचा उपक्रम जोरानें अमलांत आणण्याचा संकेत ठरला आहे. ही स्वराज्याची क्रांती विलायतच्या वातावरणांत अगदीं लोकमान्य करण्याकरितां राष्ट्रीय सभेच्या वतीनें जितकीं हिंदुस्थानचीं विद्वद्रत्नें होमरूलर्स ह्मणून तिकडे जातील तितकीं पाठविण्यासाठीं सर्वपरीनें व एकदिलानें मोठ्या नेटाचा प्रयत्न करण्याचा विचार ठरला आहे. ईश्वर अशा प्रयत्नास यश देवो व 'राउंड टेबल'चे उपद्व्याप लयास जावोत!

## दुष्काल

स्वराज्य संघाला हाणून पाडणारी 'राउंड टेबल'ची संस्था नेटानें काम चालवीत आहे. नुकतेच राजश्री लायनेल कर्टिस हे मुंबईचें लोकमत अजमाऊन गेले. प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या दिवाणखान्यांत स्वाराज्याच्या विचारांचा त्यांच्यावर इतका पाऊस पडला कीं त्यांचे राउंडटेबलचें दफ्तर राजश्री हार्निमन बॉम्बे क्रानिकलचे संपादक यांनीं पूर्वींच इतस्ततः हवेंत पतंगासारखें उडविलें होतेंच, तें सपशेल जमीनदोस्त होऊन पडलें. राजश्री कर्टिस यांच्या मुळें संयुक्त प्रांताचे लेफ्टनंट गव्हर्नर सर मेस्टन यांचें राजकारण कायदे कौंसिलच्या सभेंत अगदीं फिकें पडलें. आणि नामदार राजश्री नेहरू यांच्या सवालाला समर्पक उत्तर देण्याच्या भरीस न पडतां त्यांनीं राजश्री कर्टिस यांचा जुना स्नेहभाव सांगतां सांगता पुन्हा या बाबतींत पडणार नाहीं अशी शपथ घेतली. आणि वॉर कौंसिलमध्यें हे हिंदुस्थान तर्फें जाण्याला ते त्यांच्या परीनें सोंवळे झाले आहेत. पण त्यांचें तें जुनें विचाराचें पाप लोकांच्या अंतःकरणांतून क्षालन होणें इतक्या लौकर शक्य नाहीं. तिकडे सर मेस्टॉन यांची ही त्रेधा उडाली तर नागपुरास सर बेंजामिन यांनीं उमरावतीच्या प्रांतिक सभेच्या डेप्युटेशनला उत्तर देतांना आपल्या कोपाच्या ज्वाला पुष्कळशा बाहेर फेकल्या आहेत. लोक ह्मणतात त्यांच्या विचारांत विसंवाद दिसतो!

## स्वर्गारोहण.

पुण्याचे सुप्रसिद्ध रा. रा. विनायक रामचंद्र उर्फ अण्णा साहेब पटवर्धन यांस गेल्या १ ल्या तारखेला देवाज्ञा झाली. हे एल्. एल्. बी व एल्, एम, ॲन्ड, एस. अशा दोन्ही परीक्षा पास झालेले होते. शिवाय ते आर्य वैद्यकांत ही पारंगत होते. हे अत्यंत करारी स्वभावाचे असून परोपकारी दृष्टीनें विश्व कुटुंबीय होते. पुण्यांतील सर्व सार्वजनिक कार्यांत हे श्री टिळक यांचे प्रोत्साहक व सुकल्पनांचे प्रेरक होते. निरभिलाष वृत्ती व ईश्वरीनिष्ठा हे विशेष सद्गुण असत. ते पद्महस्ती असत आणि त्यामुळें लांबलांबचे रुग्ण लोक यांचा औषधोपचार करून नीट होत असत असा सार्वत्रिक लौकिक आहे. असे थोर पुरुष अजरामर असून त्यांचे सद्गुण पुढील पिढीला यशःश्रीकडे सदा नेत असतात.

# वऱ्हाडवृत्त.

**हवापान**—अकालीं पर्जन्य व गारांची वृष्टी यांनीं आमच्या प्रांतांचें जग अगदीं हल्लवून सोडलें व ठिकठिकाणीं प्लेगामुळें जंगलांत गेलेली मंडळी घरोघर थाबत सुटली आहेत. वातावरणांतील हीं महाभूतांचीं युद्धें युरोपांतल्या महायुद्धापेक्षां पुष्कळ निराळ्या गोष्टी शिकवितात. आतां आकाश निरभ्र आहे व सर्व इडापीडा वाहून गेल्यामुळें लोक पुन्हा सुखाचा अनुभव लौकरच घेऊं लागतील.

**स्वागतम्**—रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या नातीच्या लग्नानिमित्त श्री टिळक हे उद्ईक बडनेरास पोंचतील.

रा रा. माधवराव आणे यवतमाळ यांनीं पुण्यास गेल्या सोमवारीं स्वराज्यावर व्याख्यान दिलें. तें चांगलें सुश्राव्य व उपदेशपर झालें; इतकेंच नव्हे तर आमच्या इकडील एका मोठ्या वक्त्याची तिकडील महाराष्ट्रांत चांगली ख्याती झाली आहे हें कळविण्यास अभिमान वाटतो.

रा. रा. धोंडो हरी लळींगकर पेन्शनर तहशीलदार यांस गेल्या शनिवारीं सायंकाळीं देवाज्ञा झाली. पेनशन घेऊन कांहीं महिने होतात तोंच सरकारी नौकरींत शरीर अत्यंत झिजल्यामुळें डोकें भ्रमिष्ट होऊन होऊन त्या अवश स्थितींत देहावसान झालें. गृहस्थ फार प्रेमळ, सुजन व दिलदार असे होते. पत्नीवर व लहान मुलांवर हा डोंगरच कोसळला! यांनीं श्री टिळक येथें असतांना त्यांच्या सत्कार्यासाठीं तात्कालिक स्फूर्तीनें आपली सोन्याची आंगठी दिली. पण पेनशनला धक्का बसतो कीं काय या दुसऱ्या विचारानें त्यांचे डोक्याचें परिभ्रमण सुरू झालें व तेंच शेवटीं विकोपास गेलें.


## जाहीर नोटीस

रा. रा. पांडू व देवराव वल्लद गंभीरजी राहणार बोरगांव तालूके बाळापूर पोस्ट. अंदुरें

यांस:--

खालीं सही करणार याजकडून नोटिसीनें कळविण्यांत येते कीं तुमचे दस्तऐवजाचा तुह्मी आपसांत निकाल करतो असे चार वर्षां पासून चाळवितां पण निकाल करीत नाहीं. शेवटीं आह्मी वकीला पासी फिर्याद लिहुन ठेविली आहे. तुह्मास कोर्ट खर्च पडू नये ह्मणून ही शेवटची नोटीस दिली आहे तर आपसांत निकाल करण्याचा असल्यास ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत निकाल करावा. चार वर्षांचे आधी पोष्ट मार्फत तुह्मांस नोटीस दिली त्यावेळेस आमचे हिशेबानें तुमचे कडे चवदासे रुपये घेणे निघत होते या गोष्टीस चार वर्षे झालीं. आतां दस्तऐवजातील चक्रवाढ शर्ती प्रमाणें आमचे येकोणीसशे रुपये घेणें निघतात. तर हे रुपये देऊन दस्तैवज करून घ्यावा असें न केल्यास आह्मी दावा करुन स्थावर माल आमचे ताब्यांत घेऊं. तुमची कांही एक तकरार कोर्टांत आह्मी कबुल करणार नाहीं. तुह्मी दिवाणीकायद्यानें व्याजाची व रकम देण्याची तकरार केल्यास ती ऐकुली जाणार नाहीं मुकाम आकोला.

सही.

आलमचंद मुरलीधर रा. बोरगांव द खु.

नो. नं. ६६

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, माझा मुलगा नामें वामनराव सदाशिराव देशमुख राहणार जळंब हा वाईट लोकांच्या संगतीस लागून बिघडला आहे. तो कदाचित् कोणाशीं माझ्या स्थावर जंगम जिनगी संबंधीं कोणाशीं व्यवहार करील. करितां सर्वांस कळवितो कीं, कोणी त्यास कर्ज देऊं नये. अगर त्याजपासून माझी इस्टेट गहाण, खरीदी, पट्यानें घेऊं नये. घेतल्यास तें मला मान्य होणार नाहीं. माझ्या जिनगींत ढवळाढळ करण्याचा अधिकार त्याला नाहीं. सावकारांनीं फसूं नये. सबब ही आगाऊ सूचना दिली आहे कळावें.

सही

सदाशिवराव रामजी देशमुख राहणार जळंब दस्तुर खुद

नो० नं० ६७

## जाहीर नोटीस.

नोटिस बेशमी मल्लया व्यंकटी बेलदार लक्ष्मण गंगाराम बिदूर उभयतां राहणार वणी ता. वणी जि. यवतमाळ

यांसः—

नोटिस देणार आह्मी खालीं सह्या करणारे राहणार वणी तालुके वणी जि. यवतमाळ

यांजकडूनः—

या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, आह्मी मल्लया व्यंकटी बेलदार राहणार वणी लक्ष्मण गंगाराम बिदूर राहणार वणी यांना आपलेकडे नौकर ठेवून त्यांचे नांवानीं तारीख ५ माहे जुलई सन १९१५ इसवी रोजीं मुखत्यारपत्र लिहून देऊन रजिस्टर केले होते. त्याप्रमाणें मल्लया व्यंकटी बेलदार याजला मुखत्यारपत्र झाल्यानंतर ४ महिन्यांनीं नौकरीवरून काढून टाकिले. त्यादिवसापासून व त्याचप्रमाणें लक्ष्मण गंगराम बिदूर याची ही मुखत्यार ह्मणून जरूर नसल्या कारणानें तारीख १ माहे दिसेंबर सन १९१५ पासून दोघांचे ही वरील मुखत्यारपत्र रद्द केले आहे. तरी कोणी ही आमचे करितां त्यांचेकडून काम घेऊं नये. व वरील उभयतांनीं मुखत्यार ह्मणून काम करूं नये. तसे केल्यास बेकायदेशीर समजले जाईल कळावें. तारीख २३-१-१९१७ इसवी

सह्या

१ माधना वा॥ राजेया जंगम राहणार वणी दस्तुर खुद

१ मारकंडी वा॥ राजेया जंगम रा० वणी दस्तुर खुद

नो० नं० ६०

---

## नोटीस

नोटिस बेशमी मनी मर्द किसन हेटे शिंपी राहणार शिरले (नेमान्याचे) पोष्ट लाखनवाडा तालुके बाळापूर

यांसः—

नोटीस देणार किसन वा॥ कडतु शिंपी राहणार राजंदा तालुके आकोला नोटिस देतो ऐसाजे तूं माझी बायको असून गंधर्व झाल्यास ९-१० वर्षें झालीं. या दरम्यान तूं माझे घरीं राहत असून शहाणी झाल्यावर १-२ वर्षें माझे घरीं होती. गेले दिपवाळीचे वेळेस तुझा बाप घेण्यास आला असतां पाठविले, व दिपवाळी नंतर परत पाठवूं असें कबूल केलें. दिपवाळी झाली तरी तूं आली नाहींस वरून मी तुला आपले भावासह घेण्यास आले. त्यावेळेस तुझे बापानें मजशीं तंटा करून मला ताब्यांत ठेविले. व रुपये देण्याची खोटी लालुच दाखऊन मजकडून स्टांप मागितला. फंद फितूर करून जबरदस्तीनें मला ताब्यांत ठेवून व कोंडून जुलमानें फारकत लिहून घेतली ती मला कबूल नाहीं. मला कोंडून ताब्यांत ठेविल्यानें माझा कांहीं इलाज चालला नाहीं. या कामांत तुझाला तेथील पाटलानें मदत केली. व जबरदस्तीनें लिहून घेतलेला कागद पाटलाजवळच आहे. जबरदस्तीनें व माझे पसंती शिवाय लिहून घेतलेली फारकत मी रद्द करीत आहे. तरी तुजला नोटिशीनें कळवितो कीं, तूं पंधरा १५ दिवसाचे आंत माझे घरीं येऊन राहा. मी संसार करण्यास तयार आहे. मुदतींत न आल्यास मग तुजवर तात्रा घेण्याचें योग्य कोर्टांत दिवाणी व फौजदारी काम चालवावें लागेल. व कोर्ट खर्च व नोटिशीचा खर्च भरून घेतला जाईल. कळावें तारीख २७-१-१७ इसवी दस्तुर नारायग वामन राहणार आकोला

सही

किसन वा॥ कडतु शिंपी राहणार राजंदे पोष्ट राजंदे ता. आकोला निशाणी खुद

नो० नं० ६१

---

## जाहीर नोटीस

रा. रा. हरलाल सुंदरसा पटवी राहणार बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, माझी बायको नामे पारवती इचा पहिलें घरचा मुलगा नामें यशवंता हा मी तीच्या मोहतीर लाविले त्यावेळीं वय वर्षे ७ चा होता. त्यास लहानपणी सज्ञान होईपावेतों वागाविण्यास कोणी नसल्यामुळें बायकोचे समागमे आला मी धमार्थ त्याचें संगोपन केलें. माझे पदरचा पैसा खर्च करून त्याचे लग्न केलें व त्याजवर माझे आणि माझे बायकोचे ह्यातारपणांत आमची इस्टेट जशीच्या तशी कायम ठेवून आमचे संगोपन करील या हेतुनें व चार लोकांचें सांगण्या वरून आज तीन साडे तीन वर्षे झालीं एक घर तो अज्ञान असतांना मांझे स्वतःचे रुपये १२५ हनवी झाली याजला देऊन ते त्याचे नांवानें खरेदी घेतलें. वास्तविक त्या घराचा खरा मालक मी आहे. तो मुसतां खरेदी खतांत नामधारी आहे असे असून माझे ऐकण्यांत असें आले. कीं वरील घर तुह्मी त्याचे जवळून आमच्या पश्चात आमची परवानगी घेतल्याखेरीज वास्तविक आह्मांस कांहीं तुमचे कर्ज काढण्याची जरूर नसून गहाण घेतलें आहे. या साठीं तुह्मांस या नोटिशीने कळविण्यांत येते कीं तुह्मी घेतलेले घराचे गहाणखत बेकायदेशीर असल्यामुळें रद्द समजतो. तुह्मी गहाणखतांत दाखविलेल्या भरण्याची रक्कम आह्मास कबुल नाहीं व तिचा बोजा माझे मालकीचे घरावर गहाणखताचे आधारें राहणार नाहीं तुह्मांस वाटल्यास त्याजवर स्मालकाजांत दावा दाखल करून तुमची रक्कम वसुल करावी ही नोटीस दिली कळावे ता. २५-१-१९१७ मु० आकोला.

सही

गोविंदा वलद कोंडाजी राहणार बाळापूर आकोला वेस नि० खुद हातची असे

नो. नं. ६२

---


## हात मागाचा मोठा कारखाना.

अगदीं पक्क रंगाचीं लुगडीं पाहिजे असल्यास

# कला-भुवन सोलापूर.

यांच्याकडे मागणी करा.

लछमय्या व्यंकटनरसू इरावती, मालक,

नो० नं० १०



## हिमालयांतील दिव्य महौषधींचीं औषधें.

सर्वप्रकारचे नेत्ररोगांवर रामबाण औषध किं. १ रु. पो. ख. शिवाय.

रक्त शुद्ध करणारी दिव्य वल्ली किं. १॥ रुपया दि. ७ शिवाय. अभ्रक, मौक्तिक वगैरे उंची माल व्ही. पी. नें पाठवूं.

पत्ता— वैद्यराज विठ्ठल शास्त्री परांजपे पुणें २३८ बुधवार चौक

नो. नं. १२



ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरकेलें विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट परमा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपर्युक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना परमा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें अ य.शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णें, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

नो० नं० २२


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

Regd-No. N 150

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला—सोमवार तारीख १२ माहे फेब्रुवारी सन १९१७ ई० [ अंक ७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः**— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई व्यांकेची सेव्हिंग व्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवतां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई व्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट

नो. नं १

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. २

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ·॥।·, १, १।, १॥, २, २॥, ते ६ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ·॥।· १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ·।·, ·॥·, ·॥।·, १, १॥, रु. प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान चाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

## खात्रीचा तयार केलेला.

### ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गुण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता

रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी
मोहला नागपूर शहर सर्कल नं. ६
नो० नं० ४

### अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३ ४, ५, वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥. २, ३. ४. अंगठी किं. रु. १, १॥, सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं. रु. १॥, २ २॥ कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ताः—**मगनलाल के. आणि कंपनी**
गिरगांव मुंबई.

नो० नं० ५

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारानें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १०८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

**हें दंतमंजन** मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर .

**आमचे** कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळ टीका, मुदी अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ७

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमार्शीयल अशूअरन्स** कंपनी लिमीटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि. रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशीयन कमार्शीयल अशूअरन्स
कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

# काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १०८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ०८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ०९ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५**
नो० नं० ९

### सचित्र ) रंगभूमि. ( मासिक.

नाटकाविषयाची चर्चा करणारें सचित्र मासिक वा. व. टपाल हंशील सह २८२ आणे आहे. पाहिजे तेव्हां सुरू करितां येते. नमुन्याचे अंकास ०४ आणे. यांत जाहिराती घेण्याची सोय आहे. नाट्यविषयक पुस्तकें व सर्व प्रकारची नाटकें आमचेकडे मिळतात.

म्यानेजर— "रंगभूमि" पुणें किंवा
किर्लोस्कर संगीत मंडळी.
नो० न० २६

वऱ्हाडसमाचार

मिति माघ वद्य ५ शके १८३८

## हिंदुस्थानांत रासायनिक उद्योग

### निघण्याची संभवनीयता.

देशांतले पुष्कळसे उद्योगधंदे व्यापारी रीतीनें यशस्वी होण्यास रसायन शास्त्राची मदत घ्यावी लागते. माल तयार करतांना पुष्कळ कच्च्या मालाचा भाग टाकाऊ समजला जातो. या टाकाऊ मालावर रासायनिक क्रिया करून त्याचा कांहीं उपयोग करतां आला व उत्पन्न करतां आलें तर तो माल स्वस्त विकण्यास या टाकाऊ मालापासून होणाऱ्या उत्पन्नाचें साह्य होऊन कारखान्याला फायदा होतो. या कामासाठीं रासायनिक द्रव्यें लागतात, व तीं आपणांस इकडच्या इकडे तयार करतां आलीं तर च स्वस्त पडतील, व कारखाने यशस्वी होतील. अशीं द्रव्यें कोणतीं व तीं इकडे तयार होण्याची संभवनीयता किती आहे या संबंधानें कलकत्याचे प्रख्यात रसायनशास्त्रवेत्ते डा. पी. सी. राय यांचें बडोद्यास नुकतेंच एक व्याख्यान झालें होतें. त्या व्याख्यानाच्या वेळीं त्यांनीं जी माहिती दिली ती फार महत्त्वाची असल्यामुळें तिचा सारांश येथें देत आहों.

डा० राय ह्मणाले कीं उद्योगधंद्यांत विशेषतः दोन रासायनिक द्रव्यें लागतात. एक आल्कली व दुसरें सल्फ्युरिक आसिड अथवा तेजाब. या दोन पदार्थांच्या साह्यानें असंख्य दुसरीं रासायनिक द्रव्यें तयार करतां येतात, व त्यांचा कापडाच्या व कागदाच्या गिरण्यांतून उपयोग होतो. पण दुःखाची गोष्ट आहे कीं ही दोन मुख्य द्रव्यें इकडे तयार करण्याचा प्रयत्न अद्याप इकडे कोणीं विशेषसा केला नाहीं. यामुळें लक्षावधि रुपये हिंदुस्थानांतून दरसाल बाहेर जात आहेत. उदाहरणार्थ सोडा. हा सोडा व त्यापासून तयार होणारीं इतर द्रव्यें यांच्या साठीं १९१३-१९१४ सालीं हिंदुस्थानांतून जवळ जवळ ३५ लक्ष रुपये परदेशीं गेले. हा सोडा साबण, तेलें, रंग व कागद यांच्या कारखान्यांत लागतो. नुसता साबण घेतला तरी १९१३-१४ सालीं त्या प्रीत्यर्थ आह्मांस ७५ लक्ष रुपये विलायतेस पाठवावे लागले. विलायतेंत आल्कली द्रव्यें विपुल आहेत, व साबण तयार करतांना त्याच्या बरोबर निघणारें ग्लिसरीन कसें तयार करावें हें विलायतच्या लोकांना कळतें. आमच्या इकडे साबणास लागणारीं तेलें पुष्कळ होतात, पण आल्कलीचा व रसायन विद्येचा तोटा आहे, त्यामुळें आमचे साबणाचे कारखाने यशस्वी होत नाहींत. तीच गोष्ट कागदाच्या कारखान्यांची. येथें कागदास लागणारा कच्चा माल विपुल आहे. पण कॉस्टिक सोडा, ब्लीचिंग पावडर, व दुसरे रासायनिक पदार्थ होत नाहींत, ह्मणून ते विलायतेहून आणावे लागतात, व त्यामुळें इकडचा कागद महाग पडतो. अल्युमिनचा धंदा चांगला चालण्यासारखा आहे. अल्युमिनम ज्यापासून काढतात ती बॉक्साईट नांवाची अशोधित धातु इकडे जबलपुरापाशीं पुष्कळ सापडते. पण आल्कली द्रव्याची वाण पडते. हें आल्कली द्रव्य तयार करण्याचे कारखाने इकडे निघाले पाहिजेत.

हें आल्कली संबंधानें झालें. सल्फ्युरिक आसिडचा कारखाना चालण्यास इकडे कांहीं अडचणी आहेत. त्या अशा—प्रथम सल्फ्युरिक आसिडचा मुख्य भाग ह्मणजे शुद्ध गंधक. त्याच्या खाणी अद्याप इकडे लागल्या नाहींत शोध चालू आहे. त्या इकडे सांपडल्या तरी दुसरी अडचण इकडे आगगाडीच्या भाड्याची आहे. कलकत्त्यास किंवा मुंबईला लंडन इतकें स्वस्त सल्फ्युरिक आसिड तयार केलें तरी तें तेथून इतर ठिकाणीं पाठविण्यास इतकें जबर भाडें पडतें कीं तेवढ्यांत लंडनहून तें द्रव्य कारखानदारांना सहज आणतां येतें. सल्फ्युरिक आसिडचा उपयोग हाडांचें खत करून जमीन सुपीक करण्याकडे करतां येईल. कलकत्याचा बंगाल केमिकल अँड फार्मास्युटिकल वर्क्स नांवाचा कारखाना या दिशेनें हल्लीं प्रयत्न करीत आहे ही सुदैवाची गोष्ट आहे. अमोनिअम सल्फेट या रासायनिक द्रव्याचा उपयोग उंसाच्या लागवडीला होतो. हें द्रव्य हल्लीं इकडे थोडें फार होऊन सीलोन व स्ट्रेट सेटलमेंटसला पाठविण्यांत येतें. पण सल्फ्युरिक आसिडचा कारखाना इकडे निघाल्यास मोठ्या प्रमाणावर तें काढतां येऊन इकडच्या उंसाला त्याचा फायदा मिळेल.

गळिताचीं धान्यें दरसाल कोट्यवधि रुपयांचीं इकडून परदेशीं जातात. सरकीचें तेल साबणाच्या कारखान्यांत लागतें हें तेल शुद्ध करतां आलें तर खाण्यास ही उपयोगी पडेल. पण या तेलापासून निघणारी ढेप शेतीला उत्तम प्रकारचें खत देत असतां तिला इकडे खप नाहीं. यामुळें या तेलाचा कारखाना इकडे यशस्वी होत नाहीं. अमेरिकेंतल्या प्रमाणें इकडे तें तेल शुद्ध करतां आलें व ढेपेचा ही उपयोग गुरांच्या खाण्याकडे व शेतीकडे होऊं लागला तर हिंदुस्थानचा केवढा फायदा होईल! कातडीं रंगविण्यास ट्यानिन ज्यांत आहेत अशीं द्रव्यें ह्मणजे हिरडा, बाभळीची साल, खैर, वगैरे आपल्या इकडे पुष्कळ होतात. यापासून ट्यानिन करतां येईल. या शिवाय कारखान्यांना पोट्याश लागतो. तो पंजाबांत सापडतो. पण फार हलक्या प्रतीचा कार्बाइड ऑफ कॅल्शमला विद्युच्छक्ति पाहिजे. ती म्हैसूरकडे आहे. दगडी कोळशापासून डांबर वगैरे पदार्थ काढण्याचा प्रयत्न इकडे अद्याप कोणीं केला नाहीं. इतर ही दुर्गंधिनाशक द्रव्यें तयार करतां येतील. राखेपासून उद्योगधंद्याला लागणारा मद्यार्क तयार करतां येतो, तसाच महुआच्या फुलापासून ही तयार करतां येईल. हीं फुलें गुरांना खाऊं घालण्यापेक्षां मद्यार्क केल्यानें ज्यास्त फायदा होईल. अलेंबिक केमिकल वर्क्सनें या उद्योगाकडे लक्ष घातलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

रंगांच्या बाबतींत इंग्लंडचा सुद्धां जर्मनीपुढें टिकाव लागणें मुष्किल आहे असें खुद्द इंग्रज शास्त्रज्ञच ह्मणत आहेत. तेव्हां हिंदुस्थानानें त्या भानगडींत पडूं नये. पण रंगाशिवाय इतर ह्मणजे वर सांगितलेले अनेक उद्योग इकडे होण्यासारखे आहेत. मद्रासकडे चांभार कातडीं रंगवितात, पण त्यांना शास्त्रज्ञान नसल्यामुळें त्यांच्या हातून तें काम चांगलें होत नाहीं. शास्त्रज्ञानाच्या जोरावर आतां आपणास कारखाने काढले पाहिजेत. हें काम धीरानेंच केलें पाहिजे. हें काम जर्मनी, इंग्लंड सारखे आज एक दोन शतकें करीत आले आहेत. त्या लोकांचा या कामीं स्वार्थत्याग ही अनुकरणीय आहे. त्याचा व्यासंग ही जबर आहे. पॉट नांवाच्या एका माणसानें ३० हजार प्रयोग करून पाहिले तेव्हां एक कारखाना यशस्वी करण्याची गुरुकिल्ली त्याला हस्तगत झाली. बॉडिश कंपनीला रंगाचे संबंधांत यश येण्याला १९ वर्षें सारखें खपावें लागलें, व १॥ कोट पौंड खर्च करावा लागला. आपल्या मार्गांत असंख्य अडचणी आहेत खऱ्या. पण त्या प्रयत्नानें दूर केल्या पाहिजेत. तरुण मंडळींत हल्लीं नवजीवनाचा संचार झालेला दिसत आहे. या मंडळीला योग्य दिशा मात्र लाविली पाहिजे.

---

## खुलासा पाहिजे.

आमच्या लोक नायकांवर हिंदुस्थानच्या हितशत्रूंचा हा नेहमीं आक्षेप असतो कीं त्यांच्यांत शील, काम करण्याची शिस्त इ० गुण नाहींत; त्यांना आपले हातीं सत्ता घेण्याची मात्र हौस असते, पण काम यशस्वी करण्यास लागणारें धोरण, कळकळ व सार्वजनिक हिताविषयींची आस्था नसल्यामुळें त्यांना यश येत नाहीं. मुंबई इलाख्यांत ज्यांनीं सगळा जन्म काढून अतिशय लोक प्रियता संपादली ते डॅा. पोलन यांनीं नुकतेच एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं 'इंग्रज लोकांनीं समजा उद्या हिंदुस्थान हिंदी लोकांच्या स्वाधीन करून विलायतेचा रस्ता धरला तर त्यांच्या मागें हिंदुस्थानांत एक ही रेल्वे नीट चालणार नाहीं. कारण त्यांच्यांत उद्योग तत्परता, कामाची शिस्त, वगैरे गुण नाहींत. आमच्या सुशिक्षित लोकांची बदनामी करण्यास या लोकांना क्षुल्लक कारण सुद्धां पुरतें पण हा त्यांचा दोष नाहीं. आह्मी तें क्षुद्र कारण देखील त्यांना कां द्यावें! सीझरच्या पत्नीनें आपल्या पातिव्रत्याबद्दल शंका घेण्यास यत्किंचित् ही जागा न ठेविली पाहिजे अशी इंग्रजींत ह्मण आहे व ही आमच्या सुशिक्षित पुढाऱ्यांनीं पूर्णपणें लक्षांत ठेवावयास पाहिजे आहे. आज हे विचार सुचण्याचें मद्रासच्या 'न्यू इंडिया' पत्रांत थोडे दिवसांपूर्वीं आमचे प्रांतस्थ पुढारी ना. रा. ब. मुधोळकर यांच्या औद्योगिक परिषदेच्या व्यवस्थेसंबंधानें आलेली टीका होय. मद्रासकडे मि. विद्यासागर पंड्या नांवाचे एक चळवळी गृहस्थ आहेत. त्यांचा व ना. रा. ब. मुधोळकर यांचा झालेला पत्रव्यवहार त्यांनीं न्यू इंडिया पत्राचे संपादकास दाखविल्यावरून १९१४ व १९१५ सालीं नेमिलेल्या गेलेल्या कमिटीत मि. पंड्या हे असतांना हा पत्रव्यवहार झालेला आहे. औद्योगिक परिषदेच्या हिशेबांची तपासणी करण्यासाठीं मेसर्स ब्रिलिमोरिया अणि कंपनी यांची नेमणूक करण्यांत आली होती. या हिशेब तपासनिसांनीं केलेल्या रिपोर्टांतलें एकच वाक्य प्रसिद्ध झालें आहे. पण तें ना. रा. ब. मुधोळकरासंबंधानें कुशंका उत्पन्न करणारें आहे. औद्योगिक परिषदेचे सेक्रेटरी ह्मणून रा. ब. च्या हातांत बरीच रकम आली असतां त्यांनीं ती ब्यांकेंत वगैरे ठेवून परिषदेला व्याज मिळवून द्यावयास पाहिजे होतें, पण तसें न करतां त्यांनीं ती आपले जवळ ठेविली असा आक्षेप आहे. समग्र रिपोर्ट पाहण्यास न मिळाल्यामुळें येवढ्या एका वाक्यानें वाचकांचीं मनें कलुषित होण्याचा संभव आहे व सन्मान्य लोकनायकासंबंधानें लोकांचीं मनें अशीं कलुषित राहणें कोणत्याही प्रकारें इष्ट नसल्यामुळें रा. ब. नीं साग्र रिपोर्ट प्रसिद्ध करावा व त्यासंबंधानें त्यांना जो खुलासा करणें असेल तो ही त्यांनीं प्रसिद्ध करावा अशी आमची त्यांना विनंति आहे. ना. रा. ब. चा खुलासा प्रसिद्ध झाल्यास त्यांच्यावरचा आक्षेप दूर होऊन त्यांच्या पवित्र चारित्र्याविषयीं लोकांचे मनांत जो आदर आहे तो द्विगुणित होईल अशी आमची पूर्ण खात्री आहे.

---

## इंदुरास भरणारें साहित्यसंमेलन.

येत्या होळीच्या दिवसांत ता० ९-१०-११ मार्च रोजीं इंदूर येथें श्रीमंत महाराज होळकर सरकार यांच्या आश्रयाखालीं महाराष्ट्रसाहित्य संमेलन भरविण्याचें तेथील साहित्य सभेनें नक्की ठरविलें आहे असें कळतें. यंदाच्या बैठकींत कोणकोणत्या विषयांवर ठराव व्हावेत व विषयांची चर्चा व्हावी त्यांचा मसुदा ही इतक्यांतच संमेलनाच्या सेक्रेटरीकडून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. यावरून इंदूरच्या मंडळींत उत्साह चांगला दिसून येतो. संमेलनाच्या स्वागत मंडळीचे चेअरमन श्रीमंत होळकर सरकारच्या फौजेचे कम्यांडर-इन-चीफ रा. ब. जनरल गोविंदराव मतकर साहेब हे होणार आहेत. हे जातीचे धनगर असून श्रीमंत महाराजसाहेबांच्या आप्तसंबंधांतले आहेत. यांचें शिक्षण फारसें झालेलें नाहीं. तथापि मराठी भाषेविषयींचा आपला उत्कट अभिमान त्यांनीं इंदुरांत इतक्या स्पष्ट रीतीनें प्रकट केला आहे कीं इंदुरांत रा. ब. सरदार किबे, डा. तांबे, चीफ जस्टिस कीर्तने वगैरे सारखे सुशिक्षित, वजनदार, व कुलवान् असे अनेक गृहस्थ असतां त्यांनीं आपण होऊनच एक मतानें रा. ब. मतकर यांस तो मान दिला आहे व तो इंदुरास सर्वांना मान्य ही झाला आहे. अशा उत्कट महाराष्ट्र भाषाभिमानी ब्राह्मणेतर अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालीं यंदाचें साहित्यसंमेलन पूर्णपणें यशस्वी होईल अशी खात्री वाटते. संमेलन भरविण्यास होळीचे दिवस सुटी नसल्यानें सोयीचे नाहींत ही गोष्ट खरी, पण खरी कळकळ व आस्था असल्यावर ही अडचण कांहीं अपरिहार्य वाटत नाहीं हें

मागें बडोद्याच्या व आकोल्याचे संमेलनाचे वेळीं प्रत्ययास आलेलें आहे. या दोन्ही ठिकाणच्या संमेलनाचे वेळीं सुद्धा नसतां ही भाषासेवकांनीं येण्याची कृपा केली होती. श्रीमंत होळकर सरकारसारख्या तरुण व उत्साही राजकर्त्यांनीं साहित्यास उत्तेजन देण्याचा हा जो उपक्रम केला आहे त्याला आमचे कवि, इतिहासकार, कादंबरीकार, नाट्याचार्य, व इतर लेखक आणि साहित्याविषयीं प्रेम बाळगणारांनीं आपल्या आगमनानें प्रोत्साहित केलें नाहीं तर इंदुरकरांचा केवढा उत्साहभंग होईल व साहित्याचें ही केवढें नुकसान होईल हें ध्यानांत आणून ठिकठिकाणचे लेखक व लोकनायक राजाच्या घरचा पाहुणचार घेण्यास व त्या बरोबरच साहित्याभिवृद्धीस हातभार लावण्यास मागें घेणार नाहींत अशी आमची पूर्ण खात्री आहे.

---

## नसती हरकत !

हिंदुस्थानांतले शेतकरी व मजूरवर्ग अशिक्षित असल्यामुळें या देशांतल्या शेतकीचें व कारखान्यांचें फार नुकसान होत आहे ही गोष्ट औद्योगिक कमिशन पुढें आतांपर्यंत झालेल्या साक्षीदारांच्या जबान्यांवरून पूर्णपणें स्थापित झाली आहे व इकडे मोफत व सक्तीचें शिक्षण सुरू करा, त्यासाठीं पाहिजे तर एखादा कर ही बसविण्याची गरज पडली तर तो देण्यास आह्मी खुषीनें तयार होऊं असें लोक ह्मणत आहेत. पण ट्रेंड शिक्षकांची वाण ही सबब पुढें करून सरकारी अधिकारी लोकांची शिक्षणाविषयींची ही उत्सुकता दाबून टाकीत आहेत वस्तुतः सरकारानें ट्रेंड शिक्षकांचें येवढें स्तोम कां माजवावें तें आह्मांस कळत नाहीं. नेसेन तर पैठणी नेसेन, नाहीं तर नागवी बसेन या ह्मणीप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांचें हें वर्तन हास्यास्पद आहे. खुद्द इंग्लंडांत पंचवीस तीस वर्षांपूर्वीं सगळ्या शाळांतून ट्रेंड शिक्षक कोठें होते? पण ट्रेंड शिक्षक मिळत नाहींत ह्मणून इंग्लंडांत शिक्षणाचा प्रसार सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न सरकारानें थांबविला होता काय? हिंदुस्थानांत दहावीस वर्षांपूर्वी ट्रेंड शिक्षक नव्हते ह्मणून जुन्या शिक्षणपद्धतीनें काहींच फायदा झाला नाहीं असें सरकारास ह्मणतां येईल काय? न्या. रानडे, तेलंग, जिनसीवाले, गुरुदास बॅनरजी, आशुतोष मुकरजी, टिळक, लचपतराय, जी. सुब्रह्मण्यम् आयर, सुरेंद्रनाथ बॅनरजी, पंडित मालवीय, वगैरे ठळक नररत्नें ज्या जुन्या शिक्षणपद्धतीनें तयार केलीं तिला अगदींच टाकाऊ कसें ठरवितां येईल? ट्रेंड शिक्षक मिळाले तर नको आहेत असें नाहीं. ते तयार करण्यासाठीं ट्रेनिंग कालेजांची संख्या वाढवा; शिक्षकांचे पगार वाढवा; ह्मणजे ट्रेंड शिक्षक ही झपाट्यानें तयार होतील. पण ते तयार होईपर्यंत शिक्षणाचा प्रसार रोखून धरणें ह्मणजे दुराग्रहाची कमाल ह्मटली पाहिजे.

---

## प्रेस असोसिएशन.

मुंबईच्या कांग्रेसचे वेळीं स्थापन झालेल्या प्रेस असोसिएशनचें प्रेस आक्टाचे संबंधांत एक डेप्युटेशन लवकरच व्हाइसराय साहेबाकडे जाण्याचें ठरलें आहे व त्यावेळीं सादर करण्याच्या मानपत्राची प्रत ता. १ फेब्रुवारीपर्यंत व्हाइसराय साहेबाकडे पाठविण्यांत यावी असें ठरलें होतें त्याप्रमाणें ती रवाना झाली असेल. या असोसिएशनची पहिल्या वर्षाच्या अखेरीची बैठक लखनौस होऊन तींत नव्या वर्षासाठीं अध्यक्ष, सेक्रेटरी व सभासद यांच्या नेमणुकी झाल्या त्या येणें प्रमाणें:—

**अध्यक्ष**—मि. हॉर्निमन (संपादक बांबे क्रानिकल)

**सेक्रेटरी**— मि. एम. सी. मोदी.

**सभासद**—मेसर्स देवधर (ज्ञानप्रकाश), न. चिं. केळकर (केसरी व मराठा), बिरुमल (सिंधी), जमनादास द्वारकादास (यंग इंडिया), आर. जी. प्रधान (भारतसेवक), सुरेंद्रनाथ बॅनर्जी (बंगाली), मोतीलाल घोष (अमृत बजार पत्रिका), रामानंद चॅटरजी मॉडर्न रिव्ह्यु, अंबिकाप्रसाद बाजपेयी भारतमित्र, काजी अब्दुल गफूर—सिदाकत, प्रियनाथसेन—हेरल्ड, गोपाळ आयंगार—लाहोर ट्रिब्यून, लाला दिनानाथ—देश, शकीहुसेन—पंजाब, मलिक बरकत अली—ऑब्झर्वर, मौलवी इनशा अल्लीखां—वतन, शैला—हिंदुस्थान, कस्तुरीरंग आयंगर—मद्रास हिंदु, जी. ए. नटेशन—इंडियन रिव्ह्यु, मिसेस आनी बिझांट—न्यू इंडिया, रामस्वामी आयर—स्वदेशमित्रन्, के. नागेश्वरराव—आंध्रपत्रिका, दि. ब. सी. करुणाकर मेनन—इंडियन पेट्रियट, पंडित मदन मोहन मालवीय—अभ्युदय, सी वाय. चिंतामणी—लीडर, कृष्णप्रसाद कौल—हिंदुस्थानी, सी. एस. रंगैया—ॲडव्होकेट, मुकुट बिहारीलाल—अवध अखबार, सय्यद जालिब—हमदर्द, ना. खं. फडके—वऱ्हाडसमाचार, न. आ. द्रविड—हितवाद, जी. ए. ओगले—महाराष्ट्र, सच्चिदानंद सिंह—हिंदुस्थान रिव्ह्यु

---

## नववें महाराष्ट्र साहित्य संमेलन इंदूर

### जाहिर पत्रक नं. १

पुढील जाहिरपत्रक इंदूर येथील साहित्यसभेच्या सेक्रेटरीकडून आमचेकडे प्रसिद्धीसाठीं आलें आहे.

इंदूर येथें नववें साहित्यसंमेलन भरविण्याचा विचार करण्यासाठीं साहित्यसभेच्या व्यवस्थापक मंडळीची सभा ता० २२ जानेवारी रोजीं व सर्व साधारण सभा ता० २८ जानेवारी रोजीं भरून सर्वानुमतें येत्या होळीच्या दिवसांत तें येथें भरविण्याचें ठरलें. नक्की तारखा मागाहून प्रसिद्ध होतील.

संमेलनासंबंधाची एकंदर व्यवस्था करण्याकरितां तूर्त रा. वामन गणेश पंतवैद्य बी. ए. एल. बी. वकील, रा. वासुदेव गोविंद आपटे (संपादक 'आनंद' व 'मल्हारी मार्तंड विजय') आणि प्रोफेसर लक्ष्मण बाळकृष्ण देव एम. ए हे तीन चिटणीस नेमण्यांत आले आहेत

जे संमेलनासाठीं किमानपक्षी २५ रु. वर्गणी देतील त्यांस स्वागत मंडळीचे सभासद समजण्यांत येईल

या नियमाप्रमाणें आतांपर्यंत रावबहादुर गोविंदराव मतकर (श्रीमंत होळकर सरकारच्या फौजेचे कम्यांडर-इन-चीफ), सरदार राव बहादूर किबे साहेब, श्री. सौ. कमलाबाई किबे, डॉ. गो. रा. तांबे, चीफ जस्टिस किर्तने, रा. शिवेश्वरकर वकील, रा. अनंतराव चितळे, मि. रेगे. प्रो. देव व रा. वासुदेवराव आपटे हे स्वागत मंडळीचे सभासद झाले आहेत. आणखी होतील तसतशीं त्यांचीं नांवें पुढें प्रसिद्ध होतील.

स्वागत मंडळीचे अध्यक्षपद रा. ब. जनरल गोविंदराव मतकर यांनीं स्वीकारण्याचें कबूल केलें आहे.

### संमेलनापुढें येणाऱ्या ठरावांचा व निबंधाच्या विषयांचा मसुदा.

#### ठराव.

१ दुय्यम शिक्षणाच्या सर्व शाळांतून दिलें जाणारें शिक्षण देशी भाषांच्या द्वारें दिलें जावें असें या सभेचें मत आहे.

२ मुलांमुलींच्या शाळांतून जें शिक्षण दिलें जातें त्याच्या पूर्ततेसाठीं मुलामुलींची जिज्ञासा वाढविणारीं, त्यांच्या वाचनशक्तीस उत्तेजित करणारीं, त्यांना व्यवहारज्ञान शिकविणारीं व त्यांच्या आनंदवृत्तींत, आकांक्षांत व कर्तृत्वशक्तींत भर टाकणारीं अशीं स्फूर्तिदायक पुस्तकें लिहिलीं जाण्याची सध्याच्या स्थितींत अत्यंत अवश्यकता आहे व हें काम ठिकाठिकाणच्या साहित्यसभांनीं व शिक्षणसंस्थांनीं हातीं घ्यावें असें या सभेचें मत आहे.

३ ज्ञानप्रसाराच्या पवित्र कार्यास मदत करण्यासाठीं ठिकाठिकाणीं ग्रंथालयें व मोफत वाचनालयें उघडण्याची अत्यंत अवश्यकता आहे असें या सभेचें मत आहे व अशीं ग्रंथालयें, मोफत वाचनालयें, व फिरती वाचनालयें काढून तीं चांगल्या रीतीनें चालविण्यासाठीं जागोजागीं कमिट्या स्थापण्यांत याव्या व त्यांनीं आपापले कामाचे अहवाल सर्वांच्या माहितीसाठीं पुढच्या संमेलनाचे वेळीं सादर करावे अशी या सभेची विनंति आहे.

४ मराठी भाषेंत दरसाल प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची, विद्यमान लेखकांची व साहित्यसंस्थांची एक जंत्री त्यांच्या पत्त्यासह तयार होण्याची फार अवश्यकता आहे. ही जंत्री तयार करून ती निदान पांचवे वर्षीं तरी महाराष्ट्रसाहित्य-परिषदेनें प्रसिद्ध करावी अशी या सभेची शिफारस आहे.

५ मराठी वाङ्मयांतली उणीव पुरी करण्यासारखे जे चांगले ग्रंथ लिहून तयार असतील, पण द्रव्याभावामुळें किंवा इतर अडचणींमुळें अप्रकाशित राहिले असतील त्यांचें विद्वानांकडून योग्य परीक्षण व संशोधन करवून त्यांच्या प्रकाशनार्थ मराठी भाषेचा अभिमान बाळगणाऱ्या संस्थानिकांचें व इतर धनिक गृहस्थांचें साह्य मिळविण्याचा साहित्य परिषदेनें यत्न करावा व शक्य तेवढा उद्योग करून ते ग्रंथ प्रकाशित करावे असें या सभेचें मत आहे.

६ इंदूर, ग्वालेर, बडोदें प्रभृति मराठी संस्थानांच्या दफ्तरांतून पुष्कळ ऐतिहासिक महत्त्वाचे कागद अद्याप मिळण्यासारखे व अप्रकाशित आहेत. ते प्रकाशित झाल्यास इतिहासावर पुष्कळ नवा प्रकाश पडण्याचा संभव असल्यामुळें साहित्य परिषदे सारख्या संस्थेच्या मार्फत दफ्तरांचें संशोधन करवून ते प्रसिद्ध करण्यास परवानगी द्यावी अशी विनंति ही संस्था संस्थानिकांस अत्यंत आदरपूर्वक व नम्रभावानें करीत आहे.

#### निबंधाचे विषय.

१ शुद्ध मराठी भाषेंतल्या प्राचीन व अर्वाचीन शब्दांचा एक संपूर्ण कोश तयार करण्याची अवश्यकता, त्याला लागणारीं साधनें, येणाऱ्या अडचणी व त्या दूर करण्याचे व्यावहारिक उपाय.

२ वाङ्मयासंबंधाची सदभिरुचि व असदभिरुचि यांचीं लक्षणें कोणतीं आहेत व सदभिरुचि वाढवून असदभिरुचि कमी करण्यास काय केलें पाहिजे ?

३ गेल्या पंचवीस वर्षांतल्या मराठी नाटकग्रंथांचें पर्यालोचन करून त्यांचें धोरण कसें आहे व कसें असावयास पाहिजे तें दाखविणें; व त्यांत सुधारणा करण्याची अवश्यकता दिसल्यास त्या सुधारणा घडवून आणण्याचे व्यावहारिक उपाय सांगणें.

४ मराठी भाषेंतल्या शास्त्रीय वाङ्मयाची वाढ करण्याचे कामीं कोणत्या अडचणी सध्या आहेत व त्या दूर करण्यास काय केलें पाहिजे?

५ लोकांच्या वाचनाभिरुचीला योग्य वळण लावण्यासाठीं चांगल्या मराठी पुस्तकांची माला लिहवून ती प्रकाशित करण्यास व अशा प्रकारची व्यवस्था यशस्वी होण्यास कोणकोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत व त्या कशा करतां येतील?

६ इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी वगैरे राष्ट्रांतून ग्रंथलेखक व प्रकाशक यांच्या मधील व्यवहार कशा प्रकारचे आहेत व आपल्या परिस्थितीला जुळवून त्यांचें अनुकरण उभयतांना भूषणावह व वाङ्मयास श्रेयस्कर असें कशा रीतीनें करतां येईल त्याचें विवेचन.

याशिवाय आणखी विषय कोणास सुचविणें असल्यास त्यांनीं ते तां० २० फेब्रुआरीपर्यंत रा० वासुदेव गोविंद आपटे, संपादक आनंद इंदूर सिटी या पत्त्यावर कळविण्याची कृपा करावी.

---

## कार्यक्षेत्र

### (जिल्हाबोर्डाचे अधिकारवर्धन)

सरकारी विश्वकर्मा ह्मणजे पब्लिक वर्क्स खातें होय. या खात्याचा लौकिक त्याच्या कर्तृत्वापेक्षां उधळपट्टीबद्दल व अपव्ययाबद्दल अधिक आहे. हा लौकिक सर्वथा यथार्थ नाहीं. तथापि त्याच्या मध्यें खरेपणाही विशेष आहे असा सरकारी अभिप्राय असल्यावरून त्या खात्याची पुनर्रचना करण्याचा सरकारी संकल्प दिसतो. या खात्याचें नवें स्वरूप निश्चित करण्यासाठीं एक कमिशन ही नेमण्यांत आलें आहे. त्या कमिशनपुढें गेल्या २५ व्या तारखेला नामदार रावबहादुर केशव गोविंद दामले यांची साक्ष झाली. त्यांच्या साक्षीमध्यें एक महत्वाचा विषय

त्यांनीं कमिशनपुढें मांडला आहे. त्यांच्या मतानें जिल्या बोर्डाकडे सरकारी इमारती, रस्ते व इतर सामान्य प्रतीचीं कामें जीं हल्लीं पब्लिक वर्क्स खात्याकडून होत असतात तीं जिल्हा बोर्डाकडे दिल्यास प्रस्तुतच्या जिल्हा बोर्डाच्या अधिकाऱ्यांना पुरेसें काम मिळेल. व बोर्डाच्या कामगिरीची वजनदारी वाढेल व लोकांसही अधिक महत्वाचा कार्यभाग आपल्याकडे आल्याबद्दल आनंद व उत्साह वाटण्यासारखा आहे. आणि या रितीनें पब्लिक वर्क्स खात्याकडे कला कुसरीची व विशेष कौशल्याची कारागिरी कामें राहतील. हल्लीं आकोल्यासारख्या जिल्हा बोर्डाकडून दरसाल ७० हजारांचीं कामें होतात आणि त्या कामामध्यें शालागृहें, धर्मशाळा, चावड्या, कोंडवाडे, दवाखाने, विहिरी, रस्ते, पूल इत्यादि कामें होत असून बाकी सर्व रिपेरीचीं कामें ही होत असतात. तेव्हां ४।९ लक्ष किंमतीचीं इमारती कामें २ लक्ष खर्चाचे रस्ते आणि ४-९ लक्ष रु. खर्चाच्या दरसालच्या रिपेरी हीं जेथें पब्लिक वर्क्स खातें करते तेथें तीं प्रांतातील ठिकठिकाणच्या जिल्हा बोर्डाकडे सोपाविण्यांत आल्यास हल्लीं प्रमाणें कामें चांगलीं निर्दोष होतील. आणि त्या मानानें पब्लिक वर्क्स खात्याच्या खर्चाचा बोजाही हलका होण्यासारखा आहे. पब्लिक वर्क्स खात्यामध्यें शिल्पविद्येची तज्ज्ञ मंडळी मोठी नामांकित असतात. आणि त्यांचा या व्यवस्थेनें हलक्या सलक्या कामाकडे कालव्यय होणार नाहीं. जिल्हा बोर्डालाही ही नवी कामगिरी मिळेल तर इंजिनिअरिंग कॉलेजांत शिकून उत्तीर्ण होणाऱ्या नव्या नव्या उमेदीच्या पदवीधरांस जिल्हा बोर्डांतून अधिक अधिक जागा देण्याला अवसर मिळेल. कालक्रमानें जिल्हा बोर्डाचे अधिकार लोकसत्तात्मक करण्याकडे जितका लोकांचा ओढा आहे तितकी अनुकूल सरकारी विचारांची दिशाही दिसून येते. तेव्हां नामदार दामले साहेबांच्या योजने प्रमाणें जर पब्लिक वर्क्स खात्याचीं सामान्यप्रतीचीं सर्व कामें जिल्हा बोर्डाला देण्यांत येतील तर सरकारलाही खर्चामध्यें पुष्कळशी काटकसर करण्याला संधी मिळेल आणि जिल्हा बोर्डाच्या कामाचें क्षेत्र बरेच विस्तृत केल्याबद्दल लोक सरकाराचे आभार मानतील. नामदार दामले यांचा हा १४ वर्षांच्या अनुभवाचा परिपाक आहे. आणि आह्माला कळविण्याला आनंद वाटतो कीं त्यांच्या साक्षींतील सूचना स्थानिक सरकारास इतक्या पसंत पडल्या आहेत कीं नामदार राजश्री स्टॅंडन कमिशनर यांनीं चीफ इंजिनियरच्या सल्यानें पब्लिक वर्क्स खात्याचीं पुष्कळशीं कामें जिल्हा बोर्डाकडे सोंपविण्याची सुरवात ही केली आहे

## स्वस्ति वचन.

### ( लार्ड चेम्सफर्ड यांचा दीर्घसूत्रीपणा, )

गेल्या इंपिरिअल कायदे कौंसिलच्या बैठकींत लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं प्रास्ताविक संभाषण केलें. त्यांत लोकच्छंदाला अनुसरून पुष्कळशा गोष्टी करण्याचा सरकारी संकेत व्यक्त केला. पण प्रत्येक विचाराच्या बाबतींत सरकारी दीर्घसूत्रीपणा सर्वत्र व्यक्त होत होता; इतकेंच नाहीं तर लोकांच्या प्रतिनिधींना अधीर वृत्ती, उतावळेपणा इ० विशेषणें ही लावण्यांत येत होतीं. इंडियांतील मजूर बाह्यकॉलनीमध्यें नेण्यांत येतात. आणि ही नेण्याची पद्धती गुलमगिरीच्या व्यापारापेक्षां ही अतिनिंद्य आहे व सर्वत्र वसाहतीमधून इंडियनांचा जो अपमान होत आहे तो ही असह्य आहे ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केल्या नंतरही मग तत्संबंधींचा कायदा करण्यांत विलंब वसाहतवाल्यांच्या सोईसाठीं व इच्छेसाठीं लागावा हें युक्त दिसत नाहीं. अर्थात् सरकारी आश्वासन या संबंधांत मिळालेलें आहे. तेव्हां त्या शुभकालाची मार्ग प्रतिक्षा करीत बसणें भाग आहे.

पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या रिपोर्टाला तात्कालिक मूर्तरूप देण्याबद्दलची व्हॅाइसराय साहेबांनीं आपल्या मनाची गर्दी व्यक्त केली; पण हा कमिशनचा रिपोर्टच इंडियाला कबूल नाहीं. हा रिपोर्ट महाराणीं सरकारच्या जाहिरनाम्याला अक्षता लावतो. आणि इतकीं वर्षें चालत आलेला काळा गोरा भेद कांहीं कमी करीत नाहीं. प्रस्तुतच्या इंडियन आकांक्षा व आशा या पहातां हा कमिशनचा रिपोर्ट गुंडाळी करून ठेवण्यांत जरी आला तरी कोणाला वाईट वाटण्याचें कारण नाहीं. ज्या दुःखाबद्दल आज सर्व राष्ट्रभर कल्लोळ माजला आहे तीं दुःखें अगदीं नवीं नवीं मात्र या कमिशननें केलीं आहेत. स्वराज्य हाच एक सध्याचा राजकीय उपाय आहे. आणि ज्या भाषणांत स्वराज्याच्या दिशेचें वारें नाहीं तें भाषण कितीही स्वास्तिवचनांनीं व गोड शद्बांनीं भरलेलें असलें तरी लोकांच्या दृष्टीनें त्याला कांहींच किंमत नाहीं. इंडियन लोकांना लष्करी शिक्षण देण्यासंबंधानें कांहीं विचार या संभाषणांत आले आहेत, पण त्या विचारापासून इंडियन तरुण पिढीच्या मनोवृत्ती जशा व्हाव्या तशा जागृत होणार नाहींत. साम्राज्य आपलेंसे वाटण्याला जितक्या गोष्टी ब्रिटिश लोकांना अनुकूळ आहेत, तितक्या गोष्टी उदार दिलानें व स्वातंत्र्य प्रितीनें देण्यांत येतील तरच इंडियन प्रजेला धन्यता वाटेल. आणि जिकडे ब्रिटीश रक्त धाव घेतें तिकडे तितक्याच वेगानें इंडियन रक्त ही धाव घेईल. आरमारी व लष्करी हुद्यांच्या जागा इंडियनास सारख्याच रीतीनें खुल्या पाहिजेत. जेथें सिव्हिल कारभारांत खुला दरवाजा नाहीं ह्मणून पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या रिपोर्टावर लोकांचा कटाक्ष आहे. तेथें लष्करी व आरमारी खात्यासंबंधानें इंडियन प्रजेला अंतःकरणाचा जिव्हाळा वाटेल असें स्वप्नही नको. विश्वास व प्रेम याच इंडियन अंतःकरणाच्या किल्या आहेत. आणि त्या जोंपर्यंत या राष्ट्रीय हृदय कपाटाला लागणार नाहींत तोंपर्यंत त्यांतील राजनिष्ठेच्या रत्नांमध्यें काय काय तेज व दीप्ती आहे हें सरकारास कळण्यासारखें नाहीं. जेथें गव्हर्मेंट हाउसमध्यें "राउंड टेबल" चीं खलबतें चालतात आणि इंडियनांचे हक्क व स्वातंत्र्य प्रच्छन्न करणारे कायदे प्रचलित आहेत, तेथें विश्वास तो कसला उत्पन्न होणार! आणि शुभकार्यामध्यें देखील दीर्घसूत्रीपणा सर्वत्र प्रचलित आहे तेथें कोरड्या स्वस्ति वचनांनीं प्रेमाचा झरा कितीसा वाहणार आहे बरें ! स्वराज्य हीच दीव्य देणगी ब्रिटिश साम्राज्याच्या हातीं आहे, आणि ती खुल्या दिलानें देईपर्यंत ब्रिटिश उदार तत्वांचा व स्वातंत्र्याचा पूर्ण विकास होणारा नाहीं. जेथें बेल्जम सारख्या अल्पराष्ट्राचें स्वातंत्र्य राखण्यासाठीं ब्रिटिश सरकार सर्व जगाला हलवून सोडणारें महायुद्ध करीत आहे तेथें इंडियाला एक शतकाच्या राज्यकारभारा नंतर ही स्वराज्य लाभत नाहीं. या दोन्ही गोष्टीं ब्रिटिश इतिहासांत विसदृश दिसतात. बेल्जमकडे परोपकार करण्यापूर्वीं आपल्या स्वतःच्या इंडियन राज्यांत स्वातंत्र्याचा न्याय दिला पाहिजे ही गोष्ट खऱ्या परोपकाराच्या बुडाशीं आहे असें आह्मी समजतों.

## महायुद्धाची प्रगति

गेल्या आठवड्यांत प्रस्तुतच्या महायुद्धरूपी नाटकाच्या शेवटल्या अंकाचा पडदा उवडला असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. जर्मनीला 'निर्वीरमुर्वीतलम्' झालें आहे अशी घमेंड वाटून तो सरसकट सगळ्या राष्ट्रांचा उपमर्द करण्यास प्रवृत्त झाला आहे. व्हर्डुनपाशीं झालेल्या मानहानीमुळें चिडून त्यानें साऱ्या जगाला आग लावण्यासाठीं हातांत कोलीत घेतलें आहे. इतके दिवस याच्या माकड चेष्टा अमेरिकेनें शांतपणें सोसल्या. तटस्थ राष्ट्रांच्या व खुद्द अमेरिकेच्या बोटी बुडविल्या तरी निवळ पत्रव्यवहार करण्यापलीकडे अमेरिकेच्या प्रेसिडेंटानें कांहीं केलें नाहीं. पण सहनशीलतेला तरी कांहीं मर्यादा आहे. त्या मर्यादेपर्यंत मजल येऊन पोचतांच अमेरिकेचा अभिमान आतां जागृत झाला आहे. जर्मनीचा पोरखेळ आतां मुकाट्यानें सहन न करतां त्याला चवदावें रत्न दाखवावें अशी इच्छा त्या राष्ट्राला झाल्यासारखी दिसते. तुमचें प्रस्तुतचें वर्तन असेंच चालू राहिल्यास तुमच्याशीं राजकारणविषयक संबंध आह्मांस तोडला पाहिजे येवढें सांगून अमेरिका स्वस्थ बसली नाहीं तर गेल्या आठवड्यांत त्याप्रमाणें तिनें तो संबंध तोडून ही टाकिला. याच्या पुढची पायरी ह्मणजे प्रत्यक्ष युद्ध सुरू करणें हीच राहिली आहे. जे अमेरिकन प्रेसिडेंट एकच महिन्यापूर्वीं जर्मनीच्या बाजूनें तहाच्या गोष्टी करण्यास तयार झाले होते तेच या अल्पशा अवधींत जर्मनीचें खरें स्वरूप ओळखण्यास शिकले हें चमत्कारिक तर खरेंच; पण राजकारणांत असे अकल्पित चमत्कार नेहमीं दिसतात.

## अमेरिकेची तयारी.

कोणत्याही राष्ट्राशीं होतां होईल तों युद्ध करावयाचें नाहीं ही अमेरिकेची राजनीति आज पुष्कळ वर्षें चालत आली आहे. पण आतां त्या नीतीचा भंग आपणांस करावा लागणार असें अमेरिकेला वाटूं लागलें आहे. शांततेच्या राजनीतीचा पुरस्कार केल्यामुळें दोनतीन वर्षांपूर्वींपर्यंत सैन्य व आरमार यांच्या तयारीकडे त्या राष्ट्रानें लक्ष दिलें नव्हतें. पण गेल्या दोन तीन वर्षांत त्या राष्ट्राला आपलें ही आरमार वाढवावें लागलें. १९१४ सालीं अमेरिके जवळ दोन नुकतीं बांधलेलीं सवाई बेडर लढाऊ जहाजें व ८ सामान्य बेडर जहाजें होतीं. बॅटल क्रूझरें मुळींच नव्हतीं व सशस्त्र क्रूझरें पंधराच होतीं. पाणबुड्या बोटी ही थोड्या होत्या. ५० नाशक बोटी होत्या. व वीस एक टार्पेडो बोटी होत्या. लढाईचें कारण न पडल्यामुळें सगळें सामान नादुरुस्त व लोक ही शिकून तयार न झालेले असे होते. पण लुसिटानिया बोट जर्मनीनें बुडविली तेव्हां अमेरिकेचे डोळे उघडले, व १० नवीं बेडरें जहाजें अतिशय जड तोफांसह त्यांनीं बांधण्यास सुरवात केली. इतर ही लढाऊ जहाजें बांधण्यास कांग्रेसनें परवानगी दिली. हीं आता तयार होत आलीं आहेत. अमेरिकेजवळ दोन वर्षांपूर्वीं फक्त एक डझन भर विमानें होतीं. हल्लीं किती आहेत तें ठाऊक नाहीं. अशा स्थितींत एकट्या जर्मनीशीं अमेरिकेची गाठ पडती तर काय परिणाम झाला असता कोणास ठाऊक! पण अमेरिकन लोकांच्या सुदैवानें जर्मनीला जेरीस आणणारीं आरमारें मित्रराष्ट्रापाशीं आहेत. त्यामुळें जर्मनीची मात्रा अमेरिकेपुढें चालणें कठीण आहे. बहुधा अमेरिकेला युद्धाचा प्रसंग येणार नाहीं, पण आलाच तर तो मित्रराष्ट्रांच्या पथ्यावरच पडेल असें दिसतें. अमेरिकेपाशीं सैन्य ही ह्मणण्यासारखें नाहीं. खडी फौज सारी एक लक्ष आहे. पण अमेरिकन नागारिक लष्करी शिक्षण घेऊन लवकर तयार होण्यासारखे आहेत व त्यांचा देशाभिमान व देशहितासाठीं स्वार्थत्याग करण्या विषयींची तत्परता विलक्षण असल्याविषयींची प्रसिद्धी आहे, व लढाई झालीच तर अमेरिकन लोक देशासाठीं किती स्वार्थत्याग करतील त्याला सीमाच नाहीं. हें जर्मनी ओळखून असल्यामुळें तो सहसा असा निकराचा प्रसंग येऊं देणार नाहीं, पण आलाच तर प्रस्तुत युद्धाचा लवकर शेवट होण्याचे कामीं त्याची निःसंशय मोठी मदत होईल.

## लढाईच्या बातम्या.

अमेरिकेनें जर्मनींतलें आपले वकील परत बोलाविले व जर्मन वकीलांना अमेरिकेंतून जाण्याचे परवाने दिले.

अमेरिकेंत जर्मनीचे १० हजार गुप्त हेर आहेत ते सरकारी इमारती व कारखान्यांचा नाश करतील ह्मणून त्यांवर सक्त पाहरा ठेविला आहे.

अमेरिकेनें जर्मनी बरोबर आस्ट्रिया-हंगेरीशीं ही राजकारण संबंध तोडून टाकिला आहे.

अमेरिकेनें जर्मनीशीं युद्ध केल्याबरोबर ब्राझिल ही तसें करणार आहे.

जर्मन युवराजानें आपली लष्करी कामगिरी चांगली बजाविली ह्मणून केसरनें त्याचा हुद्दा वाढवून त्याला पायदळाचा सेनापति केलें आहे.

जर्मनीनें बोटी बुडविण्याचा आपला

निश्चय कायम केल्यामुळें स्पेन तक्रार करणार आहे.

हालंडहून हिंदुस्थानांत व अमेरिकेकडे जाणाऱ्या बोटी तूर्त बंद ठेविल्या आहेत.

आतां हालंडला फार दिवस तटस्थ राहतां येणार नाहीं असें डचपत्रें म्हणूं लागलीं आहेत.

जर्मनीपासून जिंकून घेतलेल्या वसाहती त्याला आम्ही कधीं परत देणार नाहीं असें इंग्लंडमधल्या वसाहतींच्या सेक्रेटरींनीं बोलून दाखविलें.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—या सप्ताहांत पुन्हा २-३ दिवस पाऊस पडला व प्लेगाच्या स्थानत्यागाच्या गर्दीत पुष्कळशी विघ्नें आलीं. या पावसांतल्या सुखाची खरी कल्पना प्रत्यक्ष अनुभवावांचून शब्दानें येण्यासारखी नाहीं. या दुर्दिनांची फेरी संपली आहे असें आकाशांत बदलणारी चिन्हें सांगतात. उदयास्ताच्या समयाची ताम्र लाल क्षितिजें व त्यावर दिसणारीं ढगांचीं शिखरें हीं नाहींशीं होऊन आकाश निरभ्र, हवा निरोगी व सर्वच ऋतूकाल पुन्हां सुखमय होण्यासारखा रंग पालटत चालला आहे.

**प्लेग**—तारीख २७ जानेवारी अखेरच्या सप्ताहांत वऱ्हाड व मध्यप्रांत मिळून १९३४ प्लेगाचे मृत्यू झाले. पैकीं वऱ्हाडचे आकडे उत्तरोत्तर वाढत चालले आहेत असें खालील विल्हेवारी वरून दिसून येतें.

| | |
|---|---|
| **उमरावती जिल्हा** | |
| उमरावती | |
| एलीचपूर | |
| तळेगांव व २५ खेडीं | १३८ |
| **यवतमाळ जिल्हा** | |
| यवतमाळ | |
| पुसद | |
| वणी | |
| दारव्हा व २३ खेडीं. | १५२ |
| **आकोला जिल्हा** | |
| आकोला | |
| आकोट | |
| मंगरूळपीर व ४६ खेडीं | २२१ |
| **बुलढाणा जिल्हा** | |
| बुलडाणा | |
| चिखली | |
| शेगांव | |
| मलकापूर | |
| खामगांव व ६० खेडीं | ३८६ |
| | ८९६ |

आकोल्यास प्लेगाचे दररोजचे मृत्यू ३-४ पेक्षां अधिक नाहींत. पण उंदीर इतके मरत आहेत कीं तीं तीं स्थळें वर्ज करण्यांत आलीं नाहींत तर मनुष्य बळी पडण्याचा संभव मोठा आहे. लोक स्थानत्यागाचा मंगल उपाय स्वीकारून मंगल पवीत्र करीत आहेत. पण पावसानें मात्र मेहरबानी केली पाहिजे.

**दास नवमी**—येत्या शुक्रवारीं श्रीरामदास या महाराष्ट्रीय राजकीय संताची पुण्यतिथी आहे तेव्हां या दिवशीं सर्व राष्ट्रभर महोत्सव करण्यात यावा अशी मुंबईच्या 'उत्सव-मंडळी'नें सर्वांस विनंती केली आहे तरुण पिढीत नवजीवन व ईश्वरी चळवळ प्रसृत करण्याचा हा सुयोग आहे.

रा. रा. के. नैनुद्दीन आबदीन हैद्राबादचे ए. अ. कमिशनर हे येथें काम शिकत असून त्यांची बदली उमरावती जिल्ह्यास झाली आहे.

खान बहादुर सोराबजी शापुरजी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हुशंगाबाद यांस सध्या त्याच जिल्ह्याचे आफिशीएटिंग डिपटी कमिशनर नेमण्यांत आलें आहे. ही बढती नेमणूक चौथ्यानदा झालेली आहे ही आनंदाची गोष्ट होय.

रा. रा. वासुदेव रामचंद्र ढोबळे डिस्ट्रिक्ट अॅन्ड सेशन जज्य पश्चिम वऱ्हाड यांस १ ल्या डिसेंबरपासून रावबहादुर विनायक मोरेश्वर केळकर यांच्या डिपटी कमिशनर वर्ग ३ च्या हुद्याची बढती देण्यांत आली आहे.

रा. रा. क्रम्प फायनॅनशियल कमिशनर यांची स्वारी येत्या २१ व्या तारखेस बैतुलहून एलिचपुरास येईल. नंतर २३ तारखेपासून उमरावतीला येऊन कामें करून तारीख २७-२८ रोजीं मोर्शीला राहतील. त्या नंतर वरूड मार्गानें परत नागपुरास जाणार आहेत

**निरोप**—श्री टिळक हे गेल्या शुक्रवारीं परत पुण्यास रवाना झाले. प्रकृतीला दगदग सोसवेना म्हणून त्यांस उमरावती, वाशीम, पातुर, आकोट येथील निमंत्रणास होकार देतां येईना. 'स्वराज्य संघा'चीं कामें जोमानें चालविण्यासंबंधानें त्यांचा जो आग्रहाचा निरोप आहे त्याला मूर्त रूप देण्याची पुण्यक्रिया प्रत्येक हिंदी माणसाच्या हातीं आहे.

## पत्र व्यवहार

### आमचीं देवळें.

देवस्थानांस असलेल्या स्थाईक उत्पन्नाची व्यवस्था चांगली लागत नसून त्यांचे उत्पन्नाचा सदुपयोग होत नाहीं अशा दृष्टीनें कांहीं लोकाग्रणींचें लक्ष्य तिकडे लागलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु अशा स्थाईक उत्पन्नाच्या देवस्थानाशिवाय सार्वजनिक म्हणून मोडणाऱ्या लाखो मंदिरांकडे जनतेची दृष्टी गेल्याचें दिसत नाहीं. ही सार्वजनिक मंदीर संस्था केव्हांपासून सुरू झाली असेल हें सांगणें कठीण आहे. जगांतील मुख्यधर्म जसे— मुसलमानी, ख्रिश्चन पार्शी वगैरे वैदिक धर्मापासून जे बऱ्याच गोष्टींत वेगळे आहेत अशा धर्मांत देखील ही मंदिर संस्था आहे. मुसलमानांच्या मशिदी, किरस्तानांची चर्चेस व पार्शांच्या अग्यारि— हीं जशी सुव्यवस्थित व सुनियंत्रित चाललेलीं दिसतात तशीं आमचीं मंदिरें दिसत नाहींत. आंगणावरून घराची परीक्षा. आमचीं मंदिरें व त्यांची अनास्था पाहिली असतां आम्ही हिंदू म्हणविणाऱ्या ने आमचे हिंदुधर्मावर प्रेम किती आहे हें सहज दिसून येते. हिंदू शिवाय इतर धर्मियांचीं धर्म मंदिरें हीं जिवंत संस्था आहेत. आमचीं मंदिरें म्हणजे ही एक पुरातन काळची धर्ममत दर्शक स्मारकेंच होत. आमच्या या पुरातन 'संस्थांची' अनास्था किती खेदजनक व शरम उत्पन्न करणारी आहे याचा अगदीं थोडा विचार केला असतांही सहज लक्षांत येण्यासारखें आहे. ही स्थिति पालटण्या करितां आपला पुरातनपणा कायम राहून आपणास काय करतां येईल याचा विचार करणें आहे.

आमचीं मंदिरें म्हणजे अधर्म व अनितीचीं घरें होत. अशा तऱ्हेची कांहीं लोकांची ओरड आहे. परंतु हा दोष मंदिरांचा नसून ज्यांचे ताब्यांत हीं मंदिरें असतात त्यांचा आहे. धर्माची व्याख्या अत्यंत संकुचित झाल्यामुळें या धर्ममंदिरांचा उपयोग ही अत्यंत संकुचित झाला आहे. देवळामध्यें एका विशिष्ट देवतेची मूर्ति व तिची पूजा अर्चा या शिवाय धर्ममंदिरांचा विशेष उपयोग केला जात नाहीं. पुराणें व कीर्तनें देखील लोक खासगी जागेंत करणें पसंत करतात. दुसरे पक्षीं पाहावें तो सार्वजनिक कामाकरितां सोईस्कर जागा नाहीं म्हणून लोक ओरड करतात. परंतु द्रव्याचे अभावामुळें त्यांस तशा सोईस्कर जागा बांधतां येत नाहींत. बोलतांना हिंदू म्हणविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचें जीवित धर्माचे पायावर आहे असें म्हणावयाचें तर मग आमचा प्रत्येक व्यवहार व्यक्तिशः व सार्वजनिक हा धार्मिकच असतो असें म्हणण्यास काय हरकत आहे. राज्यकर्ते परदेशीय व परधर्मी असल्यामुळें राजकीय गोष्टींचा अंतर्भाव धर्मांत न केला तरी बाकी सर्व गोष्टींचा जसें— सामाजिक औद्योगीक प्रत्यक्ष धार्मिक व शिक्षण विषयक गोष्टींचा अंतर्भाव धर्मांत होऊ शकतो व अशा सर्व गोष्टी करतां देवळांचा उपयोग करण्यास कांहींच हरकत नाहीं. सर्वच देवळें अशा विशिष्ट कामाकरितां योग्य असतात असें नाहीं. परंतु गांवांत एखादें दुसरें देऊळ तरी मोठे व चार मंडळी बसण्यासारखें असतें. हिंदू म्हणविणारे सर्व लोक पंचायतनापैकीं कोण्यातरी एका देवतेला विशेष तऱ्हेनें मान देतात. जेथें ज्या देवतेस जास्त मान देणारे लोक असतात तेथें त्या देवतेचें प्रमुखत्वें करून मंदिर असतें. वर लिहिल्याप्रमाणें ज्या देवळांस कायमचें उत्पन्न नाहीं तीं बहुत करून अडाणी अशा गुरवाचे स्वाधीन असतात व तो ठेवील त्या प्रमाणें त्यांची व्यवस्था असते ! व असें झाल्यामुळें बिचाऱ्या देवतेची आबाळ व तिचे भक्तांची ही फजिती. या देवळांची व्यवस्था चांगल्या लोकांचे हातांत गेल्यानें देवळाची व्यवस्था राहून देवळांतील अधिष्ठात्री देवतेकडे तिचे भक्तांचें सहजच जास्त लक्ष लागणार. ही व्यवस्था शिकलेल्या व होतकरू लोकांनीं आपणाकडे एकदम घ्यावी. कार्यकारी मंडळाची योजना करून चिटनविसाची योजना व्हावी. चिटनवीस हा आस्तिक बुद्धीचा असला पाहिजे हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. गांवांत मुख्य मुख्य जितकीं मंदिरें असतील तितके गांव पाहून गांवाचे मानानें भाग करावे. ज्या अधिष्ठात्री देवतेचे संरक्षणाखालीं जितका भाग घेतला असेल तितक्या भागांतील प्रत्येक हिंदू म्हणविणाऱ्याचें नांव नोंदलें जावें व प्रत्येकास मर्जीप्रमाणें त्या त्या मंदिराचे खर्चा करितां द्रव्य द्वारां मदत करण्याची विनंति करावी. देवतेचे नांवानें जमलेल्या पैशाचा विनियोग नोंदलेले लोकांचे संमतीनें होत जावा. अशा रीतीनें सार्वजनीक देवळें सार्वजनीक अमलाखालीं घेतल्यानें समाजास अनेक तऱ्हेनें उपयोग होऊन आज जागेबद्दल भासणारी अडचण असतः दूर होईल. केलेल्या सूचनांचा लोक जरूर विचार करतील असें समजून आपणास तसदी दिली आहे. या बद्दल आपण ही आपले विचार आपले पत्रद्वारें प्रकट करतील.

बालाघाट

ता. १६-१-१७ सेवक.


इजारदार व इनामदार सभा यवतमाळ

## सभेची नोटीस

इजारदार साहेब यांस:—

वि. वि. 'इजारदार व इनामदार सभे'ची **वार्षिक सभा गुरुवार ता० १५ माहे फेब्रुआरी सन १९१७ इसवी** रोजीं सकाळीं आठ वाजतां सभेच्या दिवाणखान्यांत भरविण्याचें ठरलें आहे. या सभेंत गेल्या दीड वर्षाचा सभेच्या कामाचा **रिपोर्ट** व झालेल्या **जमा खर्चाचा हिशेब** सभेच्या विचारा करितां व मंजूरी करितां मांडण्यांत येईल. तसेंच **इजारा देनन्नी बिलाची** कारवाई कोठपर्यंत आली आहे, सरकारकडे व प्रांतांतील एकंदर जनतेकडे इजारदार सभेनें आपलें गाऱ्हाणें कसें पोहोचविलें, त्याचा परिणाम काय झाला, इजारदार सभेचें पुढचें कार्य काय आहे वगैरे महत्वाचे गोष्टीचाही या सभेत विचार व्हावयाचा आहे. तरी आपण स्वतः सभेस हजर राहाण्याचें करून आपले शेजारचे इजारदारांसही हजर राहण्याविषयीं कळवावें ही विनंति.

आपले

यवतमाळ
२०-१-१९१७ } दत्तात्रय कृष्णाजी काळे.
मार्तंड सखाराम हजरनवीस
सेक्रेटरी
इजारदार व इनामदार
सभा

अगोदर हें वाचा. नंतर निराश व्हा

## प्रारब्धपरीक्षा

फुकट पाठवूं.

खालील दोन्ही कामें एकदम मागावणारास छापील फार्मावर संपूर्ण माहितीसह पत्रिका बक्षीस म्हणून फुकट करून पाठवूं.

फक्त प्रश्न, वेळ आणि वय व इच्छेप्रमाणें वाटेल ते ६ प्रश्न स्पष्ट लिहून पाठवीं उत्तर १ रु. ४४ च व्ही. पी. नें अनुभवशीर पाठवूं. शिवाय जन्मकुंडलीवरून एका सुप्रसिद्ध ग्रंथाधारें आयुष्य असे तोंवरचीं फलें लिहून पाठविल्यास १ रु. ८४ विशेष माहिती पत्रद्वारें उत्तरास ४१ तिकिट पाठवा.

ज्योतिषी दा. दाजिशास्त्री नं. १०३७
नाशिक

नो. नं. ७३

# पाहिजे.

सेकंड हॅन्ड ऑइलएंजीन २० ते ३० हार्सपावर पर्यंत जीन अगर दळण्याचे चक्क्या सहीत पाहीजे आहे सर्वास्तर खुलासा खालील पत्यावर करावा.

नारायणलाल—रामलाल अगरवाले
अडत दुकान आकोला वऱ्हाड
नो. नं. ६८

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं तारीख २ फेब्रुवारी सन १९१७ रोजीं हरी वल्लद सभुला माहार राहणार वडाळी याचा रोखा आकोट मार्गानें चंडीकपुराहुन गेलो असतां अतीशय पाणी आले त्या गरवडीनें रोखा खिशातुन पडला. कोणास सापडला असल्यास त्यांनी खालीं सही करणारास आणून द्यावा. त्याचे मेहनती-बद्दल रुपये ५ बक्षीस दिले जातील कळावे तारीख ३-२-१९१७ इ.

सही
कोंडो विठ्ठल जोशी राहणार
वडाळी दस्तुर खुद्द
नो. नं. ६९

## जाहीर नोटीस

सर्वत्र सेट सावकार व इतर सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं माझा नवरा नामे देवराव जगदेवराव देवरे मराठे राहणार मौजे माहारखेड प्रगणें सिंदखेड तालुका मेहेकर जिल्हा बुलडाणा यांचे नांवे मौजे माहारखेड प्रगणें सिंदखेड तालुका मेहेकर येथील.

| शे. स. नं | ए. गुं. | आ. रु. |
|---|---|---|
| १ | २७४१६ | १८ |
| ३४/१ | ४८३० | ४॥ |

अशी जमीन असून ती कबजात आहे. परंतु माझा नवरा देवराव हा वेडगळ झाला आहे तरी वरील जमीन माझे शिवाय अगर तर्फे माझा सख्खा भाऊ खंडेराव बाजीराव या शिवाय खरेदी गहाण विक्री वगैरे कोणतेच प्रकारचा देव-घेवीचा व्यवहार करूं नये. केल्यास तो रद्द होईल कळावे तारीख २-२-१९ इ.

दस्तुर खंडेराव बाजीराव रा० सावणी दस्तुर खुद्द

सही
दल्बाई जवजे देवराव द० खु०
नो. नं. ७०

## नोटीस

रा. लक्ष्मण नारायण आप्पा वाणी रा० जानेफळ ता. मेहेकर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तारीख ११-१२-१६ रोजीं तुह्मी खातेबाकीचा हिशेब करून मज-कडे ६६१ काढले आणि मी तुमचे विश्वासावर हिशेब न पाहतां रुजु हिशेब करून दिला व आतां मी घरीं हिशेब पाहतांना मजकडेस इतकी रकम होईल असें मला वाटत नाहीं. या वरून मी तुह्माकडे येऊन हिशेब मागीतला असतां तुह्मी दिला नाहीं. तसेंच माझे सोन्याचे कडे तुह्मी कापड खरेदीचे वेळीं नेलें होंते. तें मी तुमचे जवळ प्लेगमुळें ठेवले. आतां तुमचा माझा जीनसंबंधी बेबनाव झाल्यामुळें तुह्माकडे आतां देऊं असे सांगतां व हिशेबही तपासण्यास देत नाहीं तर तुह्मी केलेल्या हिशेबाच्या रकमा कशा झाल्या याजबद्दलचा हिशेब आणि सोन्याचे कडे ही नोटीस पावल्यापासून १० दिवसाचे आंत मला द्यावे. जर तुह्मी हिशेब देणार नाहीं तर मी करून दिलेला हिशेब रद्द समजावा आणि सोन्यांचे कडें देणार नाहीं तर रीती प्रमाणें योग्य कोर्टांत फिर्याद करीन कळवे ता० २६-१-१७ मु. जानेफळ

सही
यशवंत नारायण पाटील रा० जानेफळ
दस्तुर खुद्द
नो. नं. ७१

## नोटीस

पुंजाजी वा देवाजी हुंबड रा. टेंभुर्णे ता. खामगांव

यांसः—

नोटिस देणार पुती मर्द पुंजाजी हुंबड रा. टेंभुर्णे हल्लीं वस्ती पारखेड ता. खामगांव जि. बुलढाणा नोटिस देते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवेरे आहांत. तुह्मी मला आज ८ वर्षें झाले माझे आईबापाचे घरून ह्मणजे पारखेड्याहून नेले नाहीं. मला माझे आईबापानीं आपले घरीं २।४ वेळां आणून घातले. तरी मला ८।४ दिवस ठेवून पुन्हा आईबापाचे घरीं आणून घातले. व मला एक मुलगी खडी नांवाची आहे. तिचे लग्न करण्याकारितां तिला घेऊन गेले, तरी मला लग्ना करितां सुद्धां नेलें नाहीं. तरी आज पावेतों मी माझे बापाचे घरीं जगदेव काळे याचे कर्ज रक्कम रुपये ३०० काढून आज पावेतो उदर निर्वाह केला. आतां मजजवळ खाण्याला कांहीं राहिले नाहीं. व जगदेव काळे टाकळी विरोकार यानें पैशाची फार तंगी लाविली आहे. करितां आपण जगदेव काळे याचे वरील कर्ज देऊन मजला ८ दिवसाचे आंत घेऊन जावे. आपण जर कर्ज देणार नाहीं अगर मला आपले घरीं घेऊन जाणार नाहीं तर हीच फारकत समजावी. ही नोटिस दिली सही ता. ७-२-१७ इ०

सही
पुती मर्द पुंजाजी हुंबड रा. टेंभुर्णे
हल्लीं वस्ती पारखेड ता. खामगांव
नि. आंगठा खुद्द
नो० नं० ७२


# हात मागाचा मोठा कारखाना.

## अगदीं पक्क रंगाचीं लुगडीं पाहिजे असल्यास

# कला-भुवन सोलापूर.

यांच्याकडे मागणी करा.
लछमय्या व्यंकटनरसू इरावती,
मालक,
नो० नं० १०



## हिमालयांतील दिव्य महौषधींचीं औषधें.

सर्वप्रकारचे नेत्ररोगांवर रामबाण औषध किं. १ रू. पो. ख. शिवाय.

रक्त शुद्ध करणारी दिव्य वल्ली किं. १॥ रुपया दि. ७ शिवाय. अभ्रक, मौक्तिक वगैरे उंची माल व्ही. पी. नें पाठवूं.

पत्ता— वैद्यराज विठ्ठल शास्त्री
परांजपे पुणें ३३८ बुधवार चौक
नो. नं. १२



ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिवृद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व भडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १९५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सकाच, पुपस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका वटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० ।। भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा कॅटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आ यशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णें, जिल्हा रत्नागिरी.
कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
नो० नं० २२


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

## Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख १९ माहे फेब्रुवारी सन १९१७ ई० [अंक ८

### नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

किर. दिवाणी मुकद्दमा नंबर ११ सन १९१७ इ. विद्यमान डिस्ट्रिक्ट जज्ज साहेब यांचे कोर्ट

मुक्काम आकोला

नांव सूर्यभान
बापाचें नांव नवशाजी
जात देशमुख राहणार हिसांग
तहसील आकोला जिल्हा आकोला
च्या अल्पवयी बापुराव वामनराव
उमर वर्षे ८
राहणार हिसांग आकोला तहसिलीचे (२)
शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१)
नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस कळविण्यात येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २० माहे मार्च सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांना जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १२ माहे फेब्रुवारी सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्का निशीं दिली

सही
W. R. Dhobley
डि० जज्ज
पश्चिम वऱ्हाड
आकोला

नो. नं. ७४


# पाहिजे.

सेकंड हॅन्ड ऑइलएंजीन २० ते ३० हार्सपावर पर्यंत जीन अगर दळण्याचे चक्क्या सहीत पाहीजे आहे सविस्तर खुलासा खालील पत्त्यावर करावा.

नारायणलाल—रामूलाल अगरवाले
अडत दुकान आकोला वऱ्हाड

नो. नं. ९८


## NOTICE

Notice under section 44 (2) of the Berar Municipal Law is given to the public of Khamgaon that the Municipal Committee of Khamgaon Buldana District has at their special meeting held on 30th January 1917 proposed the imposition of a tax on dogs kept within the limits of that Municipality vide section 41 (1) (A) (c) of the said Law and has framed the following rules for the recovery of the same.

Any inhabitant of Khamgaon objecting to the proposed tax and to the rules thereof may within thirty days from the publication of this notice submit his objection in writing to the Committee for consideration.

### RULES.

1. Every person who keeps any dog or dogs within the limits of the Khamgaon Municipality shall pay a tax of annas eight a year for each dog, but the maximum tax for any number of dogs shall not exeed Rs. 5/-

Proviso:——No tax shall be livied in respect of pups under six months old on the 1st April.

2. Any person who after the first April is or becomes the owner of a dog or dogs not exempted under proviso to rule 1 shall be liable to pay the full tax for the year ending on the following 31st March.

3. Any person who after the 1st April of any year ceases to own any dog or dogs for which he has already paid the tax according to rule 1 shall not be liable in the same year to any further tax for any new dog or dogs of which he may become the owner, provided that the number for which he has paid the tax be not exceeded.

4. The tax shall be payable in advance on or before the 15th April in each year.

5. Every person who keeps any dog or dogs within the limits of the Khamgaon Municipality shall register the same in a book to be kept by the Committee for the purpose and obtain a license from the Committee which shall be renewable within 15 days from the first day of April in each year.

6. Every dog so registered shall wear a brass disc bearing the number in the register. This disc shall be supplied by the Municipality free of cost.

7. If after the issue of the license and disc granted under those rules, such license or disc is lost or destroyed the owner shall at once report the fact to the Committee and obtain a duplicate thereof from the Committee. Duplicate discs will be supplied at a charge of annas two for each.

8. Every person living within the limits of the Khamgaon Municipality shall be bound to give true information regarding the number of dogs owned or possessed by him when called on to do so by the Committee.

9. Any person convicted of breaking rules 5, 6, 7, or 8 shall be punished with fine which may extend to Rs. 50/-

G. R. Kothare
Vice Chairman
Municipal Committee
Khamgaon

FORM OF LICENSE.

License No. Disc No.
Name of owner... ...............................
Description and No. of dog or dogs.........
Amount of tax in words.......................
This license is valid from.........191 till ......191 Rs.......As........

Secretary
Municipal Committee
Khamgaon.

Bill Collector.

Dated............191

No. N. 75

## NOTICE

Notice under section 150 (1) of the Berar Municipal Law is given to the public of Khamgaon that:—

The Municipal Committee of Khamgaon have, at their special meeting held on 30th January 1917 passed a resolution framing the following rules under section 116 (1) (d) 116 (J) and 116 (2) of the Berar Municipal Law 1886 for regulating the erection or re-erection of buildings within the limits of the Khamgaon Municipality along with the written directions to be issued under section 85 of the said Law to any person giving notice of his intention to erect or re-erect a building.

These will supercede the rules published under Hydrabad Residency Notification No. 177 dated 20th April 1899.

Any inhabitant of Khamgaon objecting to the proposed rules and written directions may submit within thirty days from the date of publication of this notice his objection in writing to the Committee for consideration.

### RULES.

1. Every person who intends to erect or re-erect any building or to construct, re-build or open a new door or any drain or cess-pool leading on to a public road or other Municipal or Nazul land shall, before beginning to erect or re-erect such building, or construct, re-build or open such drain or cess-pool or other work aforesaid give notice in writing to the Committee of his intention to do so in the form appended to these rules.

Provided that such notice need not be given when any addition, alteration or construction proposed makes only an internal change in the existing building without affecting its outer or main structure.

Note:——The expression " erect any building " shall have the meaning assigned to it in the explanation to section 85 of the Berar Municipal Law.

2. Every person who gives a notice required by rule 1 shall, with such notice, furnish:-

(1) a site plan, in duplicate, drawn to a scale of not less than 20 feet to an inch, and showing:-

(a) the existing building, if any, and the land belonging to or occupied by the applicant;

(b) the position of the building and appurtenant out-buildings to be erected or re-erected on the land.

(c) the area to be occupied by the building and out buildings to be erected or re-erected on the land.

(d) the names and the width of the adjacent roads, streets, lanes and the situation of neighbouring buildings.

(e) the position of drains, privies or cess-pools existing or to be constructed; and

2. a plan with sections, in duplicate, drawn to a scale of not less than 10 feet to an inch and showing.

(a) the levels at which the foundations and the lowest floor or plinth are proposed to be laid with reference to the level of the adjacent roads or streets.

(b) the number of stories proposed to be built, and

(c) the arrangements intended to be made in respect of light and ventilation in each room in the building.

(i) Provided that if the person giving notice satisfies the Secretary or any other officer deputed by the Committee for the purpose, that the building will cost less than Rs. 500/-, a rough sketch showing the particulars required under clauses (1) and (2) above shall be sufficient, but the site plan must, in all cases, show accurately the position and dimensions, of the land on which (or a portion of which) the building and out-houses are to stand.

(ii) Provided further that if, after a plan has been sanctioned, the person erecting a building wishes to make changes in the same, he need not give notice to the Municipal Committee and obtain its sanction if those changes do not affect the outer or main structure and do not involve contravention of any of the written directions issued by the Municipal Committee under section 85 of the Berar Municipal Law.

### PROCEDURE.

3. Notice received under rule 1 shall be registered in a register to be kept for the purpose.

4. The notice with the plan and other papers relating thereto shall be sent at once to the Ward members for opinion, who shall return them, with their opinion and remarks as to the sanitary and other aspects, to the Secretary within seven days from the date of receipt thereof.

5. On receipt from the Ward members, the Secretary shall place those papers before the Vice Chairman, or the Chairman, Sanitation Sub Committee, or such officer authorized by the Committee, who will place those papers with his report before the sub Committee, who may

either sanction the proposed building out right or subject to such alterations and qualifications of the plan and specifications as they may think fit or may report the case to the General Committee as one in which sanction should be refused under section 85 of the Berar Municipal Law.

6. When the sanitation sub Committee or the Managing Committee shall have finally approved of the building, the secretary shall issue in writing a permit to build which shall be valid for one year from the date of issue, such permit shall be accompanied by the plan as sanctioned and shall show any alterations or qualifications of the original plan ordered by the Sanitation Sub Committee or the Managing Committee.

7. On the disposal of the case the Secretary s all file a copy of the sanctioned plad and the instructions in the Municipal office for the future reference.

8. The Secretary or such other officer as the Managing Committee or the Sanitation Sub Committee may appoint, shall inspect the building while in progress and if he finds that the sanctioned plan and instructions have not been followed, he shall put the matter for disposal before the sanitation Sub-Committee or the Managing Committee at once.

9. A person who has obtained perission to build shall on being required by a Municipal officer, produce his permit and the sanctioned plan and instructions for inspec ion.

FORMS AND PLANS.

10. The form of notice under rule 1 will be supplied from the office of the Secretary free of charge on demand.

11. The plan required under rule 2 will, if so desired be prepared in the Committee's office at the cost of the person intending to erect or re-erect any building and at such rate as may be determined by the Committee from time to time.

PENALTIES.

12. A breach of rules 1 and 9 shall, on convection before a Magistrate, be punished with fine not excerding Rs. 50/- and when the breach is a continuing breach, with a further fine which may extend to Rs. 5/- for every day after the first during which the breach continues.

G. R. Kothare
Vice-chairman
Municipal Committee
Khamgaon.

FORM OF NOTICE.

To
The Secretary
Khamgaon Municipal Committee
Dated the.................. 19

Sir,

I hereby give you notice that I intend to erect or re-erect a storied building at present No. in Division near in accordance with the rules made under section 116 (1) [j] of the Berar Municipal Law 1886.

The necessary plans, sections and elevations in duplicate and other particulars, as required by the rules are furnished herewith.

Signature
Address

Written directions which may be issued by the Municipal Committee under section 85 of the Berar Municipal Law 1886 to any person giving notice of his intention to erect or re-erect a building.

1. With regard to the buildings which are to be newly erected, the following provisions shall have effect viz.

(a) the foundation of any such building shall not be constructed on any site which has been filled up with, or has been used as a place for depositing faecal matter or the carcasses of dead animals or other filthy of fensive matter, until such matter shall have been properly removed to the satisfaction of the Committee:

(b) the lowest floor of all buildings intended for habitation must be at least 1½ feet above the ground level.

(c) every room intended to be inhabited in a building shall have a clear superficial area of not less than 48 squar feet and shall have at least one door or window opening directly into the external air or into a verandah or room which opens directly into the external air. The total area of such doors or windows shall not be less than one-tenth of the floor area of the room or rooms supplied.

(d) every room intended to be inhabited in any such building, except a room in the roof thereof, shall be in every part at least 8 feet in height from the floor to the ceiling and every room in the roof thereof shall have a height of at least 5 feet.

(e) for the purpose of securing free circulation of air or for facilitating scavenging, or for the prevention of fire, the Sanitation Sub Committee or the Managing Committee may order that a space not less than 3 feet in width shall be left between the proposed building and any adjoining building and

(f) in the case of newly opened streets or of existing streetr which may be widened os straightened, a space of not less than six feet shall, unless the Sanitation Sub Committee or the Managing Committet otherwise directs, be lefe through out its length between any new building and the nearest boundery of the street or road side drain.

2. Any person proposing to erect or re-erect a building by a road side drain shall leave a clear space of at least 1½ feet between the drain and the nearest part of his building adjoining the drain.

3. The height to which a building may be erected or raised shall be regulated by the width of the street on which it abuts in accordance with the following instructions, Viz.

(1) If the width of the street does not exceed 26 feet the building shall not be erected or raised to a height greater than 1½ times the width of the street;

(2) If the width of the street exceeds 26 feet but does not exceed 40 feet the building shall not be erected or raised to a height greater than 40 feet.

(3) If the width of the street exceeds 40 feet the building shall not be erected or raised to a height greater than the width of such street; and

(4) Where the buildings abuts upon more than one street the height shall be regulated by the wider of such street so far as it abuts upon such wider street and also to a distance of 80 feet from such wider street so far as it abuts upon the narrower of such streets.

4. No room int nded to be inhabited shall be constructed over a privy, whether old or new.

5. No person shall use, or permit to be used, as a bathing place or as a place for washing clothes or domestic utensies any part of any premises which has not been provided with all such appliance and fittings as shall in the opinion of the Committee be necessary for collecting the drainage thereof and conveying the same therefrom.

6. Notwithstanding any thing in the foregoing directions it shall be in the discretion of the Committee by written permission—

(a) to permit any of the dimensions prescribed by any such direction to be modified in respect of a building or

(b) to exempt from the operation of any such directions or any of them, any temporary structure intended to stand for a shorter period than three months, but subject in each case to such conditions, if any as they may think proper to attach to such permission or exemption.

CONSTRUCTION OF PRIVIES.

7. No privy shall be erected or re-erected except on a site approved of by the Committee. Ordinarily one privy seat shall be provided for every 12 adult members living in the house.

8. No privy seat nor the foundations thereof nor any drain or cess-pool intended for carrying off sewage water shall be constructed of mud or brick in mud.

9. Every privy shall have an opening for openings for ventilation near the top aggregating not less than four square feet.

CONSTRUCTION OF DRAINS.

10. All waste-water drains or sewage drains appertaining to a building shall be so constructed as to be easy of access and inspection by a Municipal official and shall not be coverd except with the special permission, in writing, of the Sanitation Sub Committee or the Managing Committee. No sewage drain or drain-pipe carrying sewage water shall run through a room intended for use by human beings.

11. In cases of emergency the Vice Chairman or the Chairman, Sanitation Sub Committee or any such officer authorized by the Committee, may on the recommendations of the Ward members permit the commencement of any building or other work in anticipation of sanction but his order will be subject to the approval and confirmation of the Sanitation Sub Committee or the Managing Committee.

No. N. 73

## नोटीस

नोटीस बेशमी बनू मर्द भगाजी मराठी रा० पींपरी दिवट ता० पुसद

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुं माझी सख्खी भावजय असून मौजे पींपरी येथील.

स० नं० २०-५६-५९ एकूण ५ पाच २ ४-६-२ १

होते. रे. ऑफ राईटचीं नेंद तुझे नांवे एक त्रितीयांश वरील जमीनीवर झाली आहे. हल्लीं तूं मुलगा दत्तक घेणार आहेस असें ऐकतो. तूं माझे विचाराशिवाय कोणताच व्यवहार करणार नाहीं असें वचन देवून ही करीत आहेस. तर या नोटिशीनें कळविले जाते कीं, दत्तक किंवा जो कांहीं व्यवहार तूं करशील तो सर्व रद्द समजला जाईल. माझे विचाराशिवाय तूं काहींच करूं नये. नोटीस पावले पासून ८ आठ दिवसांत माझा नोटिशीचा खर्च देवून विचार करावा. दत्तकाचीं योग्य कारण दाखवावीं तारीख १३-१२-१६ इ०

द० रु० वा० पांडे मुळावा

सही

नि० बाळाजी बा रघूजी याचा आंगठा असे

नो० नं ७४

## नोटीस

नोटिस बेशर्मी बापू वा जनु आडनांव लाबठ राहणार आपटी प्रगणे वणी तालुके वणी जि. यवतमाळ

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आह्मी तुह्मास मौजे मझीद्र या गांवचे सहा आण्याचे हिश्याबद्दलचे कामाकरितां मुखत्यार नेमून जनरल मुखत्यारपत्र लिहून देऊन नोंदून दिल्यास अंदाजा चार वर्षें झाली असतील. परंतु हल्लीं त्या कामाचा निकाल झाला आहे. करितां ही नोटिस तुह्मास पावल्यापासून तुमचे मुखत्यारपत्र आह्मी रद्द केलें आहे. सदर्हू कामाकारितां तुह्मी वेळोवेळीं पैसे आमचे जवळून नेले आहेत. त्याचा हिशोब तुह्मी आह्मास दिला नाहीं. तर तो हिशोब समजून द्यावा हिशोब न दिल्यास आह्मी तुमचेवर दिवाणींत दावा करू. या मुखत्यार पत्राबद्दल नौकरी वगैरे पगाराचा ठराव तुमचा मुळींच झाला नाहीं असा पुरावा आहे. तर हें मुखत्यारपत्र रद्द केल्यापासून तुह्मी आमचे तर्फे कोणचेही काम करू नये. व पैसे घेऊं नये कळावें. तारिख १०-२-१७ इसवी दस्तुर धोंडो सखाराम पेनशनर नाझर राहणार वणी हल्लीं मुक्काम कोलगांव इजारा

सही

सहीचीं निशाणी देवाजी वा गोविंदा आडनांव लाबट राहणार मझीद्र याचे हातची असे दस्तुर धोंडो सखाराम रा. वणी

नो० नं० ७९

वऱ्हाडसमाचार

मिति माघ वद्य १२ शके १८३८

## ग्राम पंचायती.

नं. १

A perfect democracy is the most shameless government in the world.
Aristotle.

सर हेनरी मेन यांच्या दोन अमूल्य ग्रंथांवरून हें दिसून येईल कीं अद्यापही पुरातन संस्था आपल्या लोकांमध्यें आहेत. या प्रांतांत, मध्यप्रांतांत आणि विशेषतः मुंबई इलाख्यांत पाटील पटवाऱ्यांस वतनें आहेत. त्यांची पूर्वमीमांसा शोधूं गेलें असतां पाटीलकी हक्क लोकांस कां व कसे प्राप्त झाले हें सी. पी. रेव्हेन्यु मॅन्युअल Vol 1 किंवा सी. पी. लँड रेव्हेन्यु कोड कलम ५७ आणि कलम ६९ (अ) वरून सहज कळून येण्यासारखें आहे. हल्लीं-ही बहुतेक गांवांत निदान या प्रांतांत तरी पूर्वींच्या गांव पंचाईतींचा थोडा फार पत्ता लावतां येण्यासारखा आहे. निजामशाहींत व त्याच्याही पूर्वीं गांव वसविणें वसाहतदृष्ट्या अत्यवश्य होतें. वाढत्या लोकसंख्येस अन्नसामुग्री पुरविण्याचें साधन शेतीच्या वाढत्या लागवडी वाचून नव्हतें. शेतीची वाढ होण्यासाठीं गांव बसविणें जरूर होतें. जे लोक आपल्या द्रव्यानें, आपल्या लोकप्रियतेनें आणि आपल्या स्वतःच्या ओजोगुणानें व तेजोबलानें गांवें बसवूं शकले त्यांस ते वेळीं सरकार नुसते गांवेंच वसवूं देत होते असें नाहीं; तर त्यास ह्मणजे मूळ ग्रामसंस्थापकांस आपल्या गांवापुरते बरेच राजकीय स्वरूपाचे, अंमलबजावणीचे, न्यायशिस्तीचे हक्कही सरकार देत असे. या प्रमाणें हल्लीं वतनदार मानली गेलेलीं पाटील घराणीं उदयास आलीं. ते वेळीं न्यायसभा हल्लीं प्रमाणें विस्तृत, व्यापक व नियमित नव्हत्या. यामुळें बरेच वाद स्थानिक पद्धतीनेंच मिटवावे लागत असत. तेवेळीं सर्व नुतन संस्थापित गांवांमध्यें पाटील नायक आणि प्रमुख असल्यामुळें व बाकीची रयत त्यानेंच आणून बसविली असल्यामुळें बऱ्याचशा ग्रामकल्हांत पाटलांची आज्ञा शिरसावंद्य असे व पाटील जितका समबुद्धी, न्यायी व दूरदर्शी असेल, तितका तो आपल्या गांवची शिस्त पाळण्यास अधिक लायख असे. पाटलांस अधिकार देऊन गांव वसवूं देणें तेवेळीं दुसऱ्याही एका कारणामुळें विशेष जरूरीचें होतें. हल्लीं देखील मंडला, बेतूल, चांदा आणि रायपूर जिल्ह्यांत दहादहा बाराबारा मैलांत एक मनुष्य देखील दिसत नाहीं. असे पुष्कळ भूप्रदेश आहेत. हल्लीं पूर्वींच्या मानानें प्रवास फार सुगम झाला आहे रेल्वे, पक्क्या सडक, शीघ्रगामी वाहनें अल्पखर्चानें उपलब्ध होऊन अल्प दिवसांत मनुष्य एका टोकापासून या देशाच्या दुसऱ्या टोकापर्यंत जाऊ शकतो. तरी देखील प्रत्येक जिल्ह्यांत लष्करी सैन्याची एकादी तुकडी प्रवास करील तर तिला मुक्काम करण्याकरितां छावणीसाठीं गांवें व त्यांतील जागा नेमून दिलेल्या आहेत. हल्लीं उतरणाऱ्या लष्कराची सर्व सरबराई करण्याकरितां सरकारनें आपले मुल्की अधिकाऱ्यांवर जबाबदारी टाकलेली आहे. व सरकारचें मुल्कीखातें सरकारच्याच लष्करी खात्याची सर्व तरतूद लावते. परंतु पूर्वीं अशा मुक्कामांच्या जागा मुकरर नव्हत्या, पूर्वीं पाटलांस देखील निश्चितपणें अमुक एक सरकारची प्रजा आहोंत हें सुद्धां सांगतां येणें शक्य नव्हतें लढायांत बाजार बुणगे पुरविण्या करिता, विशेष प्रसंगीं लढवय्ये देखील पुरविण्याकरितां व स्वारीवर जाणाऱ्या लष्करास सामुग्री पुरविण्याकरितां आणि रस्त्यांत रोग पीडित झालेल्या रुग्ण सैनिकांच्या सुश्रुषेकरितां जितकीं सुलभ सांनिध्यांत गांवें बसतील तितकीं बसविणें सरकारच्या दृष्टीनें आणि त्याच प्रमाणें वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीनें अत्यवश्य होतें.

अशा स्थितींत सरकारास नवीन बसणाऱ्या गांवांची आणि नवीन बसणाऱ्या गांवांस सरकारी सहाय्याची अशा परस्पर अपेक्षा होत्या. गांव वसवल्यावर गांवें शहरांस आणि शहरें गांवास जें परस्पर सहाय्य देत असतात, तें पूर्वीं परस्परांस फार कमी मिळत असे. दळण वळणाचे मार्ग कमी, रस्ते बिकट व शहरें दूर दूर अशा स्थितींत प्रत्येक खेड्यास हरेक कामा करितां आपल्या स्वतःवरच अवलंबून राहावें लागत असे. उदाहरणार्थ, एक नायगांव नांवचें खेडें घ्या. त्यांत हिंमतराव पाटील आहे असें समजा. तेथें त्यानें २९ शेतकरी जमविले आहेत असे समजूं या. २९ शेतकऱ्यांजवळ त्यांच्या पुंजीच्या मानानें २९० मजूर आहेत असें आपण धरून चालूं ह्मणजे गांवाची वस्ती २७६ पुरुष व तितक्याच बाया अशी ५९२ झाली. व या ५९२ वस्तींतून गांवाची पुढील वाढ होऊन सुमारें १००० लोकांचें खेडेगांव झालें त्यांत एक विठनराव नांवाचे शेतकरी आहेत असे समजूं. आणि त्या विठनरावांच्या उंसाच्या शेतांतील विहिरीची मोट आयते वेळीं फाटली असें आपण समजूं. विठनरावास उंसास पाणी देण्याच्या ऐनवेळीं अशी दैवीक आपत्ती पडली तर त्यांस शेतीचें काम सोडून दुसऱ्या गांवीं जेथें महार व चांभार असतील अशा ठिकाणीं जाऊन नवी मोट आणावी लागेल. तेव्हां त्यांचे उंसास पाणी देणेंचें काम चालू होईल. जी गोष्ट महार आणि चांभार यांच्या संबंधानें झाली, तीच गोष्ट गांवांतील दुसरे कार उर्फ बलुते यांच्या संबंधानें आहे. कोणत्याही खेड्यास तेव्हांच स्वावलंबी अथवा सुसंपन्न ह्मणतां येईल, जेव्हां त्यांत लोहार, सुतार, न्हावी, महार, मांग, चांभार, ग्रामजोशी, टाकणकार, नाथ, फकीर, गुरव, भाट, कासार, धोबी, गोसावी, भंगी, इत्यादि श्रम विभाग करून देणारे व घेणारे लोक असू शकतील. हे कार लोक बसतील आणि गांवांत नुसतेच हिंमतराव आणि विठनराव असतील तर गांवाची उन्नती कधीं ही होऊं शकणार नाहीं जितके गांवाचें शहरावरील अवलंबन कमी होईल, तितकीच गांवाची अधिक अधिक संपन्नावस्था होत जाते.

या प्रमाणें एखादें खेडें पूर्ण संपन्नावस्थेंत आलें कीं त्यांत आपोआप गांवाची शिस्त लावण्या करितां एक पंचायत निर्माण होते. गांव हिंमतरावानें वसविलें आहे. विठनराव आणि त्याच्या दुसऱ्या चोवीस शेतकरी बंधूंनीं गांव स्थापिलें, सर्वांनीं मिळून गांवास जरूर तितके कारे ही आणले आणि या प्रमाणें सर्वांनीं मिळून बहुरथी ग्रामवाहन तयार केलें, तरी पण या ग्रामरथाचा सारथी अर्थात हिंमतरावासच राहाणें भाग आहे. ह्मणूनच वऱ्हाड पटेल पटवारी कायदा अन्वयें स्थानिक सरकारनें जे नियम केले आहेत त्यांतील १७ व्या नियमांत असें स्पष्ट सांगितलें आहे कीं सरकारच्या हितसंबंधांवर लक्ष देऊन पाटलांनीं सामान्यपणें यत्न करीत राहिलें पाहिजे. व गांवाची शेती, गांवाची संपन्नावस्था व क्षेम कल्याण त्यानें वाढविलेंच पाहिजे असा नियम घालून दिलेला आहे.

पाटील ही गोष्ट एकटा करूं शकत नाहीं. तो कितीही शहाणा असला तरी त्याला इतर लोकांचें साह्य घेणें भाग आहे. ह्मणजे स्थूल आणि सूक्ष्म मानानें गांवांत हिंमतरावाच्या अध्यक्षते खालीं एक नामधारी मित्रमंडळ ह्मणा, किंवा पंचायत ह्मणा, किंवा कार्यकारी कमेटी ह्मणा, पण त्यास लहानसे पंचायत कोर्ट असल्याशिवाय ग्रामकारभार चालवितां येणें शक्यच नाहीं. नियम १७ याच धोरणावर केलेला आहे ज्यांनी सेटलमेंट डेपार्टमेंटांत सेटलमेंट आफिसरचें काम केलेलें आहे अशा सरकारी अधिकाऱ्यांस ह्मणजे राजश्री स्लँडन, स्लाय, ब्रॅन्स, हेमिंगवे इत्यादि डिपुटि कमिशनर लोकांस व राजश्री इंदोरकर, लक्ष्मण बापूजी, रावसाहेब सीतारामपंत पंडित वगैरे एतद्देशीय छोटे साहेबांस हें ग्राम पंचायतीचें तत्व पूर्णपणें माहीत आहे.

हा ग्राम पंचायतीचा प्रश्न हल्लीं स्वराज्य मागणीचे वेळीं विशेष महत्व पटकावूं पहात आहे. रा. रसेल साहेबांच्या आकस्मिक मरणा बद्दल उल्लेख करण्याचा व तन्निमित झालेल्या हानीचा निर्देश करण्याचा हाच प्रसंग आहे. पी आणि ओ कंपनीची जी पाहिली आगबोट गेल्या जुलै महिन्यांत या महायुद्धाहुतींत बुडाली तींत रसेल सो हिंदुस्थानांतील जंतुशास्त्र संबंधींचे सर्व कागद आणि माहितीनें परिपूर्ण असे पत्रव्यवहार व तज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन येत होते. रसेल हे फार मेहनती संशोधक आणि उद्यमप्रिय होते. त्यांच्यांत मिशनरी लोकांस मागें टाकावे इतके सहनशीलत्व होतें त्यांच्या निधनानें या प्रांताची जी नुकसानी झाली ती लौकर भरून येणें कठीण आहे. या साहेबांनीं सन १९०३ सालापासून तो सन १९०९ सालापर्यंत सी. पी. गॅझेटिअर साठीं फार परिश्रम करून हरएक जिल्ह्याचे मुख्य ठिकाणीं सभा भरवून पाटील कसे अस्तित्वांत आले, देशपांडे, देशमुख, पांडे, महार, फकीर, काजी, जोशी असे आठ वृत्तीदार व देशमुख पाटील, देशपांडे पांडे आणि महार, हे पूर्वीं कसे वतनदार होते व राहतां राहतां पाटील पांडे आणि महार इतकेच तीन वतनदार कसे राहिले, वतनदार, व वृत्तीदार यांच्यांत काय फरक झाला वगैरे सर्व माहिती फार बारकाईनें आणि मेहनतीनें जमा केलेली होती. ही बहुतेक प्रसिद्ध तर झालेलीच आहे, तरी बरीच त्यांच्याच बरोबर गेली. पण या वेळीं आह्मास बरेंच धैर्य प्राप्त झालेले आहे तें सामान्य धैर्य नाहीं. रसेल्स साहेब असते तर जी कामगिरी त्यांच्यावर सोंपाविली गेली असती तीच कामगिरि निदान त्यांच्याच इतक्या मेहनती, दूरदर्शी व धोरणी व विचारी अशा आमच्या राजमान्य राजश्री काशीनाथ श्रीराम जठार साहेब बहादुराकडे गेली आहे.

या पचायतीं पासून काय फायदा आहे व त्यापासून कोणतें नुकसान होण्याचा संभव आहे इतकें थोडक्यांत सांगावयाचें बाकी राहिलें आहे तें पुढील अंकीं सांगण्यांत येईल.

अपूर्ण

---

## शिक्षण प्रसार.

(नव्या विद्या पद्धीचा दुंदुभी.)

गेल्या डिसेंबरांत जी इंडियन विद्याखात्यांची परिषद भरली होती, तिच्यामध्यें आमचे डायरेक्टर राजश्री मेह्यू यांनीं मोठ्या निस्पृहतेनें कळविलें होतें कीं सध्याचे फीचे दर हेच पुष्कळसे वाढले आहेत आणि त्या दरांमध्यें आतां नवीन भर घातल्यास लोकांच्या शक्ती बाहेर फीचे दर जातील. फीचे दर वाढवितां येत नाहींत आणि विद्या प्रसारासाठीं तर चोहों बाजूनें एकसारखा कल्ला चालू आहे. सध्याची निरक्षर प्रजा यापुढें अज्ञान स्थितींत राहूं शकत नाहीं. जीवनकलह असा तीव्र आहे कीं कांहीं थोडी बहुत विद्या केल्याशिवाय माणसाची दुनियेदारी नीटपणें चालणार नाहीं. कैलासवासी गोखले यांना ही उणीव इतकी कळून चुकली होती कीं प्राथमिक शिक्षण मोफत व आवश्यक झाल्याशिवाय इंडियन प्रजेची त्यांना धडगत दिसत नव्हती. किंबहुना निरक्षरतेमुळें अधिकाधिक मृतःप्राय होत चाललेलें हिंदीराष्ट्र सजीव आणि जिवंत ठेवण्याचा प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हाच एक संजीवनी उपाय आहे असें सांगतां सांगतां त्यांचा देहपातही झाला. पण आतां ही गोष्ट निरनिराळ्या स्थानिक सरकारास ही कबूल झालेली आहे. एकंदर इंडियन कारभाराच्या पद्धतीमुळें स्थानिक सरकारचे हात मात्र पैशाच्या बाबतींत अगदीं तंग व आखडलेले आहेत. आणि या फंडाच्या तुटवड्याला लढाईच्या खर्चामुळें ही अत्यंत पराकाष्ठेची स्थिती येऊन पोंचली आहे. गेल्या डिस्ट्रिक्ट जिल्हा बोर्डाच्या वार्षिक रिपोर्टावर चर्चा करतांना विद्यादानाकडे बोर्डाच्या उत्पन्नांतून शेंकडा ३२ या प्रमाणापर्यंत खर्चाचे आंकडे वाढले आहेत. ३९३००० रुपये विद्यादानाकडे व १८८०० रुपये इमारतीकडे १९१५-१६ सालीं वऱ्हाडच्या जिल्हा बोर्डांनीं खर्चीं घातले आहेत. आधल्या वर्षापेक्षां हे खर्च जास्ती आहेत; तथापि प्रस्तुतची विद्यामृताची तहान अशा शुष्क फंडानें भागणारी नाहीं. ह्मणून सर बेंजामिन राबर्टसन यांनीं नवीन विद्यापद्धीं वसविण्याचा संकेत केलेला आहे. या बाबतींत जिल्हा बोर्डाची ही सरकारशीं

नवीन कर बसविण्यासंबंधानें मागणी अगोदरच गेली आहे हिंदुस्थान सरकारकडून नवी विद्यापट्टी बसविण्या संबंधानें मंजुरात मागविण्यांत आली आहे. ही नवी विद्यापट्टी दोन तऱ्हेनें बसविण्यांत येईल. जमीन महसुलावरील प्रस्तुतची शाळापट्टी वाढविण्यांत येईल. आणि शेती शिवाय इतर उत्पन्नांच्या बाबींवर विद्यापट्टीची आकारणी नवीनच करण्यांत येईल. पुष्कळसे कर नवे जुने होत आहेत, तेव्हां कोणत्याही रितीनें होईना, आमचे स्थानिक सरकार प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यासंबंधानें ही जी नवीन युक्ती लढवीत आहेत तिच्याबद्दल आह्मी त्यांचें अभिनंदनच करितों. आणि आह्माला उमेद आहे कीं एकंदर इंडियाच्या उत्पन्नापैकीं जो अल्पांश विद्यादानाकडे खर्चण्यांत येत आहे, तो वाढविण्याला सरकारच्या विद्यमान राज्यकारभाराच्या पद्धतींत पुष्कळसें चालन केलें पाहिजे. आणि ही क्रांती घडउन येई पर्यंत ह्मणजे खरा स्थानिक स्वराज्याचा आरंभ होईपर्यंत आह्मी ही विद्यापट्टी देण्यालाही आनंदानें तयार राहूं. ही नवी विद्यापट्टी ह्मणजे प्रस्तुतच्या लढाईच्या वर्गण्यापेक्षां कितीतरी पुण्य कार्याची व निरुपद्रवी वाटण्यासारखी आहे.

---

## अबकारी हंगाम.

### ( वेडपीरांची गुलामगिरी. )

हा महिना आमच्या प्रांतांत अबकारी हरासांचा आहे. इतर सुधारलेलीं राष्ट्रें मद्यपेयांचें जितकें संकोचन होईल तितकें करीत चालले आहेत. आणि इतर राष्ट्रांची सुधारणा पहातां हिंदुस्थानची अबकारी पद्धती फार कमी दर्जाची ठरेल. या बाबतींत अबकारी खातें ह्मणजे एक सोन्याची खाण सरकारला सांपडल्या सारखी झाली आहे. लोकांचें पान स्वातंत्र्य जितकें सुरक्षित आहे, तितकें त्यांना विद्यास्वातंत्र्य ही नाहीं किंवा मनुष्य गुणाला सद्गुणांच्या पंक्तींत नेणारें स्वातंत्र्य जितक्या तऱ्हांनीं परिस्फुट असावयाला पाहिजे, तितकें कोणत्याच बाबतींत दिसत नाहीं. या पानस्वातंत्र्यामुळें अबकारी हरासांना जसा कांहीं ऊत येत असतो. लोकांच्या वर्तनांतील जों व्यसनाची नाजूक स्थळें तिच्यावर हा एका प्रकारचा व्यापार चालला असून सरकारी तिजोऱ्या सालोसाल भरत चालल्या आहेत. आणि ह्मणूनच सालोसालचे हरासांचे आंकडे अभिवृद्धी दोन्ही तऱ्हांनीं दाखवितात. सरकारी गंगाजळी ओतप्रोत भरते व लोकही आपल्या व्यसनाच्या राक्षसी हावेसाठीं वाटेल तसा पैसा खर्चण्यास तयार आहेत. लोकांना व्यसनापासून विन्मुख करण्याची सरकारची पद्धती अगदीं चुकलेली आहे. व्यसनी मनुष्य आपल्या व्यसनाची किंमत वाटेल ती देण्यापर्यंत किंबहुना आपली पार्वती विकण्याला ही तो कधीं ही मागें सरत नाहीं. व्यसनांचें वेड असें दुष्कर असतें. तेव्हां हीं वेडें घालविण्यासाठीं पैशाच्या बाजूनें तंग करण्याची पद्धती अगदीं चुकीची आहे जगभर मद्यादि द्रव्यांचा निषेध करण्याचा प्रयत्न चालू आहे; पण या प्रयत्नांच्या बरोबरीनें इंडिया सरकारचा प्रयत्न नाहीं. व त्याचा परिणाम लोक अधिक अधिक दारुबाज व व्यसनी होत चालले असून ते आपआपल्या कुटुंबासह भिक्षांदेहीला लागून लौकर लौकर मृत्युमुखीं पडत असतात असा आमचा अनुभव आहे. हें अबकारी पद्धतीचें चक्रच एकदम हलवलें पाहिजे आणि असें होतांना जर प्रस्तुतचा जमीन महसूल हल्लीं पेक्षां दुप्पट द्यावा लागला तरी देखील प्रजेचें कल्याण होईल असा आमचा पक्का ग्रह आहे. भूकंप जशी सृष्टीची रचना अगदीं उलथी पालथी करितात, किंवा राष्ट्रें जशीं युद्धामध्यें नवीं जुनीं होत चाललीं आहेत, तशीच एखादी मोठी क्रांति अबकारी पद्धतींत झाली पाहिजे. १९०८ सालच्या पिकेटिंगला जर सरकारची मंजुरात मिळेल तर लोकांना व्यसनापासून दूर करण्याला जो धैर्याचा व लोकमताचा पाठिंबा पाहिजे, तो आपोआप पोचविण्यांत येईल. ब्रिटिश चॅन्सेलर यांस जर्मनीशीं व आस्ट्रियाशीं लढणें जितकें दुर्घट वाटतें, तितकीच ही मद्यपानाची लढाई दुर्घट आहे. खुद्द आमच्या चक्रवर्ती बादशहांनीं आपल्या राजवाड्यांत मद्याचा शिरकाव न होण्याविषयीं जसा निग्रहाचा प्रतिबंध केला आहे तसें प्रतिबंध आमच्या इंडिया सरकारनें प्रचलित केले पाहिजेत. प्रतिबंध असा पाहिजे कीं मद्यपीच्या घरांत दारु जाऊं शकणार नाहीं. आणि कदाचित् व्यसनमग्नांच्या जीविताच्या दृष्टीनें तिचा गृहप्रवेश व्हावयाला पाहिजेच असेल, तर तो अगदीं निरुंद, संकुचित व अडचणीच्या द्वारानेंच होऊं दिला पाहिजे.

## सन्मान

विद्येची पूजा जेव्हां राजा करतो तेव्हां मनाला होणारा आनंद विशेष आल्हादकारक असतो. नव्या सन्मानांच्या पुरवणी यादींत आपल्या शास्त्रीय शोधांनीं सर्व जगाला आश्चर्यचकित करणारे प्रोफेसर जगदीशचंद्र बोस यांस मिळालेला सर हा किताब विशेष अलंकृत दिसतो. त्याचप्रमाणें अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर डॉक्टर सुंदरलाल यांचा ही सर या थोर पदवीनें होणारा बहुमान पाहून कोणा गुणग्राहकाचें चित्त प्रसन्न होणार नाहीं बरें! इंग्रजी विद्यापूजा केवळ शाब्दिक असते ती यथास्थल रत्नपूर्ण होईल अशी योजना लढाईनंतर हिंदुस्थानांतल्या लोकांसंबंधानें तरी व्हावी असें आह्मी सुचवितो. कांकीं इकडे श्री व सरस्वती यांची फाटाफूट फार दूरवर अंतरावर पसरली असून ते दुरीकरणाचे प्रांत देखील अत्यंत उच्च व नीच आहेत

---

## महायुद्ध

महायुद्धाचीं साप्ताहिक सरकारी वृत्तें वाचतां वाचतां डोळे थकले व समग्र वृत्तें लिहितां लिहितां लेखणीही विसावा घेत आहे. तिकडील युद्धाच्या बातम्याच विशेष शिळपट आहेत; पण जर्मनीचे अतिक्रम अमेरिकेला न खपल्यामुळें हा युद्धाग्नि मोठा भडकेल असा रंग दिसतो. लढाऊ जहाजें शत्रु बुडवितो व बुडवून घेत आहे. आणि त्याचें प्रखर रूप सामुद्रिक दळणवळणासंबंधानें दिसून येतें. आमच्या स्थानिक सरकारच्या लोकसमुहासंबंधानें लढाईच्या बाबतींतल्या कल्पना मात्र अगदीं चुकीच्या आहेत. गेल्या राज्यकारभाराच्या रिपोर्टांत स्थानिक सरकारचे कांहीं उल्लेख इतके बहारीचे आहेत कीं त्या बद्दल हसूं येते. प्रांतिक कारभार अत्यंत सुरळीत चालला आहे हें सांगण्याच्या भरांत प्रजासमूह व महायुद्ध यांच्यामध्यें जाणीवेची बीज बिलकुल खेळत नाहीं असेंही ह्मटलें आहे. लढाईमुळें सर्व व्यवहारांतल्या वस्तु महाग झाल्या आहेत हें अगदीं लहान खेड्यांतील महाराच्या मुलाला देखील समजतें. लोक लढाईच्या वर्गण्या देत आहेत, शालागृहांतून विद्यार्थी भावी जयाच्या गोष्टी बोलत आहेत. सैन्य भरतीसाठीं गांवोगांव विचारणा होत असतात इ. इ. गोष्टी जनसमूह अंध, बाधिर व निष्काळजी आहे असें आह्मास तरी निदान वाटत नाहीं. टाइम्सकारांनीं सुचविल्याप्रमाणें ही निद्रावस्था खरोखर असल्यास राष्ट्रीय जागृती आणण्यासाठीं स्थानिक सरकारानें आणखी निरनिराळ्या उपायांचा स्वीकार फार जरुरी केला पाहिजे.

## व्हालंटीयर पलटणी

ब्रिटिश प्रजेच्या हक्काला शोभणाऱ्या सर्व हक्कासह इंडियन व्हालंटियर करण्यांत येतील तर लार्ड चेम्सफर्ड यांच्या तद्विषयक संभाषणाला यशःश्री लवकर माळ घालील. पुष्कळ तरुण गृहस्थ आपल्या बुद्धीमत्तेच्या कामाला जोडगोळी ह्मणून लढाईचे साहसाचे उद्योग स्वीकारण्याला एका पायावर उभे आहेत. आणि आमच्या सरकारची परवानगी असेल तर हीं नांवें आह्मी गोळा करून तीं बहुजन समाजाला उदाहरणें ह्मणून प्रसिद्ध करण्याला ही तयार आहों.

## रिस्ले सार्कलर

विद्यार्थ्यांना राजकीय सभांना जाऊं न देण्या संबंधाचें जुनें सार्क्युलर पुन्हा जोरानें अंमलांत आणण्याच विचार आमच्या प्रांतिक सरकारचे चालू आहेत या प्रयत्नांत सरकारला यश येईल असें आह्मास वाटत नाहीं. आणि तरुण पिढीला नम्र व विनीत करण्याचे प्रयत्न मूलच्छेदी व पांडित्यप्रकर्षाचे होतील. अलीकडच्या ८-१० वर्षांच्या अनुभवानें सर्व लोकमत रिस्ले सार्कलरा विरुद्ध आहे. आणि फीजी बेटें व इतर कॉलनीमधील हिंदी मजुरदारांची गुलामगिरी ब्रिटिश साम्राज्यांतून घालविण्यासंबंधानें जेथें प्रयत्न चालू आहेत, तेथें विद्यार्थ्यांच्या कोमल व रहस्यग्राही निस्पृह मनावर ही रिस्ले सार्कलरची गुलामगिरी न येऊं देण्यासाठीं आमचे समाजाग्रणी स्थानिक सरकारला चैन पडूं देणार नाहींत असा आह्मास पूर्ण भरंवसा आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**--आजपासून वसंतऋतु लागला असून हिंवाळा अगदीं संपला. या गुलाबी थंडीच्या दिवसांत आरोग्य फुलाप्रमाणें चांगलें बहारीला यायला लागते. ह्मणून त्या आशेनें प्लेगाच्या रोगाला धिःकारून लोक सर्वत्र बाहेर जंगलभर इतके पसरले आहेत कीं वनदेवता सुहास्यानें त्यांचें स्वागत करण्यांत रममाण आहेत.

**प्लेग**— ३ फेब्रुवारी अखेरच्या सप्तकांत प्लेगाची वृद्धीच दिसत आहे. मध्यप्रांत आणि वऱ्हाड मिळून २०१३ लोक प्लेगानें लागले व १४८७ मरण पावले त्यांपैकीं वऱ्हाडसंबंधाचे आंकडे असेः---

**यवतमाळ जिल्हा**

| | प्लेगाने मृत्यू |
|---|---|
| यवतमाळ | |
| पुसद | |
| वणी | |
| दारव्हा | |
| उमरखेड व इतर खेडीं मिळून | ७७ |

**उमरावती जिल्हा**

| | |
|---|---|
| उमरावती | |
| एलिचपूर व इतर खेडीं मिळून | १२९ |

**आकोला जिल्हा**

| | |
|---|---|
| आकोला | |
| आकोट | |
| मंगरूळपीर व इतर खेडीं | २०१ |

**बुलढाणा जिल्हा**

| | |
|---|---|
| बुलढाणा | |
| खामगांव | |
| चिखली | |
| मलकापूर | |
| शेगांव | |
| नांदूरा व इतर गांवें | ३१८ |

आकोल्यास १९ आक्टोबर पासून काल पर्यंत १९४ लोक लागले व १०९ मरण पावले. गेल्या बुधवारपर्यंत हे दररोजचे आंकडे एकेरी होते, पण त्यानंतरच्या ३ दिवसांचे आंकडे असेः---

| लागले | मेले |
|---|---|
| २३ | १४ |
| १३ | ६ |
| १४ | १२ |

**निवडणुकीः**— येथील म्युनिसिपल सभासदाच्या निवडणुकी आज, बुधवारीं व गुरुवारीं मिळून होणार आहेत. सार्वजनिक कार्याला वाहून घेणाऱ्या मंडळींची मतें गोळा करतां करतां मोठी त्रेधा उडाली आहे. म्युनिसिपल कार्य इतकें सोपें आहे कीं युरोपांतल्या बायकांचें उदाहरण पाहतांना आमच्या नगरच्या प्रमुख स्त्रियांना हें काम अधिक उत्तम करतां येण्या सारखें अहे. तेव्हां पुरुषांनीं आपली बहादरीचीं कार्यें इतरत्र केल्यास बुद्धीचा व्यय अधिक बरा होईल.

**धन्यवादः**--- रा. रा. हारीसिंग हजारी सावकार मुर्तिजापूर यांनीं एक सराई व गुरांची पाणपोई हीं बांधण्या प्रित्यर्थ २०२७ रुपये खर्च केला ह्मणून त्यांच्याकडे सरकारी धन्यवादाचा खलिताही धाडण्यांत आला आहे, या पुण्य कार्या पेक्षांही थोरलें पुण्य कार्य तेथील लक्षाधीश रा. रा. वामनराव नारायणराव जमादार यांनीं मनावर घेऊन त्या निमित्त सुमारें एक लक्ष रुपये नामदार रावबहादुर मुधोळकर यांच्या हवाली करण्याचे त्यांनीं योजिलें आहे. याचा विनियोग रुग्णालयाकडे होणार आहे.

नागपूरच्या 'महाराष्ट्र' कर्त्यांकडून मागें २ हजाराचा जामीन घेण्यांत आला आहे. त्यावेळीं आक्षेपा दाखल ह्मणून कालनींतल्या वसाहतवाल्यांच्या स्थिती बद्दलचे लेख पुढें केले होते. आतां त्या लेखांची सत्यता कोठ्यावधि पटीनें निश्चित झाली आहे तेव्हां तो जामीनीचा हुकूम रद्द करण्याचा हा सुयोग आमचें सरकार घालविणार नाहींत अशी आह्मी उमेद बाळगतों. महाराष्ट्र'च्या संपादकांनीं आपल्या सुंदर लेखांनीं केलेली कामगिरी ही लक्ष्यांत घेण्यांत सारखी आहे.

---

## नोटीस

गणमलजी वा इब्राहमजी कुणबी पाटील राहणार मौजे खानापूर ता० मुर्तिजापूर यांसः—

खालीं सही करणार इच्याकडून अशी नोटीस देण्यांत येते कीं माझे शेत मौजे खानापूर ता० मुर्तिजापूर येथील सर्वे नं. ६९ चे तुम्ही माझे पासून ता० ११-१२-१६ रोजीं ८०० रुपयांस खरेदी करून घेतले. परंतु साठीम रुपयाचा भरणा मला दिला नाहीं. मी अडाणी असल्यामुळें माझी कांहीं तरी समजूत घालून माझे पासून खरेदीखत पुरे करून घेतलें. तुम्ही गावचे पाटील असून माझ्या सारख्या निराश्रित अडाणी स्त्रीस फसविणें तुम्हास योग्य नव्हते. आठशे रुपयांपैकीं तुम्ही मला साडेचारशे रुपये फक्त दिले आहेत. बाकी साडेतीनशे रुपये मला तुमचे कडून घेणे राहीले आहेत ते तुम्हास मागीतले असतां दिले नाहींत. या करितां ही नोटीस मला देणें भाग पडले. तरी ती पावल्यापासून आठ दिवसाच्या आत वरील रकम तुम्ही मला देऊन पावती घ्यावी. तसे न केल्यास योग्य कोर्टात फिर्याद करणें मला भाग पडेल. कळावें. तारीख १३-२-१७ इसवी

सही

तुळसाबाई मर्द मादराजी कडु कुणबी रा खानापूर ता. मूर्तिजापूर जि. आकोला नि. आंगठा

नो नं. ७९

## नोटीस

झापराबाई मर्द गणाजी शिंदे कुणबी राहणार टाकळी तालुका मुर्तिजापूर जिल्हा आकोला

हीसः—

खालीं सही करणार इच्याकडून अशी नोटीस देण्यांत येते कीं तूं माझे सवतीची कन्या असून माझे नवऱ्याचे मालकीचे शेत आणि घर होते ते तुं माझेशी कपट करून तूं माझेपासून बक्षीसपत्र करून घेतलें आणि ती इस्टेट तूं तुझे ताब्यांत घेतली. बक्षीसपत्र करून देण्याचे पूर्वी तूं मला कबूल केलें होते कीं तूं जिवंत असे पावेतो घरांत राहावे व शेतांतील पीक खात जावें. तूं जिवंत असे पर्यंत घराचा आणि शेताचा उपभोग मी घेणार नाहीं अशी कबुली दिल्यावरून मी तुला बक्षीसपत्र करून दिले. तें करून दिल्यानंतर लवकरच तुझे नियतींत फरक पडून तूं घर आणि शेत तुझे ताब्यांत जबरदस्तीनें घेतलें. करार केल्याप्रमाणें मला राहण्यास घर ठेविले नाहीं व निर्वाहास शेत ठेविलें नाहीं व त्याचे स्वामित्वही कांहीं दिलें नाहीं. या करितां ही नोटीस देणें मला भाग पडलें. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझे राहण्याचा आणि खाण्याचा बंदोबस्त करून द्यावा. तसें न केल्यास योग्य कोर्टात फिर्याद करून त्या बद्दल दाद मागणें मला भाग पडेल कळावें तारीख १३-२-१७ इ.

सही

तुळसाबाई मर्द मादराजी कडु कुणबी रा० खानापूर ता० मुर्तिजापूर जि० आकोला नि० खुद आंगठा अंगे

नो० नं० ८०

## नोटीस

वि सीनीयर सब जज साहेब आकोला. कि. मु. नं. १९ सन १६ नेमली ता. ३-३-१९१७

अर्जदार

राधाबाई मर्द जगन्नाथ परदेशी राहणार ताजना पेठ आकोला

सर्वस लोकांस या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं:—

अर्जदार इनें मयत जगन्नाथप्रसाद परदेशी याचे जुराखत नंदी याजकडील कर्ज वसूल करण्याकरितां वि. स्मालकाज कोर्ट आकोला यांचे कोर्टांत दावा आणिला आहे. तरी तो हुकुमनामा मिळविण्याकरितां अर्जदार ही मयत जगन्नाथप्रसाद याची योग्य वारस आहे म्हणून सकसेशन सरटिफीकेट मिळण्याबद्दल वरील नंबरचा अर्ज या कोर्टात दाखल केला असून त्याचे चौकशीची तारीख ३-३-१७ नेमली आहे. तरी ज्यांची सदर्हू विरुद्ध काहीं तक्रार असेल त्यांनीं तारीख ३-३-१९१७ रोजीं आपल्या पुराव्या निशीं, ह्या कोर्टात सकाळचे १० वाजतां हजर राहावे. पुराव्यानिशी तारखेवर हजर न राहील्यास त्याची तक्रार फिरून कोर्ट ऐकणार नाहीं व अर्जदार इजला सर्टिफिकिट दिलें जाईल कळावें. तारीख १०-२-१७

सही

N. G. Subhedar

ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज आकोला

N, N.81

## नोटीस

नोटिस वेणी नारायण सदाशिव कुळकर्णी राहणार मौजे निंबी तर्फे हैसपूर प्रगणें व ता. आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून असे कळविण्यांत येते कीं तूं वऱ्हाडसमाचार पत्रांतून ता. २९-१-१७ इसवीची मला नोटिस दिली ती मी पाहिली. त्यांत सर्व करणें दिलीं ती चुकीची असून त्यांत एकही कारण खरेपणाचें दिसत नाहीं. तुम्ही खरोखर वाईट चालीचे आहांत या बद्दल तूं माझे मिळकतीचा मालक नसून याजवर कोणतेच प्रकारचा तुझा हकसंबंध नाहीं. मी तुमच्या पूर्वींच नोटिशींत घरांतून बाहेर जावें. व कर्ज देण्याची सोय करावी असें लिहिले तसें न करतां खोटी नोटिस कारणास्तव दिली ही अगदीं चुकीची आहे व तूं म्हणतोस कीं कर्ज तुमचे संमतीनें मी काढले. व पट्टा ही संमतीनें करून दिला हे म्हणणें तुझे खोटें आहे, आणी तूं बरेच दिवसांपासून माझे पासून विभक्त असून परस्पर घेऊन राहिला आहेस. एकत्रांत मुळींच नाहींस. व लोकाचें कर्ज तूं केल्यावरून तुला लोकांचे संमत असल्याचें दिसते कारण तुझे कर्ज कोणत्याही प्रकारानें वसूल झाले पाहिजे असे लोकांचें व तुझें मत आहे.

तुम्ही तुमच्या पट्टेदारांस ताकीद द्यावी आणि या उपर ते शेतींत येतील तर त्यांच्यावर व तुमच्यावर फौजदारी काम चालविण्यांत येईल. या जाहिरलेखानें तुमच्या सावकार लोकांसही समज पुनः देत आहे. त्यांनीं आपला गोंधळ तुमच्या बरोबर घालावा. पण त्याची जोखीम कोणत्याही प्रकारें माझ्या जवळच्या स्थावर जंगम जिनगीवर नाहीं. कळावें. ता ८ फेब्रुवारी १९१७

सही

१ सदाशीव रामचंद्र कुळकर्णी दस्तुर खुद

नो० नं० ८२

## नोटीस

रा० रा. मुलाई मर्द गोविंदा वंजारी आणि गोविंदा वलद लक्ष्मण वंजारी उभयता राहाणार बारसीटाकळी ता. आकोला जि. आकोला.

यांसः—

खालीं सही करणार यांचे कडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुम्ही वतनदार प्रेसमधून ता. १४-१-१७ रोजीं नोटीस दिली असें मजला समजलें. ती नोटिस मजला अद्याप पावेतो मिळाली नाहीं परंतु मी ती नोटीस पाहाण्यासाठीं पैदा केली आणि वाचून पाहिली तिचा जबाब खालीं येणे प्रमाणें मी देतों:—

१ बारसी टाकळी येथील स. नं. २०७ यातील एकद्वीतीयांश हिस्सा नीमे तुमचे मालकीचा आम्ही रुपये १३०० ला तुमच्या व मुलाईच्या अशा सर्व गहाणासुद्धा खरेदीचा घेणाराचा ठराव करून त्याचा बयाना रुपये २०० तुम्हांस देऊन तुमचे पासून भुलीचे एकटीचे नांवची करून घेतली ती ता. २२-११-१९१६ ची माझे जवळ आहे. खरेदीचे ठरावा पैकीं राहिलेले रुपये ११०० नोंदणार अंमलदारा समक्ष खरेदी नोंदण्याचे वेळीं देण्याचे ठरलें आहे. नोंदणारे अंमलदारास घरीं घेउन येण्याचे कांहींच प्रयोजन नाहीं व मी तसा करारही केला नव्हता इसाराचे पावती लिहिण्याचे वेळीं तुमचा आमचा करार तोंडी असा झाला कीं या शेता संबंधी मी नागपुर हायकोर्टात अपिल तुमचे पैकीं मुलाईचे विरुध्द मी केले असून त्याची ता. २९-१-१७ होती. या अपिलाचा निकाल झाल्यावर खरेदीखत करून देउं याप्रमाणें तुम्ही करार केला. या ठरावा प्रमाणें त्या अपिलांत तुम्ही आपसांत निकाल झाला असे कोर्टा समोर सांगीतले आहे व त्याचा निकाल तारीख ३१-१-१९१७ रोजीं झाला आहे यासाठीं आतां तुम्हास कळविते कीं ही नोटीस आपणास ज्या तारखेस मिळेल त्याचे दुसरे तिसरे दिवशीं तुम्ही रजिष्ट्रर कोर्टात हाजर राहावें. मी रुपये ११०० कोर्टांत घेउन हाजर रहातों व खरेदीखत नोंदुन घेतों. याप्रमाणें तुम्ही न केलें तर मी तुमचेवर खरेदीखत नोंदून घेण्याचा व त्याप्रमाणें ताबा माझा खरेदीचा कायम करण्याचा दावा करून या नोटिशीचे खर्चासुद्धां व कोर्ट खर्चासुद्धां हुकुमनामा मिळवीन कळावें. आकोला ता १२-२-१७ इ.

सही

सयद करीम वा सयद इमाम रा. बार्सिटाकळी द. खु.

सयद मालुक वा सयद इमाम रा. बार्सिटाकळी द. खु.

नो. नं ८३

## नोटीस

रा रा. जंगल्या वा बनश्या माहार रा. सेलू दोनद जवळील

यांसः—

खालीं सही करणारीन इजकडून नोटीस देण्यांत येते कीं अंदाज ७॥ वर्षे झाली असतील आपण गंधर्व माझेशीं लावले. त्याच वेळेस फक्त मजला पांच सहा महिने वागविले व मजला कांहीं कारण नसतांना मजला विनाकारण घराबाहेर घातले. व आपण दुसरे बायकोशीं संसार जवळ्ही प्रमाणें करीत आहां. ७ वर्षा पासून माझी अन्न वस्त्राची व खाण्यापिण्याची सोय केली नाहीं. व मजला आपले घरीं नांदविलें नाहीं व मी माझे स्वतःचे जीवाची हानी करून मेहनत मजुरी करून आम वगैरे व सावकाराचे कर्ज काढून ७ वर्षपर्यंत उदरनिर्वाह आजपर्यंत केला व आतां महागाईमुळें उपासमार होण्याची वेळ आली आहे. व तुमचे लग्नाचे बायकोशीं आणि माझ्याशी बनत नसता तुमचे जवळ माझा संसार होण्याची आशाच राहिली नाहीं व तुम्ही माझे खाण्यापिण्याची सोय करीत नाहीं व मजवरील आपण नवरेपणाचा हक्कही सोडीत नाहीं. तेव्हां तुम्हांस माझी विनंती म्हणून हीच आहे कीं, माझे सर्व आयुष्याचे मातेरे तुम्ही करूं नये. जोंपर्यंत तुम्ही मजवरील नवरेपणाचा हक्क सोडणार नाहीं. तोंपर्यंत तुम्ही मजला अन्नवस्त्र म्हणून दरमहा रुपये ५ प्रमाणें बीनबोभाट मिळण्याची तजवीज करून शिवाय आजपर्यंतची मजला झालेली कर्जदारी रुपये ४०० चारशे देऊन टाकावे या कृत्यास तुम्हास ही नोटीस पावले दिवसा पासून आठ दिवसाची मुदत दिली आहे. सदर्हू मुदतींत तुमचे कडून वर लिहिल्याप्रमाणें वर्तन न घडून आल्यास हीच नोटीस तुमची मजला फारकत आहे असें मी समजून पुढें मी पाहिजे त्याच्याशी दुसरा घरठाव करीन आणी कर्जदारी वगैरेची सोय तुमचे कडून वसूल करून आदाई करीन मग तुमचा मजवर अगर जो माझेशी घरठाव करील त्याचेवर हक्क चालणार नाहीं. कळावे ता० ११-२-१९१७

सही

दुर्गी मर्द जंगल्या हल्लीं मुक्काम खडकी टाकळी नि० आंगठा

द० शंकरराव रामकृष्ण कारकून नि. पिंगळे वकील आकोला

नो. नं. ८४

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा धि एशियन कमार्शियल अशूअरन्स कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहीती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा. वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमार्शियल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज. फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

---

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि असल १८८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ४८ सुर्मा ममीरा ३ तों अंगुरी हींग २१, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ८९ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० ९

सचित्र ) रंगभूमि. ( मासिक

नाट्यकलाविषयाची चर्चा करणारें सचित्र मासिक वा. व. टपाल हंशील सह २८९ आणे आहे. पाहिजे तेव्हां सुरू करितां येते. नमुन्याचे अंकास ८४ आणे यांत जाहिरातीं घेण्याची सोय आहे नाट्यविषयक पुस्तकें व सर्व प्रकारची नाटकें आमचेकडे मिळतात

म्यानेजर— "रंगभूमि" पुणें किंवा
किर्लोस्कर संगीत मंडळी
नो० न० २६

---

## सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ।॥।, १, १।, १॥, २, २॥, ते ५ रु. प. **बुद्धीवळजोड लांकडी**— किंमत ।॥। १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ।॥।, १, १॥, रु प. **खडावा जोड**— शिसवी व शिवणीचे वगैरे सामान टिकाऊ व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

## खात्रीचा तयार केलेला.

### ताजा अनंत मूल

नेत्र १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अल्कोहोलाच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गुण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं ६
नो० नं० ४

---

## अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने.

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु. ३ ४, ५, वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिप्याचें मोतीं लहान मोठें घाटेल तसें. सरीची किं. रु. १॥. २, ३. ४. अंगठी किं रु. १, १॥, सले अटपैलु जोडीची किं. रु. १॥ बांगड्या जोडीची किं. रु. १॥, २ २॥ कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल.

पत्ता:—मगनलाल के. आणि कंपनी
गिरगांव मुंबई.
नो० नं० ५

---

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार त बडतीव दूर होतात किं रु. १८९.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनडी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला ने. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay.

## हात मागाचा मोठा कारखाना.

### अगदीं पक्क रंगाचीं लुगडीं पाहिजे असल्यास

# कला-भुवन सोलापूर.

यांच्याकडे मागणी करा.
लछमय्या व्यंकटनरसू इरावती,
मालक,
नो० नं० १०

---

## हिमालयांतील दिव्य महौषधींचीं औषधें.

**सर्वप्रकारचे नेत्ररोगांवर रामबाण औषध किं. १ रू. पो. ख. शिवाय.**

**रक्त शुद्ध करणारी दिव्य वल्ली किं** १॥ रुपया दि. ७ शिवाय. अभ्रक, मौक्तिक वगैरे उंची माल व्ही पी. नें पाठवूं.

पत्ता— वैद्यराज विठ्ठल शास्त्री परांजपे पुणें २३८ बुधवार चौक
नो. नं. १२

---

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर.

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे **सुबक** दागिने— मंगळसूत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचींफुलें, बिल्वदळी टीका, मुदी **जमफुले** साखी व घागऱ्याची वगैरे सर्व जातीचा माल—तसेंच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकरणी, तारें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ७

---

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस......१ रु०१
बाहेरगांवी ट. हां. ......२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी वरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पापुरें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची भी कनिष्ठ शिल्लक भलेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक Lyon Scott
आकोला ९।१।०९ एजंट
नो. नं १

---

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. भांडाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. २

---

हें पत्र आकोला येथें कैकाडवेस खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला--सोमवार तारीख २६ माहे फेब्रुवारी सन १९१७ ई० [ अंक ९



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये.
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.



## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.



### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्यांची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ } Lyon Scott एजंट

नो नं १

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबदल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. २

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा धि एशियन कमार्शियल अशूअरन्स कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने व माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांतांचे फिरते एजंट रा. रा. वि. रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.

गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज
धी एशियन कमार्शियल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग.
फोर्ट, मुंबई.
नो. नं. ८

## काश्मीरी केशर.

पवित्र आणि अस्सल १४८ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ४८ सुर्मा ममीरा ३ तो अंगुरी हींग २।, सुगंधित जीरा १ कागजी बादाम ४२ पौंड, बादाम मुरब्बा २ पौं. टिन १
काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० ९

सचित्र ) रंगभूमि. ( मासिक.

नाटकाविषयाची चर्चा करणारें सचित्र मासिक वा. व. टपाल हंशील सह २४९ आणे आहे. पाहिजे तेव्हां सुरु करितां येते. नमुन्याचे अंकास ४४ आणे. यांत जाहिराती घेण्याची सोय आहे. नाट्यविषयक पुस्तकें व सर्व प्रकारचीं नाटकें आमचेकडे मिळतात.

म्यानेजर— "रंगभूमि" पुणें किंवा
किर्लोस्कर संगीत मंडळी.
नो० नं० २६

### सावंतवाडी येथील.

**दशावतारी गंजिफा**—उत्तम पानें व टिकाऊ पक्का रंग किंमत ॥।, १, १।, १॥, २, २॥, ते ५ रु. प. **बुद्धीबळजोड लांकडी**— किंमत ॥। १, १॥, २ ते ४ रु. प. **सोंगट्या जोड**— किंमत ।, ॥, ॥।, १, १॥, रु. प. **खडावा जोड**– शिसवी व शिवणीचे वगैरे सामान घाऊक व किरकोळ आमचेकडे विकत मिळेल. मोठा क्या. मा. फुकट

डी. आर. आळवणी, स्टेट सावंतवाडी
नो. नं. ३

## खात्रीचा तयार केलेला.

**ताजा अनंत मूळ.**

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कूटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता
रामचंद्र सदाशिव मार्कंडे उद्धवजी मोहला नागपूर शहर सर्कल नं. ६
नो० नं० ४

### अमेरिकन सोन्याचे कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३।४ गोठ जोडीची किं. रु. १॥ २, २॥. पाटल्या जोडीची किं. रु. १॥, २, २॥. सरी किं. रु ३ ४, ५, वज्रटीका रेशमांत गुंफलेली किं. रु. ३, ४. ठुशी रेशमांत गुंफलेली किं. रु. ५, ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली किं. रु. ३, ४, ५. शिंप्याचे मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सरीची किं. रु. १॥. २, ३. ४. अंगठी किं. रु. १, १॥, सल्ले अष्टपैलु जोडीची किं. रु. १॥. बांगड्या जोडीची किं. रु. १॥, २ २॥ कोणत्याही प्रकारचा मापाचा दागिना मिळेल

पत्ताः—मगनलाल के. आणि कंपनी
गिरगांव मुंबई.
नो० नं० ५

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारेसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्राफ करून बनविलें आहे. किं. ४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L Batliwala Sons & Co. Ltd.**
N. N. 6 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर.

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदी अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल–तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तार्टें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिन्नसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. जिन्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर
नो नं ७

## पाहिजे.

सेकंड हॅंड ऑइलएंजिन २० ते ३० हार्सपावर पर्यंत तीन अगर दळण्याचें चकक्या सहीत पाहिजे आहे सविस्तर खुलासा खालील पत्त्यावर करावा.

नारायणलाल–रामूलाल अगरवाले
अडत दुकान आकोला वऱ्हाड
नो. नं. १४

## नोटीस

नोटिस देण्यांत येते कीं, इ. स. १८८६ चे वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ४४ पैकीं (१) चे अन्वये ता. ९ माहे आक्टोबर सन १९१६ इा रोजीं मुर्तिजापूर येथील म्युनिसिपाल कमेटींत भरलेल्या स्पेशल सभेमध्यें पास झालेल्या ठरावावरून वरील कायद्याचें कलम ४१ (१) (ए) (बी) चें आधारें मुर्तिजापूर येथील म्युनिसिपाल कमेटीचे हद्दींत चालणाऱ्या व्यापारावर व धंदावर मुर्तिजापूर येथील म्युनिसिपालिटीनें खालीं लिहिलेल्या शर्तीप्रमाणें व दराप्रमाणें कर बसविण्याचें ठरविलें आहे.

ही नोटिस पाहिल्यानें प्रसिद्ध झाल्या तारखेपासून एक महिना झाल्यानंतर या ठरावाचा पुन्हा विचार केला जाईल. तरी या ठरावाविषयीं कोणास कांहीं हरकत घेणें असेल अगर कांहीं सूचना करणें असेल तर वरील मुदत संपण्याचें पूर्वीं म्युनिसिपाल कमेटीचे सेक्रेटरीकडे लेखी कळविलें पाहिजे.

शेतकीचें उत्पन्नाशिवाय ज्याचें उत्पन्न अगर उत्पन्नापैकीं कोणताही भाग शंभर (१००) रुपयापेक्षां कमी नसेल अश्या मुर्तिजापूर येथील म्युनिसिपल कमेटीच्या हद्दींत कोणताही व्यापार अगर धंदा करणाऱ्या प्रत्येक इसमावर त्याच्या अंदाज उत्पन्नापैकीं कर बसविण्या लायक उत्पन्नावर शेकडा १ रुपया प्रमाणें कर बसविण्यांत येईल. कर बसविण्याचे नियम येणें प्रमाणें:—

(१) कोणत्याही मनुष्यावर अगर कंपनीवर बसविलेल्या कराची रकम ५०० रुपयापेक्षां जास्त अगर आठ आण्यापेक्षां कमी असणार नाहीं.

(२) कराचे आकारणी करितां कर बसविण्यास लायक असलेल्या मनुष्याचें पूर्ण उत्पन्नांतून कर बसविण्यास लायक नसलेलें जास्तींतजास्ती उत्पन्न ९९ रुपये वजा करून राहिलेल्या उत्पन्नावर कर बसविण्यांत येईल. पेन्शन, प्राव्हिडेंट फंड या करितां भरल्या जाणाऱ्या रकमा किंवा विमा उतरल्यामुळें दरसाल प्रीमियम भरावे लागणाऱ्या रकमा (जेव्हां ह्या रकमा वार्षिक उत्पन्नाच्या एक षष्ठांशपेक्षां जास्त होत नसतील) पूर्ण वार्षिक उत्पन्नांतून वजा करण्यांत येऊन बाकी राहिलेल्या उत्पन्नावर कर बसविण्यांत येईल.

(३) कराची आकारणी करतांना आठ आण्याचा कोणताही अंश आठ आणेच समजला जाईल.

सही

B. M. Pandit

सेक्रेटरी

म्युनिसिपाल कमेटी

मुर्तिजापूर

नो० नं० ८८

## नोटीस

नोटीस वेशमी गणपत वा आनंदा जात तेली रा. मौजे रेल ता० आकोट जि० आकोला.

खालीं सही करणार इजकडून या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं घडलेली हकीकत मु॥ सिंदखेड ता० व जि० आकोला मी गांवास गेली असतां माझे पश्चात नवरा घर सोडून रेल येथें गेला. या गोष्टीस सरासरी अजमास १० महिने झाले. त्या पूर्वी गेल्या दिवशी घरांतून दागदागीनें बरोबर घेऊन गेला त्यांचे वर्णन खालीं लिहिलेप्रमाणें—

गुंडवाळेचा जोड १ तोळे ६०
दंडवाळेचा जोड १ „ ४२
सोन्याच्या मुरक्या १० मासे
सोन्याच्या बाळ्या १० मसे
नथ वजन मासे १० व
पुतळ्या नग ९ तोळे १।
गोफ चांदीचा तोळे १२

येणेंप्रमाणें दागीने घेऊन गेल्यानंतर कांहीं दिवसाचे बाद घर जिंदगीचा अफरातफरा केला तो असा कीं ता० १२-६-१६ इ. रोजीं शेत बक्षीस आमचे पश्चात वेशुद्धपणी वर लिहिलेल्या प्रमाणें लिहून दिलें हें बरोबर नाहीं. कारण त्यास वारस बायको आहे तर विचार न करतां हें काम कसे केलें ? नवरा मयत झाल्यावर मी दागीने मागण्यास गेली असतां दागीने दिले नाहींं व आम्हास उत्तर दिलें कीं शेत सर्वे नं० १८१ एकर ४-४ गुंठे आकार रुपये ८-१२ चे शेत बक्षीस दिले असे म्हटलें. नंतर मी त्यास उत्तर दिलें कीं माझे दागीने तूं पचावितोस व शेत ही पचावितोस तें बक्षीस रद्द आहे असें त्यास म्हटलें तरी माझे दागीने तूं दिले नाहींस. सदरहू नोटीस पावले पासून आमचे सर्व दागदागीने व कागदपत्र आठ दिवसांचे आंत आणून द्यावे तसे न केल्यास आम्ही तुमचेवर कोर्टमार्फत तजवीज करूं. मग तुमची कोणत्या प्रकारची जबाबदारी ऐकली जाणार नाहीं व या नोटिसीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल. ता. १९-२-१७

सही

मोनी मर्द तुळशानी निशाणी आंगठा

द० गणपत कडताजी नाथ जैन मंदीर आकोला

नो० नं० ८९

## नोटीस

हिंमतराव वलद गोंदराजी देशमुख राहणार अडगांव कसबे ता. आकोट जि० आकोला

पांस:—

नोटीस देणार मुक्ताई मर्द गंगाराम पाटील जात मराठे राहणार गोपाळखेड तालुके आकोला जि० आकोला नोटीस देते ऐसाजे कीं तुम्ही माझे मुखत्यारपत्र दरसाल घेत होतां परंतु तुम्ही माझे कामाची बरीच अफरातफर केली आहे असें कळतें तरी आपण ही नोटीस पावल्यापासून तुमचें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे तरी यापुढें तुम्ही माझे नांवानें कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास अगर कोणीही तुमच्याशीं माझ्य संबंधें केल्यास तो व्यवहार रद्द समजला जाईल. त्याचप्रमाणें तुम्ही कोर्टातली कामे माझे नांवें यपुढें करूं नयेत अशी या नोटिसीवरून तुम्हाला ताकीद देण्यांत आली आहे. तुमचेजवळ दोन दस्तऐवज केरे आहे ते परत करावे. कळावे ता० २२-२-१७ इ.

सही

मुक्ताई मर्द गंगाराम इचा दावे हातचा आंगठा

नो० नं० ९०

वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन शुद्ध ९ शके १८३८

## ग्राम पंचाईत नं. २
### (फायदे)

**१ फायदा—**लोकांस आपला गामगाडा आपणांसच ओढतां येईल. प्रत्येक खेड्याच्या उणीवा व गैरसोई त्या खेड्या पुरत्याच असतात. कित्येक गांवांत पाण्याचें दुर्भिक्ष असतें तर कित्येक गांवांचें आरोग्य समाधानकारक नसतें. कित्येक गांवांची जमीन पावसाळ्यांत इतकी ओली होते कीं गांवांतून बाहेर जाण्यास किंवा बाहेरून गांवांत येण्यास पायानें देखील मार्गच मिळत नाहीं. कित्येक गांवांभोंवतीं नाल्याचें वेष्टण असतें व प्रसंग विशेषीं गांव वाहून जाईल अशी धास्ती पडते. कित्येक गांवांतील लोक मत्सरी व द्वेषी असतात, कित्येक गांवांतील लोक इतके कलहप्रिय असता कीं दुसऱ्याचें नुकसान होईल तर त्या साठीं आपल्या स्वतःचे इस्टेटीवर पाणी सोडण्यास देखील तयार होतात. मूळ पाटील घराण्यातील एका कुटुंबाची अनंत कुटुंबें झालीं असल्यामुळें हरेक खेड्यांत दोन दोन चार चार तट झालेले असतात. बहुतेक खेड्यांत शुष्कवादांत ज्याच द्रव्याचा क्षय आणि उत्साहाचा भंग होत असतो. प्रत्येक गांवांत कोठें शेण चोरलें, तर कोठें रस्ता अडविला, कोठें सावकारानें शर्ती व्याज मागितलें तर कोठें शेतांत ढोरें घातलीं, अशा प्रकारच्या वादावरून एक पक्ष दुसऱ्यापक्षावर दात ओठ खाऊन आपला कोप शांत करून घेण्याच्या खटपटींत असतो. हे सर्व किरकोळ तंटे ग्राम पंचायती होतील तर नाहींसे होऊन लोकांस आपला उद्योग चालविण्याला अधीक फुरसत मिळेल व योद्याच काळांत या ग्रामसंस्था हल्लीं नामशेष होत चालल्या आहेत व त्या मुदलांत सरकारासच नकोत असा जो लोकांचा ग्रह होत चालला आहे तो दूर होईल.

**२ फायदा—**लोकांत स्वावलंबन येऊन आपल्या उणीवा आपण जाणून लोकांस त्या कशा दूर कराव्या याचेंही शिक्षण मिळेल.

**३ फायदा—**लोकांस सार्वजनिक कामें कशीं करावीं, किंवा कोणाकडून करवून घ्यावीं हें आपोआप कळूं लागेल. म्हणजे आत्मशिक्षण, आत्मसंयमन, आत्मनिरीक्षण इत्यादि गुणांचा त्यांच्यांत उदय होईल.

## नुकसानें

(१) पहिलें नुकसान—हल्लींच्या ग्रामपंचायतींत विशेष कामें म्हणजे सामाजिक धर्मशाळा, पाण्याचा पुरवठा, येडे येडे किरकोळ स्वरूपाचे वाद उदाहरणार्थ "माझी मजुरी बुडविली" अशी मजुराची तकरार" माझें ढोर पडीतांत असून विनाकारण कोंडवाड्यांत घातलें" अशा तकरारी, तशाच माझें शेण उचलून नेलें अशा किरकोळ तकरारी या पंचायतीपुढें येत असत. या सार्वजनिक व सामाजिक प्रश्नां शिवाय गांवांस उपयुक्त अशीं सार्वजनिक कामें याच पंचायतीस करावी लागत. उदाहरणार्थ शाळा मास्तरांस मुलें जमविण्यांत मदत, कळांत मदत, शेतकऱ्यांस मदत इत्यादि. या शिवाय विशेष महत्वाची बाब म्हणजे गांव सफाई व रुग्णांस थोडी फार मदत. हीं सर्व कामें दिसण्यांत सोपीं आहेत खरीं; परंतु या सर्व कामांत गांवकऱ्यांचा निकट संबंध येतो व गांवांत जो अधिक समजुतदार असेल किंवा जे अधिक समजूतदार असतील त्यांवरच ही जबाबदारी पडत असे. म्हणजे त्यांजकडे आपोआप गांवाचें नेतृत्व व गांवाच्या हिताहिताची काळजी व भार येऊन पडत असे. त्याप्रमाणें धार्मिक व इतर बाबतींना ही हाच नियम लागू आहे. सर्व गांवांत मूळ पाटलांच्या वंशांत पोट घराणीं झालेलीं आहेत. मोठ मोठाल्या खेड्यांत मुलकी, आणि पोलीस असे दोन पाटील आहेत, व या दोन पाटलांत पुन्हा दहा दहा वर्षांच्या तीन तीन चार चार फेर बदली ही क्वचित् ठिकाणीं आढळतात, यामुळें पाटलां पाटलांत भयंकर मत्सराग्नि धुमसत आहे. त्याच प्रमाणें वर नेतृत्व गांवांतील समजुतदार लोकांकडे असतें असें सांगितलेंच आहे. म्हणजे नेत्याला गांवांत एक सूक्ष्मरूपानें मत्सरी आणि द्वेषी लोकांचा विरोध आपोआप असतो, व त्यास पाटलांच्या अंतःकलहाची भर असते. अशा परिस्थितींत हल्लींच्या गांव पंचायतीस सामाजिक, धार्मिक आणि ग्रामहिताची सार्वजनिक कामें करावीं लागतात. हीं कामें एकट्याच्या द्रव्यानें होणें शक्य नसतें. म्हणजे गांवांत तात्पुरत्या म्युनिसिपालिट्या कराव्या लागतात. व ज्याप्रमाणें कुटुंब संस्थापकामागें सारखा असंतोष लागलेला असतो त्याचप्रमाणें या पूर्वापार अनियुक्त बुद्धितत्वावर स्थापित झालेल्या ग्राम पंचायतींवर दाब—एक लोक मताचा किंवा दुसरा कनिष्ट दर्ज्याच्या वर्गाच्या निरीक्षणाचा—म्हणजे ग्रामपंचायती आहेत त्या बौद्धिक तत्वांवर स्थापलेल्या आहेत व त्यांवर लोकमताचा किंवा अधिकारी वर्गाचा दाब ही आहे व त्यास आळा घालण्या करितां काम करणाऱ्या शक्तिपेक्षां विरोध करणारी शक्ति ही अति प्रबळ रूपानें म्हणजे लिंग देह स्वरूपानें प्रत्येक खेड्यांत जागृत आहे.

अशा बौद्धिक तत्वांवर अस्तित्वांत

असणाऱ्या पंचायतींना अर्धचंद्र देऊन नवीन ( अजिटेटरस ) अविचारी साहसप्रिय अशांत मनाच्या अदूरदर्शी लोकांच्या नवीन पंचायती स्थापाव्या लागणार व असे झाल्यास गांवांतील दुही जी हल्लीं सूक्ष्म रुपांत आहे ती मूर्त स्वरुपांत येणार हें पहिलें व भयंकर नुकसान झालें.

२ दुसरें:—गांवाच्या पारिस्थितीमुळें गांवांत प्रायः विद्वान ह्मणजे पाटील. लोकांस औषध देणारा व मृत लोकांच्या इस्टेटीची वांटणी करणारा ह्मणजे पाटीलच. लोकांच्या किरकोळ तकरारी मिटविणारा ही पाटीलच. विद्याधिकारी, जमावणी अंमलदार, गुप्तहेर धार्मिक संस्थाचा पाद्री किंवा धर्मोपदेशक किंवा उपाध्याय, सत्यशोधक समाजासारखी दुही माजविणाऱ्या लोकांस उपयुक्त कामें करावयास लावणारा ही पाटीलच. बऱ्याच गांवांत पाटीलकीचें वतन पटवारी आणि माहारकी वतनाशीं संमिश्र असलेलें आढळून येतें. तें तरी पाटलाच्या अनियंत्रित गांव संस्थापनेच्या वेळच्या परिस्थितीमुळें व तत्कालीन व्यवस्था अद्याप ही चालू असल्यामुळें अद्याप ही पाटलांच्या घरांतच सर्व हक ( ह्मणजे सरकारनें मंजूर केलेल्या वृत्ती ) व सर्व वतनें एकवटलेलीं आढळतात. ह्मणजे गांवांत नेता, इंजिनिअर, ( शिल्प शास्त्रज्ञ ) डाक्टर, ( वैद्य ) सार्वजनिक हिताची कामें करणारा, व त्याकारितां पैसे जमा करणारा ही पण पाटीलच. न्यायाधीश ही पाटीलच. गांव रक्षणाचें काम करणारा ही पाटीलच. सारांश पाटलाच्या एका समष्टि व्यक्तिरुपांत गांवाचे सर्व हल्लीं दृग्गोचर होणारे सर्व अधिकार, एकवटलेले दिसून येतात व त्यांस विघ्ने मात्र फार. अशी स्थिती असून ही या विराट स्वरुपी अधिकाऱ्यांस मदती साठीं गांवांतील एक दोन उत्साही लोक पटवारी आणि माहार अशांचें साहाय घेऊन एक पंचायत जमा मंडळ प्रत्येक गांवांत स्थापावें लागलेलें आहे. शिक्षणाचा मुख्य हेतू हा आहे कीं प्रत्येकानें आपली मानासिक व शारिरिक उन्नति करून घेऊन आज्ञाधारकत्व व स्वोन्नति करीत असावें. अशी शिस्त पाळली न जाईल तर स्वातंत्र्य किंवा अधिक अधिकार व्यसनानें रयतेस जास्त प्रतीपगामिनी उच्छृंखल आत्म्य आणि पशुतुल्य केल्यासारखें होईल.

जुन्या ग्रामसंस्थांस अर्धचंद्र देऊन नवीन उच्छृंखल लोकांच्या ग्रामसंस्था स्थापल्या जाण्याचा संभव विशेष आहे. हें नुकसान दुसरें.

(३) तिसरें:—मोठ मोठाले ह्मणजे तहसीलदार, सबडिव्हिजनल आफिसर वगैरे प्रांतिक अधिकारी आकाशांतील देदिप्यमान चंद्रसूर्याप्रमाणें आहेत. त्यांस त्यांचे प्रकाशाखालीं असणाऱ्या वस्तू दिसतात. परंतु अंतरहित वस्तू दिसत नाहींत. यामुळें ते केतूप्रमाणें नुसते कबंधधारी ग्रह होतात. ही स्थिती त्यांच्या कार्यबाहुल्यामुळें आणि इतर परिस्थिती मुळें आहे यांत कोणाचाच दोष नाहीं. परंतु या योगानें ग्रामसंस्थांत अधिकारी वर्गास खुष करणाऱ्या लोकांस निवडून येण्याचा विशेष संभव असून आजवर ज्या पाटील लोकांनीं या संस्था कायम ठेविल्या, त्यांसाठीं आपले देह झिजविले, व द्रव्य आणि काळ हीं वेंचली त्यांवर अपमान व पूर्व कामगिरी बद्दल पारितोषकादाखल इतराजी मात्र होण्याचा संभव आहे.

(४) चवथें:—वरील तिसऱ्या कलमांतील पारितोषकानें पाटलांचें नुकसान होईल, त्याबद्दल आह्मास कांहींच वाटत किंवा वाटणार नाहीं. परंतु हा प्रश्न तत्वाचा आहे. या तत्वानें लोकांचें नैतिक सामर्थ्य आणि न्यायान्याय बुद्धि विशेष दुर्बळ आणि अंध होण्याचा फार संभव असून या पद्धती खाजगी द्वेष उगवून घेण्याची व ज्या लोकांचा दाब या नवीन संस्थावर राहील त्या लोकांस अधिकारी वर्गाची हांजीहांजी करून आपले खाजगी द्वेष उगवून घेण्याचे एक साधन होतील.

(५) पांचवें:—वरें अधिकारी वर्ग ह्मणजे वरील चंद्रसूर्य यांस नेहमी ग्राम स्थिती कळविणारे लोक ह्मणजे पोलीस अधिकारी. पोलीस खातें मनुष्याच्या शरीराचें व मालमत्ते[illegible] रक्षण करण्यासाठीं आहे. पोलीस रिपोर्ट [illegible]लेल्या गुह्यांसंबंधानें असतील तर त्यास कितपत महत्व द्यावें हें कायद्यानेंच ठरविलेलें आहे. परंतु ज्या ठिकाणीं नुसत्या तर्क शास्त्रानें अगर मोठ्या मानसशास्त्र नियम शोधनानें एखाद्यास पात्र किंवा अपात्र ठरविणें असेल तेथें कनिष्ट दर्जाच्या पोलीस आफिसरांच्या रिपोर्टास विशेष महत्व येण्याचा संभव आहे. ह्मणजे ग्राम संस्थांची मजबुती पोलीस रिपोर्टावर रचली जाणार. पोलीस सब इन्स्पेक्टरला सुद्धां पुष्कळ काम असतें, गुन्ह्यांचा तपासच लावणें त्यांस कठीण जाते. त्यांवर ज्या गांवांत एकीची बेकी झाली आहे त्या गांवांतील मानासिक (Psychic) अवस्थेबद्दल रिपोर्ट करावयास लावणें व त्या रिपोर्टावर विश्वास ठेवून लोकांस शासनें करूं लागणें ह्मणजे एक सुधारलेली ग्रामसंस्थारूपी गुलामगिरी देशांत सुरू केली असें होईल. ह्मणजे यापुढें ग्रामसंस्थाकडून गांवगाडा न ओढवतां एक तर्फी पोलिस शिपायांकडून तो ओढविण्याची पद्धत सुरु होण्याचा संभव विशेष आहे, गुन्ह्यांचा पत्ता न लागल्यास ज्या गांवांत फूट असेल त्या गांवांतील दुर्बल पक्षावर तुटून पडण्याचा सांप्रदाय आहे, व तो सर्वश्रुत आहे. व यामुळें पोलीस अंमल अप्रियही झाला आहे.

(६) सहावें:— लोक नियुक्त कार्यकर्त्यांकडून शासन घेण्याचा लोकांस अभ्यास झालेला नाहीं. स्वार्थ सोडून लोककार्यास वाहून घेण्या इतका विचार लोकांत व विशेषतः अशिक्षित व अडाणी लोकांत आलेला नाहीं. या साठीं जर पूर्वींच्या ग्रामसंस्था मुळीं असतील तर आतांच्या ग्रामसंस्था बीटवर फिरणाऱ्या पोलीस शिपायांच्या गुलाम बनतील. व त्या रयतेस नुकसान पोहोचाविण्यास अधिक साधनीभूत होण्याचा संभव मात्र आहे.

(७) सातवें:— लोकांस लोकनियुक्त संस्थांच्या आधीन होण्याचा अद्याप अभ्यास झालेला नाहीं. अशा स्थितींत हल्लींच्या सूक्ष्म पंचायतींत जी ग्रामहिताचीं कामें होतात तीं मात्र बंद पडून ग्रामहितास अत्यवश्य जे कार त्यांवर गदा येऊन अगदीं पूर्वींची ह्मणजे ग्राम वसतांना लोकांस ज्या अडचणी पडल्या असतील त्या अडचणींत पुन्हा मार्ग परत आक्रमण्याची कदाचित् पाळी येइल.

## समारोप.

या लेखाचे ऐतिहासिक, उपयुक्तता दर्शक, व अीती दर्शक असे तीन भाग केलेले आहेत. उपयुक्ततेंत सर्वांत मोठें अंग हें आहे कीं लोकांस शिक्षण, शिस्त, सार्वजनिक जोम आणि सहकारित्व उत्पन्न होण्यास या संस्था अवश्य आहेत. अनुपयुक्ततेंत मुख्य अंग हें आहे कीं स्वार्थत्यागी लोक आपणांत नाहींत, व या संस्थांच्या योगानें पोलीसखात्याचे अधिकार वाढून तें अधिक अप्रिय होण्याचा संभव आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करण्यासारखेच अधिकारी सर बेंजामीन यांनीं स्पेशल डयुटीवर नेमलेले आहेत, या साठीं ही योजना उपयुक्त भाग लक्षांत घेऊन अनुपयुक्त भागांस वगळून प्रचलीत होण्याचा संभव विशेष दिसतो.

## नववें महाराष्ट्र साहित्य संमेलन.

महाराष्ट्र साहित्य संमेलन ही संस्था आतांपर्यंत आठ वेळां भरून यंदाची त्याची नववी बैठक इंदुरास शिमग्याचे सुटींत ता. ९-१०-११ या तीन दिवशीं पुण्याचे सुप्रसिद्ध विद्वान मार्मिक लेखक, पंडित व कवि रावसाहेब गणेश जनार्दन आगाशे यांचे अध्यक्षत्वाखालीं भरणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. त्या संबंधानें इंदूरच्या मंडळींत पूर्ण उत्साह दिसत असून संमेलनाची तयारी जोरानें चालली आहे, व श्रीमंत सर सयाजीराव महाराज गायकवाड यांचे हातून त्याचा उपक्रमविधि करविण्याची तजवीज चालली आहे असें ही कळतें. याप्रमाणें सगळ्या गोष्टी जुळून आल्यास यंदाचें संमेलन निःसंशय मोठें थाटाचें व अपूर्व होईल यांत शंका नाहीं, व त्या बरोबरच तें यशस्वी ही होईल अशी आह्मी आशा करतों. या संमेलनासंबंधानें कित्येकांचे तोंडून वारंवार असे उद्गार निघतांना आपण ऐकतों कीं राजेमहाराजे किंवा लक्ष्मीपुत्र यांचा संबंध या संमेलनाशीं जोडण्यापासून काय लाभ होणार आहे? त्यांच्या आगमनानें शोभा येईल ही गोष्ट खरी असली तरी त्यापासून संमेलनाच्या कार्यसिद्धीला काय मदत होणार आहे? या लोकांचा आश्रय करण्यानें मंडळीला चार दिवस मेजवान्या झोडण्याला मिळतील, किंवा थाटमाट करतां येईल या पलीकडे साहित्याच्या अभिवृद्धीला त्यापासून कोणता लाभ होणार आहे? असा आक्षेप करणारे एक गोष्ट नेहमीं विसरतात, आणि ती गोष्ट ह्मणजे साहित्याभिवृद्धीस लागणारें द्रव्यसाह्य व इतर साह्य ही होय. सरस्वतीपुत्रांच्या आकिंचिन स्थितीमुळें कोशाचा रचना किंवा इतिहासाच्या साधनांचें प्रकाशन या सारख्या मोठ्या कामाला साहित्यसेवकांना हात घालतां येत नाहीं, व हें काम साहित्यपरिषदेसारख्या संस्थांचे जवळ शाश्वत द्रव्यनिधि असल्याशिवाय कधीं पार पडावयाचें नाहीं. शिवाय संस्थानिकांच्या दफ्तरांतून अनेक इतिहासोपयोगी कागदपत्र, बखरी, वगैरे असतात, त्या प्रकाशांत येण्यास संस्थानिकांची पूर्ण सहानुभूति मिळविणें अत्यंत अवश्य आहे. तिसरी गोष्ट, कांग्रेस सारख्या राजकीय संस्थांतून संस्थानिकांना वगळणें अपरिहार्य ह्मणून त्यांना आपण वगळतों. पण जेथें त्यांची सहानुभूति व सहकारित्व मिळविणें शक्य आहे तेथें ही त्यांना वगळणें व अशा रीतीनें लक्ष्मी व सरस्वती या भगनींची पूर्ण ताटातूट करणें कितीसें योग्य आहे? मराठे राजे महाराजे हे महाराष्ट्र-पुत्रच नव्हेत काय? त्यांना आपल्या मातृभाषेचा अभिमान वाटत नसेल काय? महाराष्ट्रीय जनतेशीं त्यांचा कांहींच कां संबंध नाहीं? ज्या राजघराण्यांशीं मराठी भाषेचा संबंध आज शेंकडों वर्षें चालत आला आहे तो संबंध तोडून टाकण्याचा आपणांस काय अधिकार आहे व तो तोडून टाकणें इष्ट तरी आहे काय? या ही गोष्टी आमच्या मतें विचार करण्यासारख्या आहेत, त्यांचा विचार केला ह्मणजे इंदूर, बडोदें, मिरज, इचलकरंजी, सांगली, कोल्हापूर, धार, देवास, ग्वालेर, इ० ठिकाणच्या संस्थानिकांना निमंत्रण देऊन त्यांची सहानुभूति व सहकारित्व मिळविण्याचा जो उपक्रम इंदुरकर मंडळींनें केला आहे तो खरोखर फार दृष्टीचा, साहित्याभिवृद्धीस व महाराष्ट्रीयांमधील परस्परांच्या प्रेमवर्धनास पोषक व प्रशंसनीय आहे असें ह्मटलें पाहिजे. श्रीमंत सयाजीराव महाराज व श्रीमंत होळकर सरकार यांनीं आतांपर्यंत मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीसाठीं व ग्रंथकारांना उत्तेजन देण्यासाठीं हजारों रुपये खर्चिले आहेत व इतर ही संस्थानिक थोड्याफार प्रमाणानें मराठी ग्रंथकारांना आश्रय देत असतात असा खरोखर प्रकार असतां महाराष्ट्र साहित्यसंमेलनांतून त्यांना वगळणें ह्मणजे कृतघ्नपणा होईल हें ही त्या बरोबर लक्षांत घेतलें पाहिजे.

यंदाच्या संमेलनापुढें ठरावांच्या व निबंधांच्या रूपानें जे विषय मांडण्यांत यावयाचे आहेत त्यांची यादी ही संमेलनाच्या स्वागत मंडळीकडून प्रसिद्ध करण्यांत आली आहे. तिच्यांत मागच्या संमेलनानें हातीं घेतलेल्या पैकीं कांहीं व कांहीं नवीन असे विषय आहेत. या विषयांची निवड बरीच समाधानकारक आहे. दुय्यम प्रतीच्या शाळांतलें शिक्षण देशी भाषेच्या द्वारें दिलें जावें ही पाहिली मागणी आहे. मुंबई युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर डा० म्याकिकन व व्हाइसराय ना. लॉर्ड चेम्सफोर्ड साहेब यांच्या सारख्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनीं ही आपापल्या भाषणांतून या मागणीला दुजोरा दिला आहे. तेव्हां संमेलनासारख्या संस्थेनें या ठरावावर आपल्या मान्यतेचें शिक्कामोर्तब करून योग्य मार्गानें चळवळ केल्यास ही मागणी सरकाराकडून व संस्थानिकांकडून मिळण्याचा फार संभव आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत हरएक प्रकारच्या उन्नतीला प्रतिबंध करणारें मुख्य कारण जें अज्ञान तें दूर करण्यास व ज्ञानाचा प्रसार झपाट्यानें होण्यास मोफत वाचनालयें व फिरतीं वाचनालयें काढण्याची अत्यंत अवश्यकता आहे. या गोष्टीचें स्मरण करून देणारा दुसरा एक ठराव

आहे व तो ही योग्यच आहे. मराठी पुस्तकांचा व लेखकांची मंत्री मराठी साहित्याच्या उत्कर्षाचें मोजमाप घेण्यासाठीं व साहित्याचा प्रसार होण्यासाठीं अत्यंत अवश्य आहे व हें काम विशेष खर्चाचें नसलें तरी परिश्रमाचें आहे, व तें साहित्यसभेनें हातीं घेणें अवश्य आहे. मराठी साहित्याच्या उणीवा अनेक आहेत व त्या भरून काढण्यासाठीं साहित्यसेवकांकडून प्रयत्न होत असतात; पण त्यांनीं परिश्रम करून लिहिलेल्या ग्रंथांच्या प्रकाशनास द्रव्याभाव ही अडचण पुष्कळ वेळां येते. ही अडचण दूर करण्यास धनिकांकडून आश्रय मिळविण्याची अवश्यकता असते, पण तो आश्रय मिळविण्याचीं साधनें सर्वांनाच अनुकूळ नसल्यामुळें कित्येक चांगले चांगले ग्रंथ अप्रकाशित राहतात. ही अडचण साहित्यपरिषदेसारख्या संस्थेनें मनावर घेतल्यास दूर करतां येईल. उदाहरणार्थ, प्राचीन व अर्वाचीन मराठी भाषेचा कोश घ्या. हें काम खंडशः कांहीं लेखकांनीं करून ठेविलें असून द्रव्याच्या अभावीं तें पडून राहिलें आहे, असें एक उदाहरण आह्मांस माहित आहे. साहित्यपरिषदेसारख्या संस्थेनें खटपट करून हा कोश प्रसिद्ध केल्यास मराठी वाङ्मयास किती तरी मदत होईल! अलीकडे मराठी नाटकें व कादंबऱ्या यांच्या वाचकांची व लेखकांची अभिरुचि बिघडत चालली आहे अशी तक्रार वारंवार ऐकूं येते, पण चांगली अभिरुचि कशाला ह्मणावयाचें व तिचीं लक्षणें कोणतीं व वाईट अभिरुचि कशी ओळखावी याची माहिती फार थोड्यांना असेल. तेव्हां या विषयाची चर्चा होणें अत्यंत अगत्याचें आहे. व हें कार्य संमेलनासारख्या विद्वत्समूहानेंच करावयास पाहिजे हें उघड आहे. मराठींत शास्त्रीय ग्रंथ सोप्या भाषेंत झाल्याशिवाय हल्लींच्या काळीं तरणोपाय नाहीं असें प्रत्येक जणास वाटतें. पण त्या दिशेनें प्रयत्न मात्र दिसत नाहीं. मराठी वाङ्मयांत शास्त्रीय ग्रंथ थोडे आहेत व मासिक पुस्तकांतून सुद्धां शास्त्रीय विषयांवर सोपे व मनोरंजक असे लेख क्वचितच येतात. त्यामुळें आमच्या लोकांच्या विचारांचा विकास व्हावा तसा होत नाहीं. मराठींत या विषयाला वाहिलेलें एक ही मासिक पुस्तक नाहीं. ही शोचनीय स्थिति कधीं दूर होणार? हा सध्याचे काळीं मोठा प्रश्न आहे, व त्याचा विचार यंदाच्या संमेलनानें लांबणीवर टाकणें अगदीं अप्रशस्त होईल. आपल्यांत निर्लोभी ग्रंथकार बरेच आहेत पण निर्लोभी व शिस्तीनें व प्रामाणिकपणानें ग्रंथप्रकाशनाचें काम करणारे प्रकाशक नसल्यामुळें पुस्तक लिहिण्याचें व प्रकाशनाचें अशीं दोन्ही कामें एकट्यालाच करावीं लागतात. विलायतेंत किंवा अमेरिकेंत हीं कामें आपापला व्यवसाय उत्तम रीतीनें मागणाऱ्या व प्रामाणिकपणा ठेवून नांवलौकिक संपादणाऱ्या लोकांनीं वाटून घेतल्यामुळें तिकडे ग्रंथ लेखनाचें व प्रकाशनाचें काम झपाट्यानें चालतें. या लोकांची काम करण्याची पद्धत कशी काय आहे या विषयींची माहिती सुद्धां इकडे फारशी कोणास नाहीं. तेव्हां या विषयांत एखाद्या माहितगार माणसाकडून ही माहिती सांगण्यांत येईल तर मराठी वाङ्मयांत चांगली भर पडेल, या हेतूनें निबंधाच्या यादींत याविषयाचें नांव प्रविष्ट करण्यांत आलें आहे ही फार उत्तम गोष्ट आहे. सारांश, यंदाच्या संमेलनानें हातीं घेण्यासाठीं योजिलेले विषय तात्विक व व्यावहारिक अशा दोन्ही दृष्टींनीं महत्वाचे असून यांचा योग्य विचार यंदाचे संमेलनांत होईल तर हें यंदाचें संमेलन मागील सर्व संमेलनांपेक्षां अधिक यशस्वी व फलद्रूप होईल अशी आशा करण्यास बरीच जागा आहे. ही आशा सफळ होवो असें आह्मी चिंतितों.

## महायुद्धाची प्रगति.

'पायोनियर' च्या स्पेशल केबलवरून कळतें कीं 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जितो वा प्राप्स्यसे महीम्' या गीता वाक्याप्रमाणें जर्मनीचा कृतनिश्चय झाला आहे आणि या १९१७ सालामध्यें या युद्धाचा कांहीं तरी निकाल अखेर करून घेण्याच्या बुद्धीनें जर्मनींतरच्या सैन्याची आटोकाट तयारी त्यानें चालविली आहे. इकडे मित्रराष्ट्रांकडे पहावें तर त्यांची जर्मनीला तोंड देण्यासारखी कांहींच तयारी दिसत नाहीं असें तेंच पायोनियर पत्र ह्मणत आहे. तथापि ब्रिटिश मुत्सद्यांच्या भाषणांत अशा प्रकारच्या निराशेची छायासुद्धां कोठें दिसत नाहीं. ग्रीसमध्यें सध्यां शांतता दिसत आहे. तिकडे मित्रराष्ट्रांना संकटांत घालण्याचे जर्मन केसरचे बेत कसे सपशेल फसले व ग्रीसच्या बादशहाला आयतेवेळीं केसरनें मी तुह्मांला मदत करण्यास असमर्थ आहे असा निरोप पाठवून कसें असहाय स्थितींत त्याला सोडून दिलें तें आतां सर्वांना श्रुत झालेंच आहे मि. बॉनर लॉ यांचे सांगण्यावरून असें दिसतें कीं मित्रराष्ट्रांनीं घातलेल्या सर्व अटी अक्षरशः पाळण्यास ग्रीस आतां कबूल झाला आहे. पूर्वेकडील रणक्षेत्राची बातमी अलीकडे फारच कमी आलेली आहे. रूमानियाकडे इंग्रजांनीं दोनदां शत्रूंवर चाल करून त्यांच्या ठाण्यांवर तोफांचा भडिमार केला या पलीकडे तिकडून बातमी आली नाहीं. गॅलीशियामध्यें लढाई रेंगाळत चालली आहे. कार्पेथियनमध्यें जनरल ब्रुसिलॉफ पुढें पुढें सरकत आहेत हें पाहून त्यांना अडविण्यासाठीं जर्मनीनें आपलें जंगी सैन्य तिकडे पाठवून त्यांचा मार्ग रोखला व रशियन फौजेला मागें हटावयास लाविलें. मेसोपोटेमियामध्यें लढाई जोरानें सुरू आहे. टैग्रिस नदीच्या उजव्या किनाऱ्यावरून शत्रूला पार हाकून लावण्यांत आलें आहे. पश्चिम रणक्षेत्रांत आंक्र नदीच्या दोन्ही तीरांवर ब्रिटिशांची बाजू सावरून धरण्यांत येत आहे. मिरोमांटपाशीं भयंकर लढाई झाली व तींत इंग्रजांनीं अशा खुबीनें व शर्थीनें वर्तन केलें कीं जर्मन लोकांचा बराच नाश करून त्यांना अत्यंत नाजूक परिस्थितींत आणून सोडण्यास ते समर्थ झाले आहेत. शांपेन प्रांतांत शत्रूची चळवळ जोरात दिसत आहे. रीम्स पासून ३० मैलांवर पायदळांची इतकी मोठी लढाई झाली कीं ती इतिहास प्रसिद्ध होऊन राहील. येथें जर्मन लोकांनीं लढण्याची येवढी शिकस्त कां केली हें गूढ अद्याप मोठमोठ्या लष्करी अधिकाऱ्यांना उकलत नाहीं. पण जर्मनीचा यांत कांहीं तरी मोठा कावा असला पाहिजे अशी त्यांना शंका आहे. बेल्जममध्यें होईल तेवढें सैन्य आणून सोडण्याचा जर्मनीचा क्रम सुरूच आहे. या सालीं मारूं किंवा मरूं असा जर्मनीचा कृतनिश्चय आहे असें ह्मणण्यास हा मोठा पुरावा आहे. जनरल हेग यांना ही असेंच वाटत आहे. याला तोंड देण्यासाठीं इंग्लंडमध्ये जारीनें तयारी सुरू आहे. दारूगोळ्याची तयारी झपाट्यानें चालली आहे. गेल्या जूनमध्यें जेथें दर आठवड्यांत सरासरीनें बावीस तोफा दर आठवड्यास तयार होत होत्या तेथें गेल्या जानेवारींत ३९९ होऊं लागल्या यावरून या तयारीची कांहीं कल्पना करतां येईल. दारूगोळ्याच्या तयारीबरोबर रेल्वेची ही तयारी अशीच जोरानें व्हावयास पाहिजे असें मार्शल हेग यांचें ह्मणणें आहे. इंग्लंड स्वतःची तयारी करून स्वस्थ बसलें नाहीं. तर रशिया, इटली व रूमानिया यांना ही युद्धाची सामुग्री पुरवीत आहे. इंग्लंडचे लोक ब्रिटिश सरकारला पैशाचा पुरवठा करण्यांत किती तत्पर आहेत हें विलायतेंत नुकत्या काढलेल्या कर्जाच्या रकमेची भरपाई किती त्वरेनें झाली यावरून दिसतच आहे. ब्रिटिश साम्राज्याला त्याच्या निरनिराळ्या अवयवांकडून ही तशीच मदत तत्परतेनें मिळेल अशी आशा आहे. हिंदुस्थानांत स्वतंत्र म्युनिशन बोर्ड नव्हतें तें आतां स्थापन झालें आहे व लवकरच इकडे कर्ज काढणार आहे त्यास ही मदत अशीच तत्परतेनें होईल अशीं चिन्हें दिसत आहेत.

## जर्मनीचा बागुलबोवा.

आमच्या टापूंत सांपडेल ती बोट, मग ती शत्रूची असो कीं तटस्थ राष्ट्राची असो, सब्मरीननें बुडविण्यास आह्मी कधीं सोडणार नाहीं अशी धमकी साऱ्या जगाला देऊन जर्मनीनें स्वतः सर्वांच्या उपहासासच नव्हे तर तिरस्काराला ही पत्र करून घेतलें आहे. या धमकीला भीक घालण्याइतके दुर्बळ सगळे देश आहेत ही जर्मनीची समजूत किती चुकीची आहे हें अमेरिकेनें तत्काळ त्याच्या नजरेस आणून दिलें. इंग्लंडावर तर या धमकीनें कांहींच परिणाम केला नाहीं. ब्रिटिश आरमाराची शक्ति केवढी आहे याची कल्पना धमकी देतांना आली नसली तरी गेल्या एक दोन आठवड्यांत घडलेल्या प्रकारावरून आतां करतां येईल व हा बागुलबोवा दाखवून आपण स्वतःचें नुकसान करून घेतल्याबद्दल योग्यवेळीं पश्चात्ताप ही होईल. जर्मनीच्या सबमरीन बोटी एकीमागून एक बुडविण्यांत येऊं लागल्या आहेत. लॉर्ड लिटन व लार्ड कर्झन यांनीं पार्लमेंटापुढें सादर केलेल्या हकीकती वरून सबमरीनच्या बागुलबोवाच्या चिंधड्या करण्यास व नुसत्या स्वतःच्याच बोटींचें नव्हे तर तटस्थ राष्ट्रांच्या ही बोटींचें संरक्षण करण्याची ब्रिटिश आरमाराची तयारी आहे हें उत्तम प्रकारें व्यक्त होत आहे व अनुभव ही तसाच येत आहे. दोन आठवड्यांपूर्वी सिंह जरा निद्रिस्त होता तेव्हां उंदरानें गडबड केली, पण आता त्याला ती तशी करतां येत नाहीं. ब्रिटिश बोटीवर संरक्षणाची अद्यत तयारी ठेवण्यांत येऊं लागली आहे व बुडविलेल्या बोटींच्या संख्येपेक्षां अधिक बोटी अमेरिकेंत व जपानांत ब्रिटिश राष्ट्रांसाठीं तयार होत आहेत. आणखी दीड महिन्याचे आंतच जर्मन सबमरीनचा पुरा बंदोबस्त आपण करून दाखवूं असें लॉर्ड बेरेसफोर्ड यांनीं छातीला हात लावून सांगितलें आहे. या सबमरीनच्या धमकीमुळें अमेरिकेंत खरी खरी जागृति झालेली अद्याप दिसत नाहीं. कारण प्रेसिडेंट हे खऱ्या हाडाचे शांतिब्रह्म आहेत तथापि सगळेच अमेरिकन लोकांनीं त्यांची ही वृत्ति जेंपर्यंत स्वीकारली नाहीं तोंपर्यंत अमेरिकन राष्ट्राच्या इज्जतीसाठीं नाहीं तरी निदान त्या लोकांच्या प्राणरक्षणार्थ तरी त्यांना सावध राहणें व तसाच प्रसंग आल्यास युद्धाचें बिगुल फुंकणें भाग पडेल.

## पाटणा युनिव्हर्सिटी बिल.

या बिलासंबंधानें लोकमत किती विरुद्ध आहे तें वर्तमानपत्रांतून, जाहिरसभांतून आणि कायदेकौंसिलांतल्या लोकनियुक्त सभासदांच्या भाषणांच्याद्वारें प्रकट झालेंच आहे. कित्येक सरकारी अधिकारी ही जपून पण एकंदरीनें या बिलाच्या विरुद्धच भाषणें करीत आहेत. आतां इतर युनिव्हर्सिट्या ही या बिलासंबंधानें प्रतिकूळ मतें जाहिर करूं लागल्या आहेत. कलकत्ता युनिव्हर्सिटीनें या बिलाचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमिली होती. या कमिटीनें आपल्या रिपोर्टांत स्पष्ट ह्मटलें आहे कीं युनिव्हर्सिटीच्या कारभाराचीं सूत्रें आपल्या हातांत घेऊन त्यांचें स्वातंत्र्य हरण करण्याचा सरकारचा उद्देश या बिलांत उघड उघड दिसत आहे. युनिव्हर्सिटीच्या अधिकाराचा संकोच करण्याचा हा सरकारचा प्रयत्न अगदीं नादानपणाचा आहे. या बिलाच्या मुळाशीं असलेली तत्वें चुकीचीं आहेत. पंजाब युनिव्हर्सिटीकडे हें बिल पाठविण्यांत आलें होतें. तेव्हां तेथील व्हाइसचान्सेलर साहेबांच्यानें उघडपणें सरकारला दोष देण्याचें धैर्य करवले नाहीं. तथापि अनुकूळ मत देण्यास मनोदेवता सांगेना ह्मणून त्यांनीं युक्ति केली. ती अशी कीं बिलाची नक्कल आली आहे खरी; पण त्यावर अभिप्राय द्या असें सरकारनें ह्मटलें नाहीं, तेव्हां आपण अभिप्राय देऊं नये असें त्यांनीं सांगितलें. व्हाइस चान्सेलर साहेबांच्या या कोटिक्रमांतच त्यांचा खरा अभिप्राय व्यक्त होत आहे हें चाणाक्ष वाचकांस सांगावयास नकोच.

## आस्ट्रेलिया आणि हिंदुस्थान.

सध्याच्या युद्धाच्या काळांत कोणतेही वादग्रस्त प्रश्नाची चर्चा करूं नका असा

उपदेश हिंदुस्थानांतले सरकारी अधिकारी व आंग्लो इंडियन पत्रें कंठरवानें करीत आहेत. नुक्तेच व्हाइसराय साहेबांच्या कौंसिलांत येणारे पुष्कळ महत्त्वाचे ठराव याच कारणावरून माघारे घेण्यांत आले. पण या उपदेशाची गरज हिंदुस्थानापेक्षां आस्ट्रेलियासारख्या वसाहतींनाच ज्यास्त आहे हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल. युद्ध सुरू झाल्यापासून न्यू साऊथ वेल्समध्यें आतापर्यंत ८१४ संप झाले. यांतले बहुतेक खाणीतल्या कामासंबंधानें होते. तेथें मजुर व खाणीवाले यांचे उघड दोन पक्ष होऊन दोन्ही पक्षाला बड्याबड्या मंडळींचें साह्य असल्यामुळें तेथील पार्लमेंटांत उघड दुफळी झालेली आहे व अतिशय बजबज पुरी माजली आहे. याचा परिणाम ब्रिटनच्या व्यापारावर व उद्योगधंद्यांवर ही होऊं लागला आहे; इतकेंच नाहीं तर युद्धांत मित्रराष्ट्रांच्या पक्षावर ही त्याच घातुक परिणाम होऊं पहात आहे, असें असें लंडन टाइम्सचा तेथील बातमीदार लिहितो. या संपाचा परिणाम असा झाला आहे कीं नुसत्या सिडने बंदरांत शंभर जहाजें रिकामीं अडकून पडलीं आहेत. व्यापार बंद पडला आहे. शेंकडा ९० कारखान्यांना कुलुपें लागलीं आहेत; आणि हजारों मजूर रिकामे हिंडत आहेत; युद्धाची सामुग्री तयार करण्यास कोळसा मिळत नाहीं; सिडने शहर विजेचे दिवे न लागल्यामुळें अंधारांत गडप झालें आहे; आस्ट्रेलिया भयंकर संकटांत सांपडलें आहे. असें वर्णन लंडन टाइम्सच्या आस्ट्रेलियन बातमीदारानें दिलें असून तुम्ही असे वाद घालीत बसूं नका, असें त्यांना दरडावून सांगण्यास कोणीही अधिकारी किंवा इंग्रजी पत्रें पुढें येत नाहींत, आणि हिंदुस्थानांत याच्या शतांश किंवा सहस्रांश ही गडबड नसतां, कोठें ही संप किंवा राजकीय असंतोषाचें चिन्ह दिसत नसून ही राज्यकारभाराच्या सुधारणे संबंधाची यत्किंचित् चर्चा ही दडपून टाकण्याचे प्रयत्न होत आहेत. आस्ट्रेलियांतल्या मजुरांनीं इतकी गडबड केली तरी त्यांच्या मागण्या त्यांना देऊन टाकून तेथील सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांचें तोंड बंद केलें; आणि हिंदुस्थानांत राजकीय चळवळ करणारांना कोठें बंदी करून, कोठें सभा भरविण्याची बंदी करून व कोठें वर्तमानपत्रकर्त्यांना धमकी देऊन निरुपद्रवी राजकीय चळवळ दाबून टाकण्याचा यत्न चालला आहे. ही विरोध निःपक्षपाताची दृष्टि ठेवून पाहाणारास किती विचित्र वाटत असेल!

## लष्करी विद्या

### ( इंडीयनास खुला दरवाजा )

या प्रचंड महायुद्धाच्या गर्भांत किती तरी कल्याण राशी गुप्त आहेत हें एक भावीकालच सांगूं शकेल. अखेर हिंदुस्थानच्या लोकांच्या पलटणी तयार करण्याचें पहिलें बिल व्हाइसरॉयच्या कायदे कौंसिलपुढें आलें आहे हा मोठा शुभयोग होय. फ्रेंच सेनापती डुप्ले यांनीं इंडियांत इंडियन पलटणी तयार करण्याचा दीड शतकापूर्वी कित्ता घालून दिलेला आहे. तो वळविण्याइतके फ्रेंच मना प्रमाणें ब्रिटिश मन उदार होण्याला व इंडियना विषयींचा गैरविश्वास दूर होण्याला इतका काल लोटला. लष्करी शिक्षणाला आतां आमच्या देशाची पात्रता राज्यकर्त्यांस दिसून आली आहे. तेव्हां यापुढें तरी ब्रिटिश साम्राज्याचे इंडियन हे खरे भागीदार आहेत, आणि त्या भागीदारीच्या व्यवहारांत विश्वासुकपणा व प्रामाणिकपणा जसजसा उच्च कोटीला पोंचत जाईल, त्या मानानें प्रस्तुतचा हा काळागोरा अमंगळ भेदाभेद अस्तास जाऊन इंडियन हे राजनिष्ठ आहेत असें गौरवानें सांगत बसण्यापेक्षां इंडियनास ब्रिटिश छत्राचा अभिमान वाटून त्यांचा राजनिष्ठेचा उपजत सद्गुण सर्व जगास आश्चर्यभरित करून सोडील. लष्करी शिक्षणाचे दरवाजे सरकारनें आतां खुले केले आहेत. तेव्हां लोक या सवलतीचा फायदा घेण्यास प्रवृत्त होतील असा हा आनंदाचा सुदीन आहे. युरोपियनांविषयीं सक्ती राहील, पण इंडियनांविषयीं हा खुल्या दिलाचा बाजार ठेवला आहे. नामदार रा. मझरूल हक यांस हा पंक्तिप्रपंच देखील कबूल नाहीं. कौंसिलांतील सर्व बिनसरकारी नामदारांनीं इंडियन व युरोपियन यांच्या मध्यें समसमानता ठेवा, अशा विषयीं जो अवर्णनीय कल्लोळ केला तो आमचे व्हाइसराय व सेनाध्यक्ष खुद बादशहांच्या कानावर घालतील, तेव्हा ही इंडियांतील आकाशवाणी या जर्मन युद्धाचा शेवट अगदीं समीप आहे, आणि ब्रिटिश संस्कृतींतील सर्व पापांचें क्षालन होऊन इंडियांतील जुन्या आर्य संस्कृतीचें साम्राज्य पुन्हा लवकरच संस्थापित होईल असें ध्वनित करील. ही लढाई पुरतीच तर्तूद आहे; तथापि हिला खरें यश येण्याला महाराणी सरकारचा तो पवित्र जाहिरनामा अक्षरशः खुल्या दिलानें अमलांत आला पाहिजे. शाब्दिक प्रतारणेच्या कोटिक्रम बिलकूल चालणार नाहीं. अंतःकरणेंच जर स्वागत करितील तर ब्रिटिश साम्राज्य पुरुषाचा महादेह सर्व जगाला भारी होईल.

## गवसणी.

### ( श्री टिळक विचारांचा कोंडवाडा. )

राष्ट्रसेवेनें सर्व राष्ट्र आपलेसें केलें आहे, अशा सत्पुरुषांना पंजाब सरकार आपल्या इलाख्यांत येण्याची मनाई करिते. आणि ही मनाई देखील निष्कारण असून हवेंत किल्ले बांधण्यासारखी आहे. राजश्री टिळक यांचा विचार पंजाबांत जाण्याचा कधींच नव्हता. तरी देखील मनाईचा हुकुम बजावण्यांत आला. अशा कृतीनें लोक समूहाचीं अंतःकरणें मात्र विदीर्ण होतात पुण्याचे राजश्री गद्रे यांनीं राजश्री टिळकांची पाहिली मोहीम म्हणून नुकतेंच छोटें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यावरून कल्पना होईल कीं महाराष्ट्राच्या ध्येयाला सुंदरता आणणाऱ्या या थोर व्यक्तीचा उपहास न कळण्या इतका लोकसमूह मुग्ध व मूर्ख नाहीं. राजश्री टिळकां बरोबर बाबू बिपिन चंद्रपाल यांच्या विरुद्धही मनाईचा हुकूम सोडण्यांत आला आहे. जेथें नव्या भवितव्यतेनें राजनिष्ठेचे मार्ग प्रकाशित केलेले आहेत, तेथें हे असले हुकूम म्हणजे आकाशाला गवसणी घालण्या सारखे निष्फळ होत

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— आरोग्यदायी थंडी व उत्तेजक सूर्य प्रकाश यांनीं फाल्गुनी देवीचे महोत्सव डोळ्यापुढें अधिक खेळूं लागले आहेत, पण या प्लेगाच्या व्यतिपातापुढें जे लोक जंगलभर पसरले, व वनभोजनें करूं लागले ते मात्र खरे सुखी होत.

**प्लेगः**— आकोल्यास मोकळ्या हवेंतील नवी कायमचीं वसतिस्थानें प्लेगानें दूषित झालीं, त्यामुळें दाणादाण उडाली आहे. प्लेगाचे मृत्यू दररोज ८-१९ पर्यंत होतात दूषित स्थळांचा त्याग न केल्यास देहांत शिक्षा देण्याचा सृष्टीनें कडक लष्करी कायदा सुरू केला आहे. ज्यानें त्यानें आपापल्या जीविताची खरी किंमत ओळखून घ्यावी, प्लेगाच्या रोगावर वैद्य क्रिया जरी अगदीं थोडी चालते तरी येथील डाक्टर मंडळींनीं बरेंच यश संपादलें आहे. तूर्त आयोडाइन व त्याचे दुसरे पदार्थ हे रामबाण औषधें म्हणून गाजवले आहेत. इंदूरचे सर्जन मेजर डाक्टर तांबे यांच्या आयोडीलच्या शोधालाही पुष्कळ महत्त्व आलें आहे.

**सभाबंदीः**— विद्यार्थ्यांनीं कोणत्याच सार्वजनिक सभेला जाऊं नये, असा नवा वट हुकूम विद्याखात्याच्या श्रेष्ठ अधिकाऱ्यांनीं प्रचलित केला आहे. लोकांपाशीं विद्यालयें नाहींत म्हणून सरकारी विद्यालयांच्या आश्रयासाठीं निरुपायानें विद्यार्थीवर्ग हल्लीं प्रमाणेंच शाळांतून गजबजलेला राहील. सभा बंद झाल्या पण सभेचीं आख्यानें छापणारीं वर्तमानपत्रें यापुढें विद्यार्थी आपला अभ्यास सोडून ही अगोदर वाचतील. या भावी नव्या रोगावर एखादा देशी टोंचण्याचा उपाय निघेल तर बरें, आणि विद्यार्थी दशेला पोंचलेलीं मुलें स्पार्टन पद्धतीप्रमाणें आमचे सरकार निरनिराळ्या गुरुकुलांत वाढवतील तर पालकांचाही बोजा हलका होईल.

**स्वागतम्**—रा. रा दिगंबर कृष्ण कोल्हटकर यांस रजा संपतांच आकोल्यासच आडिशनल डिस्ट्रिक्ट जज्य नेमण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

## नोटीस

नोटीस बेशमी रावजी जानजी गवळी पाटील रा० सिंदखेड तालुके आकोला जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुम्हास ता० २९-४-१६ कुलमुखत्यार नेमलेले व रजिष्टर केलेले होते ते आमचे कामाचा निकाल झाला आहे. सदरहु मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें आहे व नोटीस पावले पासून २४ तासाचे आंत आमचे सर्व कागदपत्र आणून द्यावे, व तुमचा व आमचा हिशेब जो झाला असेल तो आकोले मुक्काम जैनमंदीरमध्यें गणपत नाथ यांचे जवळ द्यावी व पावती घेऊन जावी. असे न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज करावी लागेल व या नोटिसीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल.

सही

भीमाबाई नवरा भोनाजी तेली रा० माझोड ता० जि० आकोला
हातची निशाणी आंगठा तर्फे
गणपत कडताजी नाथ
आकोला जैन मंदीर.

नो० नं० ९१

## नोटीस

नोटिस बेशमी अब्दुलकरीम वा। महमद सुलतान चमडे मर्चंट राहणार बाळापूर ता० मजकूर जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तारीख २०-११-१९१६ इसवी रोजीं तुमचा आमचा चमड्या संबंधाचा सवद्याचा ठराव होऊन बुधवारीं माल देण्याचा करार ठरला होता. मध्यंतरी भाव दहा दहा वीस वीस रुपये तेज आल्यावरून बुधवारीं आपण व आपले मुनशी असे उभयतां माझे घरीं व किराण्याचे दुकानीं व चमड्याचे दुकानीं पुष्कळ वेळ चक्कर केले व आम्हीही आमचे तेजभावामुळें झालेलें नुकसान सहन करून आपलेंशी सवदा ठरला, त्याप्रमाणें जबान कायम ठेवून माल तुम्हाला दिला, व या पूर्वी ही बरेचवेळां अशाच प्रकारें तुम्हाला माल दिला होता. त्यानंतर तारीख १४-१-१९१७ इसवी रोजीं तुमचा आमचा सवदा चांगल्या दोन संभावित गृहस्था समक्ष झाला, त्याचा तपशील खालील प्रमाणें:—

खाल १००० दर खंडी रुपये ३९ प्रमाणें लासलेट

वाळदी ४०० दर मण रुपये २९ प्रमाणें आन्दरेज दर खंडी ६॥ मणाचे

मेथी ३०० दर खंडी रुपये २० प्रमाणें

जामोस ५० दर मग रुपये १८ प्रमाणें

डबे नग ४० डबा चरबी दर मण रुपये १९ प्रमाणें

येणें प्रमाणें भाव ठरून वर लिहिलेला माल ता. २९-१-१७ इ. पर्वेतों भरना करून देण्याचा ठराव झाला होता. त्याप्रमाणें माल आम्ही तुमचे करितां सर्व खरेदी करून तयार ठेविला आहे, व माल घेऊन जाण्याकरितां आपणाला व आपले मुनशीला बरेच वेळां म्हटले परंतु भावाचा कांहीं कमी जास्तीचा फरक झाल्यामुळें तुमचे मनांत आमचा माल घेण्याचा दिसत नाहीं, व विनाकारण चुकवा चुकवीच्या गोष्टी करितां तेव्हां अशी गोष्ट आपले सारखे बेपाऱ्यास करणें व आपले जबानींत फरक पाडणें योग्य नाहीं. जसे पूर्वी आम्ही नुकसान सोसून सवदा दिला त्याप्रमाणें आपण आपले जबानीवर कायम राहून ही नोटीस पावल्या तारखेपासून चार दिवसाचे आंत माल घेऊन जावा, तो माल खराब होण्याचा संभव आहे, सबब आतां आम्ही जास्त दिवस ठेवूं शकत नाहीं. व आपण माल जर न घेऊन गेले तर बाजार भावाप्रमाणें माल आम्ही विकून काढूं, व त्यामध्यें जें नुकसान लागेल तें तुम्हास द्यावें लागेल. व जर आपण लागलेलें नुकसान आपसांत न दिले तर त्याजकरितां आम्हाला तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा आणावा लागेल. त्याजला जो खर्च लागेल तो व ह्या नोटीशीचा खर्च व सर्व नुकसान असें तुम्हांस भरून द्यावें लागेल. कळावे तारीख २३-२-१७

सही

गुलामनबी वा। शेखअब्दुल द० खुद

नो० नं० ९२

## नोटीस

नोटिस बेशमी निजामोद्दीन वा। नवाबउद्दीन जात मुसलमान राहणार मौजे जांब प्रगणे व तालुके पुसद जि. यवतमाळ

यांसः—

१ चुन्या व २ चापला वा। हरजी जात बंजारी राहणार मौजे जांब प्रगणे व ता० पुसद जि. यवतमाळ

यांजकडून

नोटिस देण्यांत येते कीं, आह्मी तुह्मास कुलमुखत्यारपत्र लिहून नोंदून दिले होते. त्यावरून तुह्मी आमची कामें करूं लागले असतां आह्मास स्पष्ट रितीनें दिसून आले कीं, आपण आमचीं कामें चांगल्या प्रकारें करीत नाहीं. त्यामुळें आह्मी तुह्मास तारीख १-१२-१६ इ॥ पासून नौकरीवरून कमी केले आहे. व कुलमुखत्यारपत्र ही रद्द केलें आहे. यापुढें तुह्मी आमचे करितां केलेली कारवाई रद्द समजली जाईल. ही नोटिस दिली ता. ३०-१-१७ इ. द. यशवंत बापुजी रा. पुसद

सह्या

१ नि॥ चुन्या वा। हरजी बंजारी याची

१ नि॥ चापला वा हरजी बंजारी याची

नो० नं० ८९

---

## नोटीस

नोटिस बेशमी सावित्री मर्द पुरणगीर गोसावी राहणार कासली खुर्द पो. आकोला ता० आकोला

हीस—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं, तूं माझी सखी चुलती असून तुझ्याजवळ वडिलोपार्जित स्थावर जिनगी— मौजे कासली येथील स. नं. १६ पोट हिस्सा नंबर २ आठ एकर ३३ गुंठे व दुसरें सर्वे नंबर २१ पांच एकर २६ गुंठे या पैकीं ५५४ चा हिस्सा. आणि मौजे धनवाडी ता आकोला येथील सर्वे नंबर १०८ पैकीं निंमे हिस्सा. येणें प्रमाणें तुजकडे आहे. तुला संतती २ मुली आहेत मुलगा नाहीं. या दृष्टीनें सदर जिनगीचा मी हक्कदार आहे. मी असें ऐकले आहे कीं, तूं या जिनगीची अफरातफर करणार आहेस. तर असें करूं नये. मरेपर्यंत तुं या जिनगीचा उपभोग घ्यावा. तूं ही जिनगी कोणास गहाण अगर खरीदी देऊं नये. तसेंच सर्वत्रांस ही कळविण्यांत येते कीं वरील बाई जवळून कोणी वरील जिनगी गहाण, खरीदी, वगैरे घेऊं नये. घेतल्यास बोजा जिनगीवर राहाणार नाहीं. पुढें कोणी फसूं नये सबब आगाऊ नोटीस दिली आहे कळावें. ता० १७-२-१७

सहीची निशानी आंगठा

दौलतगीर गुरु रामगीर गोसावी राहणार कासली खुर्द तालुके आकोट यांचा खुद

नो० नं० ८६

---

## नोटीस

नोटिस बेशमी सोनाजी रामजी तेली राहणार बावनबीर तालुके जळगांव

यांसीः—

खालील सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजला तारीख २३-१-१७ रोजीं जी रजिष्टर नोटीस दिली त्याचा तपसील खालील प्रमाणें:—

१ मौजे बावनबीर येथील राहते घर कवेलुचे दर्शणी भाग एक पूर्वेस व एक पश्चिमेस आणि बेरेकार बेटाळांतील जागा लांब रुंद पूर्व-पश्चिम हात २६ दक्षिण उत्तर हात २६ येणेंप्रमाणें दोन्ही जागा दगडमाती इमल्या आंगण आडासुद्धां विक्रीचा ठराव तारीख ५-१-१७ ला झाला. त्यांत तुमचां आमचा सौदा ३४५ रुपयास झाला आणि इसाराबद्दल २५ रुपये दिले आणि १५ दिवसानीं खरेदीखत करून देईन व पुढें तारीख १८-१-१७ रोजीं खरेदीखत करून देण्याविषयीं ह्मटले असतां आज मला वज्यंकवार आहे व पुन्हा दुसरें दिवशी करार दाखवतां असें तुमचें ह्मणणें आहे हें सगळे खोटे आहे.

२ तारीख ४-१-१७ ला तुमचा माझा ठराव झाला तो खालील प्रमाणें. मौजे बावनबीर येथील राहती जागा कवेलुचे दर्शनी भाग पूर्वेस व बाहेर जाण्यास रस्ता भाग दक्षिणेस.

३ बेरेकार बेटाळांतील जागा पू० प० हात २६ द० उ० हात २६ यांतील एकाद्वीतियांश हिस्सा येणेप्रमाणें दोन्हीं जागा विक्रीचा ठराव ३४५ रुपयास झाला ही गोष्ट खरी आहे.

४ माझे घरास दर्शनी भाग पूर्वेस असून बाहेर जाण्याचा रस्ता दक्षिणेस आहे

५ तुमचा व माझा विक्रीचा ठराव ३४५ रुपयास झाला त्याप्रमाणें मी तुह्मास खरेदीखत करून देण्यास तयार आहो, परंतु तुह्मी ह्मणता कीं माझेच वाड्यांतील चिनकाजी वा। महेपती रा. नायगांव ता. चिखली जि० बुलडाणे यांची जागा व बेरेकार बेटाळांतील एकद्वितीयांश हिस्सा माझी चुलती नामे भिमाबाई मर्द दगडु मराठे रा. शिरले ता. बाळापूर ह्या दोन इसमांच्या जागा तुह्मी आतां मला खरीदखत करून द्या नाहींतर आह्मी फिर्याद करून घेऊं असा धाक दाखवित आहां तरी तुह्मी मला मुद्दाम डुबवित आहां तरी असे न करितां ही नोटीस मिळाल्या पासून आठ दिवसांचे आंत इसाराचे २५ रुपये वजा जाता राहिलेले रुपये ३२० तीनशे वीस देऊन खरिदखत करून घ्यावें असें जर असें न कराल तर नोटीस खर्च व रितीप्रमाणें तजवीज केली जाईल आणि कोर्टास लागलेला खर्च गाडीजोडीसह तुमचे जवळून भरून घेतला जाईल. आणि जितके दिवस रक्कम माझे पदरांत पडणार नाहीं तितके दिवसाचे व्याज भरून घेतल्या जाईल. कळावें तारीख १०-२-१७ इसवी दस्तुर विश्वंभर रामचंद्र कुळकर्णी खळद बु॥ रा. बावनबीर.

सही

रामजी अनाजी मराठे निशाणी खुद डावे हातचा आंगठा

नो० नं० ८७

---


हिमालयांतील दिव्य महौषधींचीं औषधें.

सर्वप्रकारचे नेत्ररोगांवर रामबाण औषध किं. १ रु. पो. ख. शिवाय.

रक्त शुद्ध करणारी दिव्य वडी किं १॥ रुपया दि. ७ शिवाय. अभ्रक, मौक्तिक वगैरे उंची माल व्ही. पी. नें पाठवूं.

पत्ता— वैद्यराव विठ्ठल शास्त्री परांजपे पुणें २३८ बुधवार चौक

नो. नं. १२

हात मागाचा मोठा कारखाना.

अगदीं पक्क रंगाचीं लुगडीं पाहिजे असल्यास

कला-भुवन सोलापूर.

यांच्याकडे मागणी करा.

लछमय्या व्यंकटनरसू इरावती, मालक,

नो नं० १०

ॐ नमः श्रीगणेशाय.

आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुळांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. अपूर्व नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. परम्यावर अपूर्व मिश्रण—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० ॥ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून ती पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, योक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

नो० नं० २२


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.